‘‘ टिळक महाराष्ट्र विदयापीठाच्या सामाजिकशास्त्र विदयाशाखांतर्गत ’’

अर्थशास्त्र विषयातील

एम.फिल

पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध

# सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास (२००८-२०१३)

-: संशोधक विदयार्थी :-

सौ. ज्योती दिपक बोटकोंडले

-: मार्गदर्शक :-

डॉ. रविंद्रनाथ वसंत पडवळ

(टिळक महाराष्ट्र विदयापीठ)

डिसेंबर - २०१६

# अनुक्रमाणिका


| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | III |
| २ | विदयार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र | IV |
| ३ | ऋणनिर्देश | V |
| ४ | तक्ता सूची | VI-VII |
| ५ | आलेख सूची | VIII |
| ६ | फोटो सूची | IX |
| ७ | नकाशा सूची | X |
| ८ | प्रकरण १ – प्रस्तावना | |
| ९ | प्रकरण २ – शिक्षण व अनुदान संदर्भातील साहित्याचा परामर्श | |
| १० | प्रकरण ३ – संशोधन पद्धती | |
| ११ | प्रकरण ४ – ठाणे जिल्हा व शहापूर तालुका परिसरातील शैक्षणिक आणि आर्थिक विकासाची पार्श्वभूमी | |
| १२ | प्रकरण ५ – शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाची विश्लेषणात्मक माहिती | |

| | | |
|---|---|---|
| १३ | प्रकरण ६ – निष्कर्ष व शिफारशी | |
| १४ | परिशिष्ट - प्रश्नावली | |
| १५ | संदर्भ सूची | |



**Dr. R. V. Padwal**

Res./A/102 Mayuresh Trinity CHS. Ltd

Plot No. 64/65, Sect. 16 A

Nerul – (W)

Navi Mumbai 400706

Mob : 9969012628


# CERTIFICATE

Certified that the work incorporated in the thesis for 'M.phil' degree entitled "सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणांमाचा अभ्यास" (2008 - 2013) submitted by Mrs – Jyoti Deepak Botkondle was carried out under my supervision.

Such material as has been obtained from other source has been duly acknowledged in the thesis.

Place : Pune (R.V.Padval)

Date : Guide

**प्रतिज्ञापत्र**

सौ. ज्योती दिपक बोटकोंडले. ''सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हायातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास (२००८-२०१३) '' या प्रबंधातील सर्व माहिती मुळ संदर्भातून संकलित केली असून तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे आणि सदर माहितीचा प्रबंधाव्यतिरीक्त अन्यत्र उपयोग केलेला नाही.

दि. सौ. ज्योती दिपक बोटकोंडले

## ऋणनिर्देश

काम कोणतेही असो ते पुर्णत्वास जाण्यासाठी अनेकांचे श्रम खर्ची पडलेले असतात. मदतीचा हात पुढे आलेला असतो. व त्या सहकार्य भावनेनेच चांगली कलाकृती ध्येयाच्या पूर्तीपर्यंत पोहचविता येते मग तो एखादा प्रबंध का असेना.

मी जेव्हा माझ्या प्रबंध विचार करते तेव्हा जाणवते की, नाव माझे असले तरी खरे श्रम ते त्या अनेक मदतगारांना जाते ज्यांनी माझा प्रबंध पूर्ण करण्यास प्रत्येक टप्प्यांवर मला मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

सर्व प्रथम हा प्रकल्प सादर करण्याची संधी ज्या विदयापीठाने मला दिली त्या टिळक महाराष्ट्र विदयापिठाबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते.

माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.रविंद्रनाथ वसंत पडवळ सर यांनी प्रबंधासाटी आपला अमूल्य वेळ खर्च करून या वयातही तरूणाईच्या जिद्दीने तडफदारपणाने त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते. तसेच त्याच्या पत्नी सौ. सुधा पडवळ यांची ही मी आभारी आहे. ज्यांनी मला सतत काम करण्याची प्रेरणा दिली.

तसेच टिळक महाराष्ट्र विदयापीठाचे अर्थशास्त्र विषय विभाग प्रमुख डॉ.प्रविण जाधव सर व श्रीमती डॉ. ज्योती पाटील मॅडम यांचेही सतत सहकार्य मला लाभले त्यांचीही मी आभारी आहे. तसेच टिळक महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, गोखले इन्स्टिट्युट ऑफ इकोनॉमिक्स. पुणे, इन्स्टिटयुट ऑफ पॉपुलेशन स्टडीज्, गोवंडी., शिक्षण विभाग पंचायत समिती शहापूर. यांचेही खास सहकार्य मला लाभले.

माझे कुटुंबीय, माझे आई - वडील, सासू - सासरे, मित्र - मैत्रिणीची प्रेरणा व ज्याच्या सहकार्यशिवाय हा प्रकल्प पूर्ण होणे केवळ अशक्य होते असे माझे पती श्री. दिपक बोटकोंडले या सर्वांची मी ऋणी आहे.

सदर प्रबंधाचे सुबक असे संगणकीय टंकलेखन कमीत कमी वेळेत अचूकपणे करून दिल्या बद्दल श्री.रोहिदास पाटील यांची ऋणी आहे.

याशिवाय या कार्यासाठी ज्यांचे मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्या सर्वांची मी ऋणी आहे.

(ज्योती दि. बोटकोंडले)

## तक्ता सुची


| तक्ता क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | भारताच्या पंचवार्षिक योजना कालावधीतील शिक्षण खर्चाची टक्केवारी. | |
| ४.१ | ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या | |
| ४.२ | ठाणे जिल्ह्याची साक्षरता | |
| ४.३ | शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता | |
| ५.१ | शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या | |
| ५.२ | शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील शिक्षक संख्या | |
| ५.३ | शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्या | |
| ५.४ | शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांची संख्या | |
| ५.५ | शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षक संख्या | |
| ५.६ | शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थी संख्या | |
| ५.७ | शिक्षक अनुदान | |
| ५.८ | शाळा अनुदान | |
| ५.९ | बांधकाम अनुदान | |
| ५.१० | अपंग एकात्मिक शिक्षण अनुदान | |

| | | |
|---|---|---|
| ५.११ | व्यवस्थापन अनुदान | |
| ५.१२ | संशोधन व मूल्यमापन अनुदान | |
| ५.१३ | शाळा दुरुस्ती | |
| ५.१४ | एकूण अनुदान | |
| ५.१५ | विद्यार्थी संख्येनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.१६ | इमारतीच्या रचनेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.१७ | शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकांचे वर्गीकरण | |
| ५.१८ | शिक्षकांच्या शालेय व रिकाम्या वेळेचा वापरानुसार | |
| ५.१९ | क्रिंडागण/मैदान उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.२० | स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.२१ | उपलब्ध पाणीपुरवठा सुविधेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.२२ | शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागनुसार वर्गीकरण | |
| ५.२३ | अनुदानांचे प्राप्त रकमेनुसार वर्गीकरण | |
| ५.२४ | अनुदानाबाबत शिक्षकांच्या मताचे वर्गीकरण | |

# आलेख सुची


| क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| ४.१ | ठाणे जिल्हयाची लोकसंख्या | |
| ४.२ | ठाणे जिल्हयाची साक्षरता | |
| ४.३ | शहापूर तालुक्याची लोकसंख्या व साक्षरता | |
| ५.१ | विद्यार्थी संख्येनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.२ | इमारतीच्या रचनेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.३ | शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकांचे वर्गीकरण | |
| ५.४ | शिक्षकांच्या शालेय व रिकाम्या वेळेच्या वापरानुसार वर्गीकरण | |
| ५.५ | क्रिडांगणाच्या / मैदानांच्या उपलब्धतेवरुन शाळांचे वर्गीकरण | |
| ५.६ | स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.७ | उपलब्ध पाणीपुरवठयाच्या सुविधेनुसार शाळांचे वर्गीकरण | |
| ५.८ | शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागानुसार वर्गीकरण | |
| ५.९ | अनुदानांचे प्राप्त रकमेनुसार वर्गीकरण | |
| ५.१० | अनुदानांबाबत शिक्षकांच्या मतांचे वर्गीकरण | |

# फोटो सुची


| क्र. | फोटोंची माहिती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | शहापूर (आसनगाव) रेल्वे स्टेशन परिसर | |
| २ | शहापूर परिसरातील बस स्थानक | |
| ३ | शहापूर परिसरातील बाजारपेठ | |
| ४ | शहापूर परिसरातील शाळा | |
| ५ | शहापूर परिसरातील आरोग्य केंद्र | |
| ६ | शहापूर परिसरातील घरे (शिक्षक व विद्यार्थी) | |

# नकाशा सुची


| तक्ता क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य | |
| २ | ठाणे जिल्हा | |
| ३ | शहापूर तालुका | |

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| १.१ | ग्रामीण विकासाची पार्श्वभूमी |
| १.२ | जागतिक ग्रामीण आर्थिक विकास व शिक्षण |
| १.३ | स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीयांचे आर्थिक जीवन |
| १.४ | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीयांचे आर्थिक जीवन |
| १.५ | भारतातील पंचवार्षिक योजनांची फलश्रुती |
| १.६ | भारतातील ग्रामीण विकासासाठी पंचवार्षिक योजनांचे महत्व |
| १.७ | भारतातील आर्थिक सुधारणा |
| १.८ | भारतातील साक्षरता व शिक्षण विकास |
| १.९ | भारतातील ग्रामीण विकास |
| १.१० | भारतातील शिक्षणाचा विकास |

# प्रस्तावना

## १.१. ग्रामीण विकासाची पार्श्वभूमी :-

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. मानवाची भटकी अवस्था संपून स्थायी स्वरूप जीवनाची अवस्था सुरू झाल्यानंतर त्याचा समुदाय जीवनाला प्रगल्भता आली. समुदाय अस्तित्वात आल्यानंतर एका विशिष्ट भुभागात सर्वांनी एकत्रित राहणे आवश्यक असते. आदिम समूहापासून शिकार करून खाणे, झाडांची फळे, पाने, कंदमुळे खाणे असे जीवन जगणाऱ्या हया आदिमानवाला शेती या आर्थिक उत्पादन क्रियेचा शोध लागल्यानंतर मानवाच्या स्थिर जीवनाला सुरूवात झाली. त्यातूनच समुदाय अर्थात समाजाची निर्मिती झाली.

आज जगात व भारतात शहरी समुदायाचा उदय झाला असला तरी भारतातील २०११ च्या जणगणनेनुसार ६८ टक्के लोक ग्रामीण भागात राहणारे आहेत. त्या लोकांचे शेती हे उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. परंतु त्यांना पुरेशा वैदयकिय सोयी, शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नाहीत. शेतीमधून मिळणारे उत्पन्न अपुरे पडत असल्याने रोजगारासाठी त्यांना नागरी भागाकडे स्थलांतर करावे लागते. नागरी संस्कृतीची पारंपारिक वैशिष्टे हळूहळू नष्ट होत आहेत व नवीन संस्कृतीच्या संपर्कामुळे त्यांच्या ग्रामीण विभागात अनेक समस्याही निर्माण झाल्या आहेत. त्यांच्या अडचणी समजावून घेऊन त्यांच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करावेत याच उद्देशाने ग्रामीण विकासाचा अभ्यासाला महत्व आहे. म्हणूनच हा अभ्यास करताना जागतिक स्तरावर, देशांतर्गत व जिल्हातंर्गत ग्रामीण विकासात शिक्षणाच्या विकासाचा व शैक्षणिक अनुदानात आढावा घेणे महत्वाचे आहे.

## १.२. जागतिक ग्रामीण आर्थिक विकास व शिक्षण :-

पौर्वात्य देशातील ग्रामीण विकासाचा आढावा घेताना असे लक्षात येते की, पाश्चिमात्य देशात जमीन उपलब्धेची मर्यादा आणि सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे कृषी उत्पादनात मर्यादा होत्या. त्यामुळे पाश्चिमात्य देशातील लोकांनी इतर देशांत स्थलांतर होण्याचा मार्ग स्वीकारला. स्पॅनिश, पोर्तुगीज, ब्रिटीश, फ्रेंच, जर्मन, इटालियन इत्यादी देशातील लोकांनी दक्षिण आफ्रिका, आशिया या देशात स्थलांतर केले. त्यांनी ईस्ट इंडिया कंपनी सारख्या कंपन्या स्थापन केल्या. त्यातूनच जहाजबांधणी, धातूशास्त्र, खाणकाम यांचा व्यवसाय व व्यापार वाढू लागला. याच काळात वाफेच्या इंजिन व किफायतशीर यंत्र निर्मितीसाठी संशोधन व विकासाची प्रक्रिया सातत्याने सुरू झाली. त्यातूनच औदयोगिक क्रांतीचा जन्म झाला. त्यातून मालाची वाहतूक जलद होण्यासाठी नदयांवर कालवेही तयार करण्यात आले. बंदरे बांधण्यात आली.

सरकारी मदतीमुळे शिक्षण संस्थाचा विकास झाला. आर्थिक प्रगतीच्या मार्गात शिक्षण हे प्रमुख साधन बनले. विकासाला गती मिळण्यासाठी सरकारने अनेक कायदे केले. या कायदयांनी आर्थिक विकासाला चालना मिळाली. भारततही याच काळात विविध विचारवंतानी विकास प्रक्रिया स्विकारली. महात्मा गांधीनीही ग्रामीण विकासासाठी स्वंयपुर्णता ही संकल्पना मांडली. तसेच सर्वात महत्वाची बाब म्हणजे मुलभूत शिक्षणाची आवश्यकता त्यांनी सांगितली आणि हे सर्व सरकारी पद्धतीने झाले पाहिजे असे सांगितले.

## १.३. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीयांचे आर्थिक जीवन :-

आर्थिक संरचनेत १८ व्या शतकापासून भारतात काही प्रमाणात आर्थिक जीवनात बदल घडून आले. शेतीमाल व स्थानिक तंत्रज्ञान वापरून केलेल्या वस्तूच्या छोटया व स्थानिक बाजारपेठ हळूहळू विकसित होत गेल्या. कर्ज देण्याघेण्याचे व्यवहार व हुंडयाचे व्यवहाराही घडून येऊ लागले. १९ व्या शतकात दुसऱ्या किंवा तिसऱ्या दशकापासून भारतीय समाजावरील ब्रिटीशांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून लागला. १८ व्या शतकात

शेवटीपासून इंग्लंड मधील खाण व्यवसाय, कापड उदयोग तसेच शेती व व्यापार यांना चालना मिळाली. मात्र औदयोगिक क्रांतीमुळे भारतातून कच्च्यामालाची निर्यात व भारतात इंग्लंडमधील पक्क्या कारखानदारी वस्तूंची विक्री असे विशेषीकरण घडून येऊ लागले. ब्रिटीशांचे आग्रही व्यापारी धोरण, त्यांच्या मोठया प्रमाणावरील स्वस्त उत्पादित वस्तूमुळे भारतातील ग्रामीण व नागरी असे सर्व प्रकारचे हस्त व्यवसाय हळूहळू अस्थिर होऊ लागले आणि सुतीकापड, धातुकाम, लोकर उदयोग अशा भारतीय उदयोगांना चांगलाच फटका बसला. त्याच सुमारास देशातील शेती क्षेत्रात जमीनदारी पद्धतीचा उदय झाला. सन १७९३ मध्ये लॉर्ड कॉर्नवॉलिसने कायमधारा पद्धत सुरू केली आणि हळूहळू जमीनदारी पद्धत येथे स्थिर होऊ लागली मात्र या पद्धतीमुळे जमीनदार हा शेतकऱ्यांची पिळवणूक करणारा वर्ग तयार झाला. हा वर्ग शेतकऱ्यांकडून खंड वसूल करीत असे मात्र जमिनीवर कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करीत नसे. त्याच कालावधीत देशामध्ये जे वारंवार दुष्काळ पडले त्यामागील एक कारण ही अनुत्पादक शेती हे आहे.

ब्रिटीशांच्या कारकिर्दीत भारतामध्ये लोहमार्गाचा विकास झाला. इंग्लंडमध्ये १८२५ साली पहिली रेल्वे सुरू झाली. व भारतात १८५३ साली पहिली रेल्वे सुरू झाली. भारतातील शेतीला या लोहमार्गाचा फायदा झाला. इंग्लंडमधील वस्तूंना बाजारपेठा मिळणे हे लोहमार्गामुळे शक्य झाले. दुष्काळावर नियंत्रण ठेवणे ही लोहमार्ग विकासामुळे शक्य झाले. देशातील प्रशासनाची गुणवत्ता व भारतीय उदयोगांमध्ये ही सुधारणा झाली. पहिल्या महायुद्धाने उदयोगधंदयाना वेग आला तर महामंदीच्या काळात उदयोगधंदयाची पिछेहाट झाली. अपुरे भांडवल, उदयोजकतेचा अभाव, सदोष व्यवस्थापन यामुळे स्वदेशी चळवळ सुरूवातीला यशस्वी झाली नाही. परंतु काही स्थानिक औदयोगिक प्रयत्नांची मुहूर्तपेठ या काळात रोवली गेली. टाटाचा पोलाद कारखाना १९१२ साली सुरू झाला.

## १.४. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीयांचे आर्थिक जीवन :-

स्वातंत्र्यानंतर भारताने १९५० साली स्वतंत्र नियोजनबध्द आर्थिक विकासाच्या कामाला सुरूवात केली. इ.स. २००० मध्ये या विकास कार्यक्रमाची पाच दशके पुर्ण केली गेली. देशाचा विकास हा आजपर्यंत चालत आलेल्या प्रगतीचा परिपाक आहे. २१ व्या शतकाचा भारतीय समाज हा बराचसा रुढीप्रिय परंतु परंपरागत जाती व्यवस्थेवर विश्वास ठेवणारा होता. कुटुंबसंस्था या पितृप्रधान व एकत्र कुटुंब अशा होत्या. कुटुंबांचा व्यवसाय पिढीजात परंपरांगत स्वरूपाचा होता. समाज हा बराचसा कृषीप्रधान आणि ग्रामीण असा होता. नागरिकीकरणामुळे प्रत्येक खेडेगाव हे जवळजवळ स्वयंपूर्ण होते तरीसुद्‌धा वाहतुक आणि संपर्क यंत्रणेचा अभाव होतो.

भारत या काळात कठीण आर्थिक अवस्थेत होता. आर्थिक प्रगतीमध्ये एक प्रकारची कुंठितावस्था दिसून येत होती. देशात औदयोगिक गुंतवणूकीचे प्रमाण कमी होते व तंत्रज्ञानही जुनाट होते. सामान्य माणसाचे राहणीमान  अगदी निकृष्ट होते. दादाभाई नौरोजी सारख्या अनेक तज्ञांनी त्या काळातील भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे आणि दरडोई उत्पन्नाचे मापन करून भारताची दारिद्री आणि कुंठितावस्था समप्रमाण सिध्द केली. ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी धोरणाचा हा परिणाम होता. वसाहतवादी धोरण, आर्थिक पिळवणूक आणि शोषणाचे अनेक मार्ग मार्गल्यामुळे भारतातून खुप मोठया प्रमाणात संपत्तीचे निःसारण झाले. भारतीयांच्या कित्येक दशके हाडीमासी रुजलेला मागासलेपणा दूर करणे व त्यांच्यात विकासाचा आत्मविश्वास वाढविणे हे प्रमुख कार्य देशापुढे होते. दुष्काळ फाळणीचे दुष्परिणाम हे तात्कालिक प्रश्नही उभे होते. त्यामुळे आर्थिक प्रगतीचे वेग वाढविणे, दारिद्रय दूर करणे, राहणीमान सुधारणे, अंतर्गत व विदेशी व्यापारात वाढ करणे, उत्पादन व उत्पादकता सुधारणे असा सर्वसाधारण कार्यक्रम भारताने स्वीकारला.

स्वातंत्र्यानंतरच्या काळातील देशात जो आर्थिक कार्यक्रम स्वीकारला गेला, त्याची प्रमुख वैशिष्टये खालीलप्रमाणे :

- भारतात १९५० पासूनच्या पंचवार्षिक योजनेद्वारे व्यापक व सर्वकष नियोजनाचा म्हणजेच काही निश्चित टप्पे गाठण्याचा एकत्रित व समयबद्ध प्रयत्न करण्यास सुरूवात झाली. नियोजनाचे पद्धतशीर प्रयत्न देशात सर्व पातळयांवर करण्यात आले. बँका, वित्तीय संस्था ,प्रशासन यंत्रणा, खाजगी व सार्वजनिक क्षेत्र यांच्या प्रयत्नाने सर्व योजना राबविल्या जातात.

- पंडित नेहरूनी लोकशाही समाजवादी धोरणाला अनुसरून देशात १९५० नंतर सार्वजनिक क्षेत्रास वाढता वाव देण्यास सुरूवात केली. सार्वजनिक सेवा, अवजड उदयोग, पायाभुत वस्तु व सेवा, वाहतुक संपर्कव्यवस्था, खाण व्यवसाय अशा मोक्याच्या उदयोगांसाठी सार्वजनिक क्षेत्र राखून ठेवले गेले. या उपक्रमांमध्ये नफ्यापेक्षा सेवा, उत्पादन करवसुली, रोजगार यांना आर्थिक महत्व होते. गेल्या सुमारे ५० वर्षात वरील सर्व दृष्टीकोनातून सार्वजनिक क्षेत्राने चांगलीच प्रगती केली आहे. सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांचे भारतात सहअस्तित्व लक्षणीय आहे.

- आर्थिक विकासाचा वेग वाढविणे, तेजीमंदीच्या चक्रातून सुटका करून स्थैर्य आणणे. विकासातील समतोल राखणे, निर्यात वाढवून विदेशी व्यवहारातील दरी कमी करणे, रोजगार वाढविणे अशा उद्दिष्टांचा पाठपुरवठा नियोजन काळात केला गेला.

- विकासाचे सर्वसाधारण प्रयत्न करीत असतानाच असे दिसून आले की मक्तेदारी, उदयोगांची वाढ, मुठभर श्रीमंताच्या संपत्तीत वाढ व उत्पन्नामधील भीषण विषमता यांचे दर्शन होऊ लागले. त्यामुळे समाजातील गरीब, दुर्बल व अभावग्रस्तांना प्रत्यक्ष लाभ होईल अशा योजना हाती घेण्यात आल्या सर्व लोंकासाठी असलेले विकासाचे समग्रलक्षी कार्यक्रम व काही खास गटांसाठी असलेले विशेष कार्यक्रम अशा दोन्ही आघाडयांवर प्रगतीचे प्रयत्न सुरू झाले. किमान गरजा कार्यक्रम वीस सुत्री

कार्यक्रम मागसवर्गीय अनुसूचित जमाती,आदिवासी, महिला-अपंग यांच्यासाठी असलेले कार्यक्रम, रोजगार हमी योजना अशा अनेक मार्गांनी समाज्यातील कमकुवत गटांना फायदा होईल असे कार्यक्रम हाती घेतले गेले.

## १.५. भारतातील पंचवार्षिक योजनांची फलश्रुती :-

भारतासारख्या विकसनशील देशाला सामाजिक न्यायाच्या तत्वावर समयबध्द विकास साधण्यासाठी नियोजनाची गरज होती. पंचवार्षिक योजनांच्या सहाय्याने ब्रिटिशांच्या काळात आलेले मागासलेले व कुंठितावस्था दाखविणारे स्वरूप बदलून प्रगतीशील अर्थव्यवस्थेच्या दिशेने संरचनात्मक बदल घडवून आणले.त्या अनुषंगाने आपल्याला आर्थिक बाबी प्रामुख्याने पुढील प्रमाणे दाखविता येतील.

- स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नात स्वातंज्योत्तर सुमारे चार पटीने वाढ झाली. तसेच दरडोई उत्पन्नात सुमारे दीड पटीने वाढ झाली. दरडोई अन्नधान्य, वीज, खादय तेल, कापड यांच्या उपलब्धतेत वाढ झालेली दिसते. नजिकच्या काळामध्ये गरजेच्या वस्तूं बरोबर वाहने, खेळणी, यंत्रे, वातानुकुलित यंत्रे, शीतकपाटे प्रकिया केलेल्या वस्तू अशा वस्तुंच्या उत्पादनातही वाढ झाली. सर्वसामान्य माणसाच्या उत्पादनात वाढ व विस्तार साधला गेला.

- भांडवली वस्तूंच्या उत्पादनात योजना काळात नेत्रदिपक वाढ झाली. यात धातूंच्या वस्तू अवजड यंत्रसामुग्री, रसायने, संगणक, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु, खते, खाण-यंत्रसामुग्री अशा वस्तूंचा समावेश आहे. यामुळे आयातीत बचत झाली असून दुर्मिळ परकीय चलनाची बचत झाली आहे.

- मुलभूत सेवामध्ये विस्तार ही एक नियोजनाची बाजू आहे. यात वाहतुक दळणवळण, संपर्क माध्यमे, पाटबंधारे, उर्जा या क्षेत्राचा विकास झालेला दिसतो. तसेच बँका, वित्तीय संस्था, विमा सल्लामसलत अशा सेवांचा विस्तार दृष्टीस येतो.

- भारताच्या विदेशी व्यापारातील वाढ ही महत्वाची बाब आहे. १९५० च्या तुलनेतचार दशकानंतर इतर देशांशी भारताचा व्यापार वाढत गेला आहे.

- विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, सामाजिक सेवा ,संशोधन, विकास या क्षेत्रामध्येही भारताने प्रगती केली आहे. संरक्षण, उदयोगधंदे, तंत्रज्ञान, संगणक या क्षेत्रातील भारताची प्रगती जगाच्या प्रगतीच्या बरोबरीने गणली गेली आहे.

## १.६.भारतातील ग्रामीण विकासासाठी पंचवार्षिक योजनांचे महत्व :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नियोजनाद्वारे आर्थिक विकास साधण्याचे ठरविण्यात आले. भारतीय राज्यघटनेत राज्याच्या धोरणाविषयी देण्यात आलेल्या तत्वांच्या आधारे नियोजनाची उद्दिष्टये प्रामुख्याने आचरणात आणली गेली. अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे खाजगी क्षेत्रालाही स्थान असून दोघांची भूमिका परस्पर पूरक आहे. संघटित मोठे उदयोगधंदे, लघुउदयोग, शेती, व्यापार, बांधकाम, विविध सेवा, व्यवसाय इ. सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे खाजगी क्षेत्रातही आहेत. नियोजन यशस्वी करण्यासाठी खाजगी क्षेत्राकडून सक्रीय सहभाग मिळणे आवश्यक आहे. योजना काळात सार्वजनिक क्षेत्राचे प्रमाणे हळूहळू वाढत आहे. १९५० मध्ये भारतात नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. पंचवार्षिक योजनांचा आराखडा हे मंडळ तयार करते. भारतातील नियोजनाची दीर्घकालीन उद्दिष्टे यात पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

- राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न यामध्ये वाढ व्हावी यासाठी उत्पादनात जास्तीत जास्त वाढ करणे.
- उत्पन्न व संपत्तीच्या विभाजनातील विषमता दूर करणे.
- पूर्ण रोजगार पातळी साध्य करणे.
- समता, न्याय यावर आधारित पिळवणुकविरहीत समाजवादी समाजरचना निर्माण करणे.
- दारिद्रय दूर करणे, रोजगारात वाढ करणे, ग्रामीण विकास साधणे, मागासलेल्या जाती-जमातींच्या विकास साधणे यांनाही नियोजनात महत्व देण्यात आले आहे. भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला असल्यामुळे आर्थिक नियोजन हा येथील धोरणाचा अविभाज्य व अटळ भाग बनला आहे.

## १.७. भारतातील आर्थिक सुधारणा :-

देशाची आर्थिक प्रगती झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा होणे शक्य नसते, त्यामुळे भारताच्या आर्थिक व्यवस्थेच्या स्वरूपांची नोंद घेणे महत्वाचे ठरते. कोणत्याही देशाच्या आर्थिक व्यवहारांचे स्वरूप वर्णन करण्यासाठी अर्थव्यवस्था हा शब्द वापरला जातो. व्यक्ती व व्यक्तीच्या बनलेल्या विविध संस्था व देशातील सरकार यांच्यातील आर्थिक संबंधाचा अभ्यास आर्थिक व्यवस्थेत करता येतो. अगदी प्राचीन काळात कुटुंब किंवा खेडेगावही स्वयंपूर्ण होतो. परंतु आधुनिक काळ हा श्रम विभागणी आणि विशेषीकरणाचा काळ आहे. आपल्याला हजारो वस्तु व सेवा लागतात. व त्या आपण बाजारातून मिळवतो. धंदा, व्यापार, वाहतूक, विनिमय, वित्त व्यवहार, कर्ज देणे-घेणे, मालाचे उत्पादन – साठवण, विक्री अशा सर्व गोष्टींना आर्थिक व्यवस्थेमध्ये महत्व आहे. आर्थिक व्यवहाराचे परस्पर संबंध स्पष्ट करणाऱ्या या तीन संज्ञा आहेत. भांडवलशाही अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था आणि मिश्र अर्थव्यवस्था. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये शेतजमीन कारखाने भांडवल, दुकाने यांची खाजगी मालकी असते. नफा याच प्रमुख उद्देशाने येथे कामकाज चालते. लोकांनी कोणता धंदा व्यवसाय करावा यावर कोणी फारसे निर्बंध घालत नाहीत. येथे शासनाची भुमिका फक्त कायदा, सुव्यवस्था अशी किमान हस्तक्षेपाची असते. या पध्दतीने

दुसरे टोक म्हणजे समाजवादी अर्थव्यवस्था तेथे बहुतेक उत्पादित घटक सरकारी मालकीचे असतात. उत्पादन वाटप या संबंधीचे सर्व निर्णय सरकार घेते ही अर्थव्यवस्था बऱ्याच प्रमाणात शासन नियंत्रित असते. समाजवाद व भांडवलशाही हे परस्पर विरोधी असणारे भिन्न मार्ग जरी असले तरी त्यांचे अंतिम उद्दिष्ट एकच म्हणजे जनतेचे हित व कल्याण साधणे होय. भांडवलशाही देशांमध्ये उत्पन्नामधील फार मोठी विषमता, तेजी-मंदीची अस्थिरता, नफेखोरी, बेकारी असे दोष ठळकपणे नजरेस आले तर समाजवादी व्यवस्थेमध्ये विषमता, टंचाई, राजकीय पक्षांचे प्राबल्य, नोकरशाहीची लालफित असे दोष दिसले. या दोन पध्दतीमधील दोष बाजूला सारून फक्त फायदेच मिळावेत या उद्‌देशाने दुसऱ्या महायुध्दानंतर मिश्र अर्थव्यवस्था हा निराळाच प्रकार रूढ झाला. खाजगी धंदा, व्यवसाय व सार्वजनिक क्षेत्र या दोहोचे तेथे सहअस्तित्व असते. नफा व कल्याण या दोहोना तेथे स्थान असते. सरकारचा एकूण आर्थिक कियेमध्ये बराच सहभाग असतो. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा जगातील ठळक उदाहरण आहे. भारतात खाजगी क्षेत्रालाही विकासाची संधी आहे. सार्वजनिक क्षेत्रही मोठया प्रमाणावर आहे. पंचवार्षिक योजना आखून खास करून गरीब व मागासवर्गीयांना विकासाची थेट संधी दिली जाते.

आर्थिक विकास होत असताना देशामध्ये काही मुलभूत बदल सावकाश परंतु निश्चितपणे होत असताना दिसतात. भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शेती क्षेत्रातून सुमारे ३८ टक्के व कारखानदारी क्षेत्रातून २१ टक्के उत्पन्न मिळते. भारतात सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेतीवर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पध्दतीने अवलंबून असते, तर प्रगत देशात सुमारे १० टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रात काम करते. देशात शेती क्षेत्रावर तुलनेने कमी भर दिला जाऊन औदयोगिक क्षेत्र, कारखानदारी व सेवा क्षेत्र यावरील भर वाढत आहे. म्हणजे या क्षेत्रातील रोजगार, गुंतवणूक, उत्पादन, व्यापार-विनिमय, वाहतूक यांच्यात वाढ होते. भारतातील लोकसंख्यावाढीचा दर हाही येथे घ्यावयास पाहिजे. भारतात लोकसंख्या आजही सुमारे २.५ टक्के या सरळ वार्षिक दराने वाढत आहे तर जर्मनी, जपान, अमेरिका या प्रगत देशामध्ये लोकसंख्या सुमारे १ टक्के किंवा कमी या सरळ वार्षिक दरानेच वाढत आहे. त्यामुळे प्रगतीची फळे विकसित देशांना अधिक चांगल्या प्रमाणात चाखायला मिळतात. भांडवल आणि मजूर यांच्या वापराबाबत या देशात मुलभूत फरक

आढळतो अर्थात ही परिस्थिती तंत्रज्ञानाच्या प्रकारावर अवलंबून आहे. गरीब देशामध्ये जुन्या व पारंपारिक तंत्राने उत्पादन साधले जाते. तेथे दर मजूरामागे यंत्रे, उर्जा, खनिजे यांचा अल्प वापर आढळतो यंत्राचा वापर आणि साक्षरता,प्रशिक्षण यांच्यामुळे प्रगत देशामध्ये कामगारांची गुणवत्ता तसेच उत्पादकता उच्च प्रगतीची आढळते. भारतासारख्या देशात अशी गुणवत्ता खुपच कमी आढळते. अशीच गोष्ट आर्थिक व सामाजिक सेवाबद्दल सांगता येईल. वैघकीय व आरोग्य सेवा, साक्षरता प्रसार, शालेय तसेच उच्च शिक्षण, महिला कल्याण, कामगार कल्याण, न्यायदान अशा अनेक बाबतीत गरीब देशांना फारसा विकास करता येत नाही. तथापि प्रगत देशामध्ये घरबांधणी, बँकसेवा, टपालसेवा, पुस्तके, वर्तमानपत्रे यांची उपलब्धता यांच्या बाबतीतही हे सांगता येईल. अविकासित देशामध्ये एक तर व्यापार खूप कमी व त्यातही कच्चामाल, शेती, वस्तू यांचेच व्यापारात प्राबल्य दिसते. प्रगत देशामध्ये कारखानदारी वस्तू, उपभोगत्याच्या टिकावू वस्तू व सेवा तंत्रज्ञान यांचेच अशा व्यापारात प्राबल्य असते पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदुषण या समस्याही दिसून येतात. पर्यावरणाचे संर्वधन करून प्रदुषणाचे प्रमाण कमीत कमी ठेवून विकास साधता येतो. मात्र त्यासाठी देशातील उपलब्ध तंत्रज्ञानामध्ये काही सुधारणा कराव्या लागतात. उत्पादक घटकांची उथळमथळ थांबवावी लागेल.

## १.८. भारतातील साक्षरता व शिक्षण विकास :-

सामाजिक व आर्थिक विकासाच्यादृष्टीने शिक्षणाच्या सोयीमधील वाढ ही महत्वाची आहे. शिक्षण व संशोधन यांच्या विकासाने व विस्ताराने सर्वसाधारणपणे आर्थिक विकासास चालना मिळते. प्राचीन काळी भारतात आश्रम, गुरूकुल, विदयापीठ यांच्यामार्फत शिक्षण मिळत असे .स्त्रियांनाही शिक्षण मिळत असल्याच्या नोंदी आढळतात. अगदी प्रथम पाठांतराने व नंतर ग्रंथरूपाने शिक्षण घेतले जात असे. वेद, वेदांग, विदया, कला असे सर्वच शिक्षण त्याकाळी होत असे. शिक्षणाच्या सुरूवातीला मुलामुलींवर उपनयन संस्कार होत असे तक्षशिला, नालंदा, मिथिला, विक्रमशीला अशी विदयापीठे तेव्हा प्रसिद्‌ध होती. या विदयापीठामध्ये समृध्द ग्रंथालयेही उपलब्ध होती. भारतातील मुस्लिम काळात मुख्यतः धर्मनीतीचे

शिक्षण देणाऱ्या मदरसा या शाळांभोवती लक्ष केंद्रित राहिले. सतराव्या शतकामध्ये हळूहळू ब्रिटीश अंमल वाढू लागला. सुरूवातीस कंपनी सरकारने पाठशाळा व मदरसा यांच्या परंपरा चालू ठेवल्या राजा ईश्वरचंद्र विदयासागर, जगन्नाथ शंकरशेठ यांनी शिक्षण पध्दतीवर सखोल विचार करुन जनजागृतीचे प्रयत्न केले. मेकॉले यांने १८३५ मध्ये शिक्षण विषयक खलिता जाहीर करून भारतीयांना पाश्च्यात्य विदयांचे इंग्रजीतून शिक्षण दिले जावे असे मत मांडले . त्याकाळात मिशनऱ्यांच्या शाळा, ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या शाळा, भारतीयांच्या शाळा व पारंपरिक पाठशाळा अशा पध्दती अस्तित्वात होत्या. १९५६ मध्ये मुंबई मद्रास व बंगाल इलाक्यामध्ये शिक्षण रूजले. देशात प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे. म्हणून सतत मागणी होत होती. नामदार गोखले यांनी विधी मंडळामध्ये याबाबत जोरदार प्रयत्न केले. त्यावेळी स्वदेशी चळवळीचा प्रभाव वाढल्यानंतर राष्ट्रीय महाविदयालये ,शिक्षण शाळा, विदयापीठांची स्थापना झाली. उदा. टिळक महाराष्ट्र विदयापीठ, काशी विदयापीठ,जानिया मिलिया इस्लामीया, विश्वभारती, गुरूकुल कांग्ही ही त्याच सुमारास स्थापन झाली. सन १९३५ मध्ये महात्मा गांधीजींनी मूलोदयोग शिक्षण पध्दतीची घोषणा करून तिचा जोरदार पुरस्कार केला. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय शिक्षणावर मोठा भर देण्यात आला. कॉंग्रेसने त्या काळात प्रौढशिक्षण हेही महत्वाचे मानले. डेक्कन एज्युकेशन सोसायटी किंवा रयत शिक्षण संस्थेसारख्या संस्था, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ हे उदारमतवादी शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्यानंतर शिक्षण या विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे, आशय व अंमलबजावणी यात अनेक बदल झाले. १९४८ मध्ये प्रथम डॉ.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमण्यात आला. या आयोगाने शिक्षण, शिक्षणाच्या सुखसोयी, माध्यम, विस्तार, प्रशिक्षण यांचा सर्वांगीण विचार केला. १९६४ साली नेमलेल्या कोठारी आयोगाने मातृभाषेतून शिक्षणाची शिफारस केली ती उत्क्रांतीजनक ठरली. नेहमीच्या शिक्षण पद्धतीबरोबरच प्रौढशिक्षण, मुक्त विदयापीठ, दूरशिक्षण इ. शिक्षणातून नैतिक आणि सामाजिक मुल्यांची वाढ व्हावी, अभ्यासेत्तर कार्यक्रमांना महत्व असावे. शिक्षणातील प्रादेशिक असमतोल कमी करावा असे धोरण ठरले. प्राथमिक शिक्षण हा मुलभूत हक्क मानला जावा. यासाठी संसदेमध्ये ८३ घटनादुरूस्ती विधेयक सादर करण्यात आले आहे. नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ञ प्रा.अमर्त्य सेन यांनीही या मताचा

जोरदार पुरस्कार केला आहे. प्राथमिक शिक्षणावर आठव्या योजनेत केंद्र सरकारने एकुण ४७ टक्के खर्च केला होता. नवव्या योजनेत हे प्रमाण वाढवून ५८ टक्के वर नेण्यात आले आहे. उच्च शिक्षणासाठी देशात विविध पदवी महाविदयालये, विदयपीठे, अभिमत विदयापीठे व अनेक शिक्षण संस्था आहेत. देशात २२१ विदयापीठे सुमारे ९३०० महाविदयालये आणि १६ केंद्रीय विदयापीठे आहेत. देशात विदयापीठ पातळी वरील संशोधनास चालना देणे आणि त्यात सुसूत्रीकरण करणे यासाठी १९५६ मध्ये विदयापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली. या आयोगाच्या कायदयातील कलम ३ मधील तरतुदीनुसार एखादया प्रगत संशोधन संस्थेस अभिमत विदयापीठ म्हणून दर्जा देण्याचे अधिकार मंडळास आहेत. बिर्ला इंन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (पिलानी, राजस्थान), टाटा समाज विज्ञान संस्था (मुंबई), टिळक महाराष्ट्र विदयापीठ (पुणे), गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था (पुणे), डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इंन्स्टिटयूट (पुणे), इंडियन इंन्स्टिटयूट ऑफ सायन्स (बंगलोर), संस्कृत विदयापीठ (तीरूपती) अशा देशातील निवडक ४० प्रगत संस्थाना सध्या अभिमत विदयापीठाचा दर्जा आहे. विशेष संशोधनासाठी केंद्र सरकारने काही संस्था स्थापन केल्या आहेत. जसे भारतीय इतिहास संशोधन परिषद, भारतीय सामाजिकशास्त्र संशोधन परिषद, राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (I.I.T.) इत्यादी.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रौढशिक्षण कार्यक्रम, कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम यांचा समावेश आहे. प्रौढ साक्षरता कार्यक्रमास यापूर्वीपासुन किमान गरजा कार्यक्रम आणि वीस कलमी कार्यक्रम यामध्ये स्थान देण्यात आले आहे. यातही स्त्रिया व वर्गीकृत जाती - जातीत, आदिवासी व समाजातील कमकुवत गटातील लोक यांना या कार्यक्रमामध्ये सामावून घेण्यासाठी विशेष लक्ष दिले जात आहे. कार्यात्मक साक्षरतेमध्ये लेखन, वाचन, आकडेमोड यांच्या बरोबरीने आपल्या आजूबाजूला सामाजिक व आर्थिक जीवनाची ओळख, आपले हक्क, आरोग्य व पोषण कार्यक्रम, लोकसंख्या नियंत्रण यांच्याशी साक्षरतेचा संबंध थेटपणे लावता येतो. ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजनेखाली सध्या देशात, राज्य पातळीवरील कार्यक्रम सुरू आहेत. नव्या शैक्षणिक धोरणात महिला शिक्षणावर रास्त भर दिला. आर्थिक व

सामाजिक बदलासाठी एक धोरण म्हणून शिक्षणाचा अनुकूल उपयोग होऊ शकतो. मुलींना मोफत शिक्षण देणे, मुलींच्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर भर देणे हे सर्व यात समाविष्ट आहे.

## १.९. भारतातील ग्रामीण विकास :-

भारतातील ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना प्राचीन काळातील ग्रामीण संस्कृतीचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल. ग्राम या शब्दाला बोली भाषेत खेडे असेही समजले जाते. भारतीय समाजाचा पाया फार पुर्वीपासून खेडयावर आधारलेला आहे. सुरूवातीला प्रामुख्याने ग्रामीण स्तरावर जनजीवन संघटित होते. ऋग्वेदातही ग्राम या संज्ञेचा वापर केलेला आहे. सिम्स तसेच देसाई यांच्या मते, ग्राम ऋग्वेद तसेच रामायण, महाभारत इ. ग्रंथांमध्येही गावाचा उल्लेख आढळतो. मनु याने वैदिक काळातील ग्रामीण समुदायाचे स्वरूप शासन व्यवस्थेच्या आधारे स्पष्ट केले आहे. ही शासन व्यवस्था गणराज्य स्वरूपाच्या सिध्दांतावर आधारलेली होती. प्रत्येक गावात पंचायत व्यवस्था होती. या माध्यमातुन सुरक्षा शिक्षण इ. विविध स्वरूपाची कार्ये होत होती. बौध्द, जैन व मौर्य काळामध्ये एका गावात जवळजवळ १०० कुटुंबाचे वास्तव्य असे.

इंग्रजी शासन काळ हा ग्रामीण समुदायाचा खरा परिवर्तनाचा भारतातील काळ होय. या काळापुर्वी भारतीय ग्रामीण समुदाय आत्मनिर्भर होता परंतु इंग्रजी सता भारतावर केंद्रीत करण्याची जी नीती होती, त्याचा परिणाम म्हणुन गणराज्य सिध्दांताचा लोप झाला. ग्रामीण स्तरावरील सामुदायिक भावना कमी झाली. त्याची जागा व्यक्तीवादी भावनेने घेतली. सत्तेचे केंद्रीकरण झाल्याने ग्रामपंचायतीचे विघटन झाले. उपजीविकेचे शेती हेच एकमेव साधन होते. परंतु शेतीचा उद्देश केवळ उपजीविका करणे एवढयापुरता मर्यादित न राहता त्याची जागा व्यापारी दृष्टिकोनांनी घेतली. याच काळात जमीनदारी प्रथा रूढ झाली. त्यामुळे भुमीच्या अधिकारात परिवर्तन झाले.

लॉर्ड कॉर्नवॉलिस यांनी १७९३ मध्ये सर्वप्रथम पश्चिम बंगालमध्ये सुभेदारी व ठेकेदारी निर्माण केली. यातुनच जमीनदारी व प्रथा निर्माण झाली. हाच काळ ग्रामीण परिवर्तनाचा काळ मानला जातो. याच काळत ग्रामीण स्तरावरील लघुउदयोग नष्ट करण्यात आले आणि मोठमोठया गिरण्या, कारखान्यांची निर्मित करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण स्तरावर  व्यवसाय बंद पडू लागले. याच काळात दळणवळणाच्या साधनात उन्नती झाली. नोकरी व्यवसायासाठी ग्रामीण स्थलांतरीत प्रक्रिया सुरू झाली व इंग्रज शासन काळात ग्रामीण परिवर्तनास सुरूवात झाली. इंग्रज शासन काळात ग्रामीण समुदायाच्या विघटनाची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु कॉंग्रेस काळापासुन महात्मा गांधीनी ग्राम उन्नतीच्या प्रयत्नास सुरूवात केली. ग्रामीण पुनः निर्मितीच्या दृष्टीने आंदोलन आखण्यास सुरूवात झाली. ग्रामीण विकास राष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचा आहे. भारताचा विकास करण्यासाठी ग्रामीण भागाचा विकास करणे आवश्यक आहे. याचदृष्टीने इंग्रजांच्या काळातील विघटित झालेली पंचायत व्यवस्था पुर्नगटित करण्यात आली. या पंचायत व्यवस्थेच्या माध्यमातुन ग्रामीण समुदायाला गणराज्याचे स्वरूप प्राप्त झाले. याचदृष्टीने पुढे स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजना, सामुदायिक विकास योजना, सर्वोदय विकास योजना इत्यादी योजना आखून ग्रामीण समुदायात अस्तित्वात असणाऱ्या ज्या विविध समस्या होत्या, त्या दूर करण्याच्या दृष्टीने प्रयास करण्यास सुरूवात झाली. स्वातंत्र्योत्तर ग्रामीणांच्या अध्ययनासाठी अमेरिकन फोर्ड फाऊंडेशन या संघटनेव्दारे भारताला आर्थिक सहाय्यता मिळाली. या कार्यक्रमानुसार  चारसुत्री कार्यक्रम आखण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण समस्याचे निराकरण, ग्रामीण समुदायासंबंधी ज्ञान प्राप्त करणे याकरिता त्या अध्यायनला प्राधान्य देण्यात आले.

अमेरिकन फोर्ड फाऊंडेशन या संस्थेच्या मदतीने ग्रामीण समाजाच्या अध्ययनाला भारतात सुरुवात झाली . या ग्रामीण विकास योजनेमुळे ग्रामीणांच्या सामाजिक,  राजकीय, आर्थिक जीवनात आमुलाग्र बदल होत आहेत. तसेच जाती-जातीतील भेद नष्ट व्हावा, सर्वांना विकास साधण्याची समान संधी मिळावी  अशी अपेक्षा आहे. उदयोगधंदयांचे विकेंद्रीकरण व्हावे, छोटी नगरे स्थापन व्हावीत व त्याद्वारे खेडयातील परिवर्तनास चालना मिळावी असे प्रयत्न होत आहेत. त्याप्रमाणे खेडे व नगर यांचे परस्पर संबंध

वाढावेत, शेती आधुनिक शास्त्रीय पध्दतीने व्हावी, ग्रामोदयोगास प्रोत्साहन मिळावे यादृष्टीने प्रयत्न होत आहेत.

भारताच्या संदर्भात विचार करावयाचा झाल्यास १९ व्या शतकाच्या अखेरीस दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त यांनी ग्रामीण विशेषतः शेतीच्या विपन्नावस्थेकडे देशाचे लक्ष वेधले यासाठी १९२४ मध्ये रॉयल कमिशन ऑन ॲग्रीकल्चर या आयोगाची स्थापना करण्यात आली. महात्मा गांधीची ग्राम स्वराज्याची कल्पनाही इथे विचारात घेण्यासारखी आहे. यामध्ये ग्राम हा नियोजनाचा केंद्रबिंदू मानला असुन ग्रामीण नियोजनाला लागेल तेवढी मदत देणे एवढेच केंद्र सत्तेचे काम असावे, असे त्यांना अभिप्रेत होते. त्यांचा विधायक कार्यक्रम पुढील प्रमाणे होता. १. जातीय ऐक्य. २. अस्पृश्यता निवारण. ३. खादी व इतर ग्रामीण व्यवसाय. ४. ग्रामीण स्वच्छता. ५. प्रौढशिक्षण. ६. स्त्रियांचा उध्दार . ७. आरोग्य शिक्षण. ८. आर्थिक समतेसाठी कार्य. असे कार्यक्रम राबविण्यासाठी ग्रामराज्य आवश्यक आहे, असा त्याचा विचार होता. १९३५ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेमलेल्या राष्ट्रीय नियोजन समितीने शेती ग्रामोदयोग खेडयातील शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळणाच्या सोयी अशा विविध प्रश्नांचा अभ्यास केला. यामध्ये प्रत्यक्ष कृतीच्या क्षेत्रात महात्मा गांधीच्या सेवाग्राम आश्रमात व पश्चिम बंगालमध्ये श्री.रविंद्रनाथ टागोरांनी शांतीनिकेतन मध्ये सुरू केलेल्या ग्राम विकास केंद्राचा उल्लेख करावा लागेल.

## १.१० भारतातील शिक्षण खर्च :-

लोककल्याणकारी राज्यात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत ज्ञानगंगा पोहचविण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. या शिक्षणाच्या खर्चासाठी प्रमुख स्त्रोत म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार होय. या शिक्षणखर्चाच्या केवळ ७ टक्के खर्च केंद्र सरकार करते. पण स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रसरकार दर पंचवार्षिक योजनांच्या काळात शिक्षणावर अधिकाधिक खर्च करताना दिसते. केंद्रसरकारला कर रूपाने प्राप्त होणारी रक्कम ही राज्य सरकारपेक्षा जास्त असते तसेच केंद्र सरकार आंतरराष्ट्रीय पातळीवरील निरनिराळया संघटनाकडूनही आर्थिक सहाय्य

घेवू शकते. ६४ ते ६५ टक्के खर्च राज्य सरकार करते तर २७.२८ टक्के खर्च हा खाजगी वित्तीय संस्थामार्फत केला जातो. यासाठी केंद्रशासन राज्य शासनास अधिक सहाय्य देण्याचा प्रयत्न करतो आणि मग या राज्य सरकारकडून शिक्षणखर्चासाठी विशेष अनुदानाची तरतुद केली जाते. सरकारचा शिक्षणावरील खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. ते तक्ता क्रमांक १.१ वरुन समजते.

## भारताच्या पंचवार्षिक योजना कालावधीतील शासनाचा शिक्षणावरील खर्च

### तक्ता क्र. १.१

| पंचवार्षिक योजना | वर्ष | वरील खर्च (कोटी) |
|---|---|---|
| १ ली | १९५१ - ५६ | १४९ |
| २ री | १९५६ - ६१ | २७३ |
| ३ री | १९६१ - ६६ | ५८८.७ |
| ४ थी | १९६९ - ७४ | १०८१.१ |
| ५ वी | १९७४ - ७९ | १७१०.३ |
| ६ वी | १९८० - ८५ | २५२३.७ |
| ७ वी | १९८५ - ९० | ७६३३ |
| ८ वी | १९९२ - ९७ | १०६०० |
| ९ वी | १९९७ - ०२ | २०३६३.६ |

( स्त्रोत - पंचवार्षिक योजना वर्ष १९५१ ते २००२)

वरील तक्त्यावरुन असे समजते की, १९५० - ५१ ते १९९७ - २००२ च्या कालावधीत शिक्षणावरील शासनाचा खर्च वाढताना दिसत आहे. भारतासारख्या कृषीप्रधान राष्ट्राला विकासाची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवण्यासाठी शिक्षणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

# प्रकरण दुसरे

## शिक्षण व अनुदानासंदर्भातील साहित्याचा परामर्श


| अ.क्र | तपशील |
|---|---|
| २.१ | प्रस्तावना |
| २.२ | शिक्षणाचा अर्थ<br>२.२.१ भारतीय शिक्षणाचा इतिहास<br>२.२.२ भारतीय शिक्षण व स्त्री<br>२.२.३ ब्रिटीश राजवट व भारतीय शिक्षण व्यवस्था<br>२.२.४ स्वातंत्र्योत्तर भारत व शिक्षण<br>२.२.४.१ शिक्षणाची ध्येय<br>२.२.५ भारतीय शिक्षण व्यवस्थेची सद्यस्थिती |
| २.३ | अनुदानाचा अर्थ<br>२.३.१ अनुदानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>२.३.२ अनुदानाची सदयस्थिती<br>२.३.३ अनुदानाचे उद्देश<br>२.३.४ अनुदानाचे प्रकार<br>२.३.५ अनुदानाचे आर्थिक परिणाम<br>२.३.६ शिक्षण अनुदान<br>२.३.७ शिक्षण अनुदानाचे प्रकार<br>२.३.८ शिक्षण अनुदान संहिता |

# शिक्षण व अनुदानासंदर्भातील साहित्याचा परामर्श

## २.१ प्रस्तावना :-

अथर्ववेदात एक मंत्र आहे, शं सरस्वती सह धामिरस्तु। म्हणजेच शिक्षणाने जीवनात विवेकता हा गुण जागृत व्हायला हवा. ज्याद्वारे दुर्गुणांना सोडून सदगुणांना स्विकारून शकतो. अशा या शिक्षणाचे अर्थ समजून घेणे महत्वाचे आहे. अगदी प्राचीन काळापासून शिक्षणाचे लक्ष शुद्ध संस्कार आणि पवित्र भावना जागृत करणे हा राहिला आहे. शिक्षण आपल्यात चांगले संस्कार ,कुशल व्यवहार, परिश्रम आणि जीवनात, आयुष्यात यश प्राप्तीचा मार्ग दाखवितो. शिक्षणावर कोणत्याही देशाची आर्थिक व सामाजिक व्यवस्था टिकवून असते आणि शैक्षणिक विकासातून देशाचा आर्थिक विकास निगडीत असतो. असं म्हटलं जात की, मानवी जीवन अत्यंत दुर्लभ आहे आणि हया जन्मात सर्वात मोठी गोष्ट म्हणजे शिक्षण जे सदैव आपल्यासोबत राहते आणि त्याची विशेषता म्हणजे जितके शिक्षण वाटू तितकेच ते वाढतं. पूर्व राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अमूल्य योगदान दिल आहे. त्यांच्या मते, जर शिक्षण योग्य प्रकारे दिले तर समाजातील अनेक वाईट गोष्टी नष्ट होतील. तसेच शिक्षण देणे म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे तर त्यात बौध्दिक वाढ व लोकतांत्रिक भावनांचा विकास महत्वाचा आहे. ज्यातून एक जागृत नागरिक बनतील आणि त्यातून निरंतर शिक्षणाची प्रवृत्ती जागृत होईल.

## २.२ शिक्षणाचा अर्थ :-

शिक्षण हा शब्द शिक्षा या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ शिकणे उपदेश करणे ज्ञान प्राप्त करणे असा आहे. शिक्षण या शब्दासाठी Education हा इंग्रजी प्रतिशब्द वापरला जातो. Education या शब्दाच्या लॅटीन भाषेनुसार दोन व्युत्पत्ती आलेल्या आहेत.

१. Educare - to bring up संगोपन करणे, वाढविणे, संवर्धन करणे.

२. Educere - to lead out  पुढे नेणे, उन्नयन करणे.

व्युत्पत्तीशास्त्रीय विचारधारेतून पाहिल्यास शिक्षण हा शब्द शास् या मूळ संस्कृत धातुपासून आलेला आहे. त्याचा मूळ अर्थ शिस्त लावणे, नियंत्रण करणे, अध्यापन करणे असा आहे. विद्या हा शब्ददेखील कित्येक वेळा शिक्षणाला समानार्थी शब्द म्हणून वापरला जातो. त्यात मूळ धातू विद् हा आहे. विद् या शब्दाचा अर्थ जाणणे, ज्ञान करून घेणे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते, ‘‘भारतीय पंरपरेप्रमाणे शिक्षण म्हणजे केवळ उदरनिर्वाहाचे साधन नव्हे , विविध विचारांचे उद्यान नव्हे, नागरिकत्वाच्या जोपासनेची शाळा नव्हे तर आध्यात्मिक जीवनाचा आरंभ आहे’’.

याबाबत श्रीकृष्णानेही म्हटले आहे ‘‘न ही ज्ञानेन सदृश्य पवित्रमिह विदयते’’ ज्ञानासारखे पवित्र काहिही नाही तर सन १९९८ चे नोबेल परितोषिक विजेते भारतीय अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते भारतातील दारिद्रय निर्मूलनासाठी शिक्षणक्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होणे गरजेचे आहे. दारिद्रय, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी या समस्या शिक्षणाच्या विकासानेच सुटू शकतात म्हणून शिक्षण विकासाचे प्रमुख ध्येय मानून त्याच्या अंमलबजावणीसाठी पुरेशी आर्थिक तरतूद अपेक्षित आहे.

समाजातील कोणत्याही व्यक्ती संदर्भात शिक्षण ही त्या व्यक्तीच्या जन्मापासून मुत्यूपर्यंत चालणारी अखंड प्रक्रिया आहे. जीवन हे गतीमान आहे. या विज्ञानयुगात विज्ञानाचा जीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तन समाजात रूजवायचे कार्य करते. प्रत्येक माणूस हा शिक्षणाच्या प्रक्रियेतून गेला पाहिजे. शिक्षण ही व्यक्तीगत विकासाची प्रक्रिया आहे. शिक्षण हे व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासाचे व समाज हा देशाच्या आर्थिक विकासाचे साधन आहे. म्हणजेच शिक्षण हे साधन तर आर्थिक विकास हे साध्य आहे. जॉन डयुईच्या मतानुसार, सामाजिक व्यवहार व परंपरागत उद्दिष्टांमध्ये व्यक्तिला सहभागी करुन घेऊन शिक्षणाला प्रारंभ केला पाहिजे. मुलांच्या शक्तिला सामाजिक गरजांतून आवाहन मिळून त्यातूनच खरे शिक्षण होते. या शिक्षणाचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी काही शिक्षण तज्ञांच्या मताचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरेल.

१. बाऊन यांच्या मते, ''जेणेकरून व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवून आणून त्याद्वारा एकंदर समाजामध्येही विकास घडून येईल या हेतूने जाणीवपूर्वक नियंत्रण केलेली प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय.''

२. Gates - ''progressive change in the behaviour.''

३. रुसो यांच्या मते, ''बालकांच्या नैसर्गिक, आंतरिक शक्ती क्षमतेचा विकास म्हणजे शिक्षण होय. ''

४. जॉन डयूई यांच्या मते, ''शिक्षण हे जीवनापासून विभक्त नसून शिक्षण हे जीवनच आहे.''

शिक्षणामध्ये व्यक्तिच्या व्यक्तिमत्वातील सर्व अंगाचा सर्वांगिण व समतोल विकास समाविष्ट आहे. शिक्षण ही एक नैसर्गिक व स्वयंस्फुर्त प्रक्रिया आहे. शिक्षण ही प्रक्रिया शास्त्र आहे आणि कलाही आहे. शिक्षणामुळे संस्कृती व सभ्यतांचे सरंक्षण होते. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे.

## २.२.१. भारतीय शिक्षणाचा इतिहास :-

भारतीय शिक्षणाच्या इतिहासातील वैदिक काळ हा पहिला टप्पा होय. ज्यावेळेस संपूर्ण जग हे अज्ञानाधंकारात होते त्यावेळेस संपूर्ण जगाला ज्ञानाचा प्रकाश देण्याचे कार्य एकटया भारताने केले. भारताचा हा अत्यंत गौरवशाली काळ होता.

भारतीय शिक्षणाच्या इतिहासाच्या अभ्यासात आपणास प्राचीन काळाचा सर्वप्रथम विचार करावा लागतो. प्राचीन काळातील शिक्षणाचा प्रारंभ आपणास ऋगवेदात दिसून येतो. ब्रम्हचर्य, तप, योगाभ्यास, मंत्र, श्रवण, मनन, अध्ययन, स्वाध्याय हे शिक्षणाचे स्वरूप होते. व्यक्तींच्या जन्मापासून ते मुत्यूपर्यंत जवळ जवळ ४० संस्कार मानवावर व्हायचे. विदयेचा शुभारंभ हा उपनयन संस्कारानंतर व्हायचा तसेच समाजाचे चार वर्ण होते. त्यात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य यांना विदयार्जनाचा अधिकार होता परंतु शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.

प्राचीन काळात शिक्षणासाठी गुरूकूल पद्धती होती. परंतु गुरूकूलात पाठविण्याअगोदर मुलांना अक्षर ज्ञान घरीच दिल जायचं. घरीच आई-वडील, गुरू हे मौखिक रुपात श्लोक, पौराणिक कथा यांचा अभ्यास करवून घेत. गुरूकुलात विद्यार्थी गुरुसोबत त्यांच्या आश्रमात राहत. त्यांचा पेहराव, राहणीमान, खाणं-पिणं हे नियमानुसार असे. गुरूकुलामध्ये विद्यार्थी जीवन हे शिष्टाचार, मर्यादा आणि आत्मसंयमाने पूर्ण होत. प्रत्येक विद्यार्थ्यांला साधे जीवन जगण्याचे शिक्षण मिळत असे, वैदिक काळात गुरुचे स्थान हे सर्वोच्च होते. गुरू ही विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास करणे हे कर्तव्य मानयचे. प्राचीन काळात दिली जाणारी विद्या ही निःशुल्क असायची. शिक्षण समाप्त झाल्यानंतर गुरूंना गुरू दक्षिणा देण्याची पद्धती होती.

प्राचीन भारतात शिक्षणाचे तीन महान केंद्र होते. तक्षशिला, नालंदा आणि विक्रमशिला विश्वविदयालय. तक्षशिला विश्व विदयालयात ब्राम्हण, बौध्द दर्शन, साहित्य, अर्थशास्त्र आणि वैदयकीय ग्रंथ लिहीले गेले तर नालंदा विश्वविदयालयात हे संपूर्ण विश्वाचे ज्ञान - विज्ञानाचा मार्गदर्शक होते.

त्याच वेळी इ.स.पूर्व ५ मध्ये भारतवर्षात महात्मा बुध्द अष्टांग मार्ग सांगितले. त्याचप्रमाणे बौध्द मठामध्ये प्राथमिक शिक्षा दिली जायची. ज्यात बालपोथी शिकविली जाई ज्यात वर्णमालेचे ४९ अक्षर होते. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी व्याकरण धर्म, ज्योतिष दर्शन आणि आयुर विज्ञान (मेडिकल सायंन्स) सारखे विषय होते.

मुस्लीम राजवटीत सुरुवातीस शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. परंतु मुस्लीम राजा बाबरने मदरसे व मकतब यांचा पुनर्निमाण करून शिक्षणाकडे लक्ष दिले. त्यानंतर राजा अकबर, जहांगीर यांनी शिक्षण व्यवस्थेत लक्ष देण्यास सुरूवात केली.त्यातूनच प्राथमिक शिक्षण उच्च शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाचा विकास झाला.

## २.२.२ भारतीय शिक्षण व स्त्री :-

२१ व्या शतकाचा पहिला दशक स्त्री शिक्षणासंदर्भात खूप महत्वपूर्ण ठरले. स्त्री शिक्षणाविषयक इतकी जागृकता या आधी पहायला मिळाली नव्हती. परंतु हया पूर्वी स्त्री शिक्षणाच्या स्थितीचा आढावा होणे महत्वपूर्ण ठरेल.

प्राचीन काळात स्त्रियांना उपनयन संस्कारचा अधिकार होता. तर साहजिकच शिक्षणाचा अधिकार हा होताच. या युगात आजीवन ब्रम्हचर्य पालन करणाऱ्या विद्यार्थ्यास जसे ब्रम्हवादी म्हणत तसंच विदयार्थीनीस ब्रम्हवादिनी म्हणत, त्या काळात मुलींना साहित्य, नृत्य, संगीत काव्य रचना, यासारख्या विषयांचे शिक्षण दिले जाई. बौध्द धर्माचा विचार करता बौध्द धर्मातील स्त्रीयांना बौध्द संघात प्रवेशाचा अधिकार होता. त्यांना भिक्षुणी म्हणत त्यांना इतर भिक्षूप्रमाणे जीवन व्यतित करावे लागे. परंतु या संघातही सर्व स्त्रीयांना प्रवेश दिला जात नसे, सर्वसाधारण स्त्रियांना बौध्द शिक्षा पध्दतीत स्थान नव्हते. मुस्लीम राजवटीत तर स्त्री शिक्षणाची कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आली नव्हती. फक्त शाही घराण्यातील मुलींना मकबरा मध्ये जाऊन शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पण तिही व्यवस्था काही शहरांमधील शाही घराण्यातच अस्तित्वात होती. परंतु वेळेच्या गतीनुसार समाजात स्त्रीयांच स्थान व स्त्री शिक्षणाचा अधिकार कमी होत गेला.

## २.२.३ ब्रिटीश राजवट व भारतीय शिक्षण व्यवस्था :-

इ.स.१६०० मध्ये ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची स्थापना भारतात व्यापाराच्या उद्देशाने झाली आणि १७६५ मध्ये या कंपनीने संपूर्ण भारतावर कायदेशीर राज्य करण्यास सुरूवात केली. सुरुवातीला ही कंपनी भारतीयांच्या शिक्षणाबद्दल उदासिन होती. परंतु काही विशेष कारणास्तव १७८० मध्ये कलकत्याला कलकत्ता मदरसा व १७९१ मध्ये बनारसला संस्कृत कॉलेज ची स्थापना या कंपनीने केली आणि त्यातूनच भारतीय शिक्षण व्यवस्थेस आधुनिकता प्राप्त होण्यास सुरुवात झाली. त्यातच १८१३ च्या आज्ञापत्रानुसार शिक्षणात गुंतवणूक करताना प्राच्य शिक्षणाबरोबरच इंग्रजी व पाश्चिमात्य विषयावर जोर देण्यात आला. ब्रिटीश शासनाने आपल्या गरजेसाठी मेडिकल, इंजिनिअरींग आणि लॉ कॉलेजची स्थापना केली. त्यातच

१८५३ मध्ये शिक्षणाची प्रगती तपासण्यासाठी प्रथमच एक समिती नेमण्यात आली आणि त्यातच १८५७ मध्ये स्वांतत्र्यता युद्ध सुरू झाले आणि शिक्षणव्यवस्थेत बाधा निर्माण झाली. त्यातच १८५७ मध्ये कलकत्ता व मुंबई विदयापीठाची स्थापना झाली. १८८२ मध्ये सर विल्यिम विल्सन हंटर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षा आयोगाची नियुक्ती झाली. त्यात असे ठरविण्यात आले की, शिक्षणात वैयक्तिक प्रयत्न करावे, देशी विदयालये अधिक स्थापित करावी, सर्वसामान्य वर्गाचे शिक्षण हे उच्चवर्गीयांच्या शिक्षणाबरोबरच राहिल, प्रत्येक जिल्हयात एक माध्यमिक शाळा असावी व त्या शाळेचा माध्यम इंग्रजी असावे, तसेच शाळांना प्राप्त होणारे सहाय्य व अनुदान यावरही या समितीने विचार मांडले. त्यातच महात्मा ज्योतीबा फुले यांनी निःशुल्क शिक्षणाची मागणी केली तर १८७० मध्ये आर्य समाजाने दयानंद ऐंग्लो वैदिक कॉलेज व १८८९ मध्ये श्रीमती एनी बेझन्ट यांनी सेंट्रल हिंदू कॉलेजची स्थापना केली.

१९०१ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी एक गुप्त शिक्षा संम्मेलन भरविले. त्यात प्राथमिक शिक्षणासाठी योग्य रक्कम देण्याचे ठरले व शिक्षणाच्या अनुदानाची पद्धतीचा विचार करण्यात आला. तसेच आपणांस २००९ मध्ये जो अनिवार्य एवं निःशुल्क शिक्षणाचा अधिकार मिळाला त्याची मागणी १०० वर्षापूर्वी म्हणजे ब्रिटीश कालावधीत गोपाल कृष्ण गोखले यांनी केली होती. त्यातच गांधीजींनी वर्धा योजना १९३५ मध्ये सुरु केली तिचा उद्देश देशातील बालकांना राष्ट्रव्यापी, निःशुल्क व अनिवार्य शिक्षा देणे, शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी.असे होते.

अशाप्रकारे ब्रिटीश राजवटीतच भारतीय शिक्षणाच्या आधुनिकतेची नीव घातली गेली.

## २.२.४ स्वांतत्र्योत्तर काळ व शिक्षण पद्धत :-

१५ ऑगस्ट १९४७, हा भारतीय इतिहासातील सोनेरी दिवस आहे. त्यातच २६ जानेवारी १९५० दिवशी भारत संपूर्ण प्रभुत्व संपन्न लोकतंत्रात्मक राज्य बनला आणि तेव्हा पासून भारताच्या विकासाची खरी सुरुवात झाली. स्वातंत्र्यानंतर सर्व मुला मुलींना समान शिक्षण, समान अधिकार व समान विकासाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले गेले. स्वातंत्र्याच्या वेळी ६-११ वयोगटातील केवळ ३० टक्के मुलं १२-१७ वयोगटातील १० टक्के मुलं आणि १७-२३ वयोगटातील केवळ १ टक्के मुलं शिक्षण घेत होती आणि या

वर्षी फक्त १५ टक्के लोकसंख्या ही साक्षर होती म्हणजेच जवळजवळ ८५ टक्के लोकसंख्या हा अशिक्षित होती.

या सर्व गोष्टीचा विचार करता १९४८ मध्ये एक संम्मेलन घेण्यात आले. त्यात असे ठरविण्यात आले की, राज्यांनी शिक्षणास प्रथम स्थान दयावे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबर १९४८ मध्ये एक आयोग समिती नेमण्यात आली. त्यात उच्चशिक्षणाच्या विकासाबाबत विविध शिफारशी करण्यात आल्या.तर १९५२ मध्ये डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षा आयोगाची स्थापना झाली त्यात माध्यमिक शिक्षा प्रणालीचे दोष सांगून त्यावर शिफारशी सांगण्यात आल्या तर १९६४ मध्ये डॉ. कोठारी आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाची विशेषतः म्हणजे शिक्षणाच्या सर्व म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या स्तरांचा, अंगाचा इत्यंभूत अभ्यास करण्यात आला.

तसेच पहिली पंचवार्षिक योजनेच्या आधी १४-१७ वर्षातील विदयार्थी संख्या ६.४ टक्के होती. ती योजना काळात वाढून ९ टक्के वाढली आणि शिक्षणक्षेत्रामध्ये शासनाने गुंतवणूक केल्याचे दिसून येते तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ३२० कोटींचा अंदाजपत्रक शिक्षणक्षेत्रासाठी देण्यात आला. तसेच ५ मे, १९८८ मध्ये राष्ट्रीय साक्षरता अभियानाची सुरुवात केली ज्यात १९९१ मध्ये उपरोक्त व २००१ मध्ये ५ करोड भारतीयांना साक्षर बनविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले.

## २.२.४.१ शिक्षणाची ध्येय -

शिक्षण हे गतिशील आहे. देशपरत्वे , कालपरत्वे शिक्षणाची उद्दिष्टे बदलतात. आधुनिकीकरणाने शिक्षण क्षेत्रात अनेक बदल घडून येतात. आधुनिक शिक्षणाची ध्येय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे.

२. सामाजिक प्रगतीसाठी निरक्षरता नाहीशी करणे.

३. उत्पादन क्षमतेत वाढ करणे.

४. राष्ट्रीय एकात्मता साधणे.

५. विविध मुल्यांची जोपासना करणे.

६. लोकशाही जीवनपिढीचे दृष्टीकरण करणे.

७. आंतरराष्ट्रीय सांमजस्याची भावना निर्माण करणे.

८. व्यक्तिचे राहणीमान उंचविणे.

## २.२.५. भारतीय शिक्षणव्यवस्थेची सदयस्थिती :-

२०११ च्या दरम्यान झालेल्या जणगणना अहवालानुसार भारताची एकूण लोकसंख्या १,२१०,१९३,४२२ इतकी आहे व या लोकसंख्येपैकी ७४.०४ टक्के इतकी लोकसंख्या साक्षर असल्याचे आढळून येते.

देशात पंचवार्षिक योजनाद्वारे विविध शैक्षणिक योजनाचा विस्तार केला गेला त्याचाच परिणाम म्हणजे साक्षरतेच्या दरात झालेली वाढ होय. त्यात शासनाने २००९ मध्ये शिक्षणाचा अधिकार म्हणजेच अनिवार्य एवं निःशुल्क शिक्षणाचा अधिनियम लागू केला. जो २०१२ मध्ये संपूर्ण भारतात लागू करण्यात आला आणि त्याद्वारे कायदेशीर रित्या देशातील प्रत्येक बालकास साक्षर होण्याचा अधिकार मिळाला आहे.

## २.३. अनुदानाचा अर्थ :-

सामान्यतः अनुदान म्हणजे 'ज्या वस्तु व सेवा सर्वसामान्य लोकांना घेणे परवडत नाही त्या वस्तु व सेवांच्या खरेदीसाठी सरकारने केलेली मदत होय.' अनुदान हा राजकीय धोरणाचा एक महत्वपूर्ण साधन आहे. ही अनुदान करांमधुन प्राप्त होतात.

अनुदान हा शब्द लॅटिन भाषेतील Subsidum या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ इंग्रजीत Troops Standtioned in rejerce म्हणजेच ''राखीव व मान्यताप्राप्त खर्च होय''.

साधारणता अनुदान ही कायद्यानुसार सामाजिक व आर्थिक सोयी सुविधा देण्यासाठी दिली जातात. ही अनुदान सामाजिक कायदयासाठी राबविल्या जाणाऱ्या क्षेत्रामध्ये, कार्यामध्येच दिली जातात.

अनुदान देताना अंदाजपत्रकामध्ये कोणत्या गोष्टीसाठी ती दिली जावीत? त्याचा परतावा किती व काय? त्या क्षेत्रातील लाभार्थीचे प्रमाण यांचा विचार करुनच दिली जातात. भारतात अनुदानांवर इतक्या प्रचंड प्रमाणात खर्च होतो. जो इतर कोणत्याही देशामध्ये इतक्या प्रमाणात करत नाही. परंतु त्या खर्चा इतका परतावा मात्र मिळत नाही.

## २.३.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

सुरुवातीच्या काळात शाळा प्रथम इस्ट इंडिया कंपनी, मिशनरी वा खाजगी संस्थांकडून चालविल्या जात असत. इस्ट इंडिया कंपनीने वा शासनाने चालविलेल्या शाळांना पब्लिक स्कूल म्हटले जात असे. मिशनरी खाजगी संस्था वा व्यक्तींनी चालविलेल्या शाळांना खाजगी शाळा म्हटल्या जात असे. शासनाने चालविलेल्या संस्थांचा खर्च शासनामार्फत चालविला जाई. खाजगी संस्थांचा खर्च फी, देणग्या, वर्गणी इत्यादीमधून भागविला जात असे. या संस्थांना शासनाकडून काही प्रमाणात अनुदान मिळत असे. १८८४ साली वुडच्या खलित्याने खाजगी शाळांना मान्यता व अनुदान दयावे अशी प्रथम शिफारस केली होती. त्यानुसार मान्यतेचे नियम ठरविण्यात आले व पहिले कोड अथवा नियमावली १८५९ साली तयार झाली. आर्थिक सहाय्याबाबत सर अलेक्झांडर ग्रॅन्ट याने सुव्यवस्थित नियम करुन अनुदान संहिता १८६६ साली तयार केली.

गेल्या १०० वर्षात अनुदान संहितेत पुष्कळ बदल झाले आहेत. महाराष्ट्र राज्याची १९६२ साली स्थापना झाल्यानंतर १९६३ मध्ये शालेय नियमांचे एकसुत्रीकरण करण्यात आले. नंतरच्या वर्षात यात भर पडली. १९७१ साली महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शाळा संहिता छापून प्रसिध्द केले.

इस्टइंडिया कंपनीने १९१३ मध्ये भारतातील जनतेच्या शिक्षणाचा अधिकार मान्य केला. इस्टइंडिया कंपनीतर्फे शिक्षणासाठी आर्थिक तरतुदी उपलब्ध करुन दिल्या. परंतु शिक्षणासाठी सतत वाढणाऱ्या मागणीच्या तुलनेतही तरतुद अपुरी होती. त्यासाठी जादा आर्थिक तरतुद उपलब्ध होण्यासाठी शिक्षणाची फी आकारणी हा पर्याय स्विकारला.

शासकीय शाळेवर होणारा खर्च हा शिक्षकांचा पगार, इमारती साधनसामुग्री आणि विद्यार्थ्यांना विद्या वेतन देण्यासाठी केला जात असे. खाजगी संस्थांमधील खर्च हा मुख्यत्वे पगारावर व क्वचित इमारतीवर होत असे. खाजगी संस्थामध्ये सरकारी संस्थापेक्षा जास्त फी आकारली जात असे. मात्र शिक्षकांना शासकीय संस्थांमधील शिक्षकांपेक्षा कमी वेतन दिले जात असे. यामुळे खाजगी संस्था व शासकीय संस्था यांत बरीच असमानता निर्माण झाली. ही असमानता दूर करण्याच्या उद्देशाने शासनाने खाजगी संस्थांमधील शिक्षकांची वेतनश्रेणी निश्चित केली आणि अनुदाने देण्यास सुरुवात केली.

## २.३.२ अनुदानाची सद्यस्थिती :-

१९९६-९७ च्या अंदाजपत्रकात सादर करताना तात्कालिन अर्थमंत्र्यांनी अनुदानाबाबत भाष्य केले. त्यानुसार त्यांनी अनुदानाचे दृश्य व अदृश्य असे विभाजन केले. तसेच अनुदान कोणत्या क्षेत्रांना दयावे? त्याचे प्रमाण किती असावे? प्रत्यक्ष फायदा लोकांना पोहचावा या अनुदानांचा उपभोग समाजाला घेता यावा यासाठी या अनुदानांची व्यवस्थित रचना केली पाहिजे. पूर्वी शासन अनुदान हे अदृश्य स्वरुपात म्हणजेच वस्तुच्या किंमती कमी करुन देत असे. पण आता शासन अनुदान हे प्रत्यक्ष रोख स्वरुपात देताना दिसून येते. समाज कल्याणाचा राजकोषीय धोरणातील अनुदान हे एक महत्वपूर्ण साधन आहे. सरकारद्वारे अंदाजपत्रकात अनुदानांचे नियोजन केलेले असते. अनुदान हे समाज उपयोगी क्षेत्रातून घटकांना दिले जाते. परंतु या अनुदानामुळे राजकोषिय तूट ही वाढते आणि भारताच्या दृष्टीने विचार करता अनुदानांमध्ये वाढच

दिसून येते. अनुदान हे सर्वसाधारणपणे मुलभूत अशा उत्पादक घटकांनाच दिले जाते. अनुदान हे दुर्मिळ वस्तूंना कमी प्रमाणात दिले जाते. १९९४ - ९५ पर्यंत राज्य शासन व केंद्र सरकार हे स्वतंत्रपणे विविध अनुदान देत असत परंतु १९९४ -९५ नंतर केंद्र व राज्य शासन यांनी एकत्र येऊन अनुदान देण्यास सुरुवात केली. १९९४-९५ मध्ये गुणात्मक क्षेत्र जसे शिक्षण आरोग्य यावर एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून १,३७,३३८ कोटी (१४.४) खर्च अनुदान स्वरुपात देण्यात आला.

आर्थिक तत्वाप्रमाणे अनुदानामुळे वस्तूच्या किंमती कमी होतात तर करांमुळे वस्तूच्या किंमतीत वाढ झालेली दिसून येते म्हणजेच अनुदान व कर यामध्ये व्यस्त संबंध दिसून येतो.

## २.३.३ अनुदानांचा उद्देश :-

१. अनुदानांचा उद्देश सामाजिक कल्याण हा आहे. सर्वसाधारणपणे वैयक्तिक कल्याणापेक्षा सामाजिक कल्याण करणे हा प्रमुख उद्देश अनुदानांचा आहे.

२. अनुदानामध्ये बाह्यता दिसून येते.

३. अनुदान हे गुणात्मक क्षेत्रांना देण्यात यावे, ज्याद्वारे उत्पादकतेत वाढ होते.

## २.३.४ अनुदानाचे प्रकार :-

अनुदानाचे खालीलप्रमाणे काही प्रकार दिसून येतात.

१. रोख अनुदान

२. व्याज किंवा कर्जावरील अनुदान

३. कर अनुदान

४. समभाग अनुदान

५. आधारभूत अनुदान

६. नियमित अनुदान

## २.३.५ अनुदानांचे आर्थिक परिणाम :-

अनुदानांचे प्रामुख्याने चार आर्थिक परिणाम दिसून येतात.

१. समानता परिणाम :-

२. पुर्न विभागणी परिणाम :-

३. राजकोषीय परिणाम :-

## २.३.६ शिक्षण अनुदान :-

शिक्षण अनुदानाचा विचार करता कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकास हा बऱ्याच अंशी त्या देशातील शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असतो. अशा गुणात्मक क्षेत्राचा विकास होण्यासाठी अनुदान देणे अनिवार्य ठरते.

शासन हे देशाच्या अंदाजपत्रकात अनुदानांची जी तरतूद करते त्यात शिक्षणासाठी देखिल अनुदानची तरतूद करते. देशाच्या वार्षिक अंदाजपत्रकात व अर्थसंकल्पात शिक्षणासाठी केलेली तरतूद शिक्षणाच्या प्रत्येक स्तराचा विकास घडवून आणू शकते. शिक्षणावर दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च होतात त्यातून देशातील व्यक्तीच्या विकास पर्यायाने समाजाचा आर्थिक व सामाजिक राष्ट्राचा विकास होतो.

## २.३.७ शिक्षण अनुदानाचे प्रकार :-

देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील शिक्षणाची महत्वाची भूमिका लक्षात घेऊन प्राथमिक स्तरावर, माध्यमिक स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर अनुदान दिले जाते.

**अ) प्राथमिक शिक्षण व अनुदान :-** महाराष्ट्रात ५६,३९४ प्राथमिक शाळा असून त्यामधून सुमारे ९९.३६ लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. सुमारे २.६६ लाख प्राथमिक शिक्षक यात काम करीत आहेत. राज्यात तुरळक लोकसंख्या असलेल्या वस्त्या सोडल्यास इतर सर्व खेडयांतून प्राथमिक शिक्षणाची सोय शासनाने केली आहे. ग्रामीण व अनधिकृत नगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शिक्षणाचे व्यवस्थापन व प्रशासन जिल्हापरिषदांकडे आहे. शहरी विभागातील प्राथमिक शिक्षणाची सोय शासनाने केली आहे. ग्रामीण व नगरपालिका क्षेत्रातील

प्राथमिक शिक्षणाचे व्यवस्थापन व प्रशासन जिल्हापरिषदांकडे आहे. शहरी विभागातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी आणि त्यांचे व्यवस्थापन अधिकृत नगरपालिका व त्यांची शिक्षण मंडळे, महानगरपालिका वा त्यांची शिक्षण मंडळ यांच्याकडे आहे. या शिक्षणासाठी महानगरपालिकांना अनुदान दिले जाते.

**आ) स्थानिक संस्थाचे अनुदान :-** प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदांना १०० टक्के दराने अनुदान देण्यात येते. शासनाने विहित केलेल्या निकषानुसार अनुज्ञेय असलेले प्राथमिक शिक्षकांचे वेतन व भत्ते तसेच साहित्य खर्च शासकिय अनुदानास पात्र समजण्यात येतो.

**इ) मान्य खाजगी प्राथमिक शाळांना अनुदानः –** खाजगी प्राथमिक शाळांना त्यांच्या मान्य खर्चाच्या ६६$^{२/३}$ अथवा तूट यांपैकी जे कमी असेल एवढे सहायक अनुदान दिले जाते. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांना जिल्हा परिषद जे अनुदान देते त्याची १०० टक्के प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते. मात्र या शाळांना मान्य दराने फी आकारणे आवश्यक आहे.

**ई) माध्यमिक शिक्षण अनुदानः-** महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षण हे मुख्यत्वे खाजगी संस्थांच्या ताब्यात आहे. महाराष्ट्रात अनुदानित तत्वावर मान्यता आलेल्या माध्यमिक शाळांना सन १९६३ - ६४ या वर्षापासून सेकंडरी स्कूल कोडप्रमाणे अनुदान दिले जाते. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार नोंदणी असलेल्या आणि अनुदानित तत्वावर मान्यता असणाऱ्या शाळांना पुढील चार प्रकारचे अनुदान शासनाकडून मिळते.

**क) वेतन अनुदानः-** सर्व मान्य पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व इतर मान्य वेतनविषयक फायदे यांवरील खर्च अनुदानास पात्र समजला जातो.

**ख) वेतनेतर अनुदानः-** मागील वर्ष मान्य खर्चाच्या बाबींवर होणारा खर्च हा अनुदानास ग्राहय धरला जातो. हे वेतनेतर अनुदान माध्यमिक शाळेच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांवरील खर्चाच्या १२ टक्के एवढया मर्यादेपर्यंत दिले जाते.

ग)	**इमारत अनुदान :-** मागील वर्षी शाळेने इमारतीच्या भाडयावर खर्च केलेली संपुर्ण रक्कम अनुदानास पात्र समजली जाते. शाळेला वेतन, वेतनेत्तर आणि इमारत यांमधून मिळणाऱ्या अनुदानातून फीव्दारा मिळणारे उत्पन्न कमी केले जाते.

घ)	**प्रोत्साहन अनुदान :-**सुव्यवस्थापन असलेल्या माध्यमिक शाळांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते.

ङ)	**महाविद्यालयांना अनुदान :-**अनुदानित तत्वावर महाविदयालये सुरू करण्यास परवानगी मिळालेल्या खाजगी महाविद्यालयांना शासन निर्णय ३.१०.१९७९ तील अनुदान सुत्राप्रमाणे अनुदान दिले जाते.

नवीन परवानगी मिळालेल्या कला, वाणिज्य व शास्त्र महाविदयालयांना पहिली तीन वर्षे अनुदान मिळत नाही. चौथ्या वर्षी महाविदयालयातील मान्य पदावरील पगाराच्या खर्चावरील २५ टक्के रक्कम अनुदान दिले जाते. पाचव्या वर्षी मान्य पदावरील पगाराच्या ५० टक्के सहाव्या वर्षी मान्य पदावरील पगाराच्या ७५ टक्के अनुदान मिळते. या अनुदानाच्या ठळक तीन बाबी आहेत.

१.	महाविदयालयातील एकूण मान्य पदावरील अध्यापकांचे संपूर्ण वेतन व भत्ते शासनामार्फत दिले जातात.

२.	महाविदयालयाच्या इमारतीच्या दुरुस्ती व देखभालीचा खर्च काही ठराविक  प्रमाणात व काही निष्कर्षांनी मान्य केला जातो.

३.	प्राथमिक, माध्यमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व मोफत करण्याची जबाबदारी अनेक प्रगत राष्ट्रांनी व भारतातील काही राज्यांनी कायद्याने स्विकारलेली आहे.

## २.३.८ अनुदान संहिता :–

या संहितमध्ये शाळांना कोणत्या अटीवर मान्यता व अनुदान दयावयाचे हे सांगितले आहे. शिक्षणाचे जे नियंत्रण आज शासनाकडून होते त्यांचे स्वरूप यात स्पष्ट केले आहे. अनुदान संहितेचे स्वरुप

शासकिय आज्ञापत्रासारखे आहे. यात वेळोवेळी प्रसिध्द झालेले शासकिय ठराव (जी.आर) एकत्रित केलेले आहेत. १९७१ साली सुधारीत म्हणून प्रसिध्द करण्यात आलेल्या या संहितेत चार प्रकरणे आहेत. २५ परिशिष्टे व ७० विस्तारिका दिलेल्या आहेत.

# प्रकरण तिसरे

## संशोधन पध्दती

| अ.क्र. | तपशील |
|---|---|
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | समस्या विधान |
| ३.३ | संदर्भ साहित्याचा आढावा |
| ३.४ | अभ्यास विषयाचे महत्व |
| ३.५ | संशोधनाचे उद्दिष्टये |
| ३.६ | गृहितके |
| ३.७ | संधोधनाचे कार्यक्षेत्र व कालावधी |
| ३.८ | संशोधन पद्धती |
| ३.९ | अभ्यासाची व्याप्ती |
| ३.१० | संशोधनाच्या मर्यादा |
| ३.११ | संशोधनाचा आराखडा |
| ३.१२ | सैध्दान्तिक पार्श्वभूमी |

# संशोधन पध्दती

## ३.१. प्रस्तावना :-

कोणताही देश किंवा समाज आपली प्रगती करु शकतो. हे त्या देशातील लोकसंख्या व त्यांच्या सुशिक्षितपणावर अवलंबून असते. शिक्षण ही आपली नाही तर आपल्या व्यक्तिमत्वाची ओळख असते. २०११ च्या जणगणनेच्या अभ्यासा मधून असे लक्षात येते की, जवळजवळ २५ टक्के लोकसंख्या निरक्षर आहे.

भारत आज जगातील एक प्रमुख आर्थिक महाशक्ती आहे. चीननंतर सगळयात जलद आर्थिक विकासाचा दर भारताचा आहे. परंतु, हे ही सत्य आहे की, स्वातंत्र्यानंतर ६५ वर्षानंतरही सुद्धा जवळजवळ (२५.९६ %) लोक अशिक्षित आहेत.

जगातील शिक्षणाच्या स्थिती संबंधी युनेस्कोव्दारा जाहिर अहवालात भारत त्या २८ देशांमध्ये येतो, जे देश २०१५ पर्यंत शिक्षणाचा प्राथमिक शिक्षणाबरोबरच प्रौढ साक्षरतेचा विकास करावयाचा आहे.

मूले देशाचा भविष्य आहेत. त्याच्यावर देशाची प्रगती निर्भर आहे. त्यांना शिक्षित करण्याची जबाबदारी केवळ पालकांची नाही तर सरकारची पण आहे. त्यासाठी शासनाने विविध योजना तयार केल्या.

परंतु परिस्थिती अशी की, चांगली गुणवत्ता असणाऱ्या शिक्षण संस्था कमी होत आहेत व कमी गुणवत्ता संस्था तर बंदच होत आहेत. म्हणजेच प्राथमिक शिक्षणाची हिच स्थिती राहिली तर शिक्षणावर संकट येईल.

प्राचीन काळापासून राजांनी शिक्षणासाठी गुरूकुलांमध्ये अन्नधान्य पुरवठा, गुरूकुलांचे संरक्षण करणे यासाठी मदत केली. हे एक प्रकारचे अप्रत्यक्ष रुपातील शिक्षणासांठी दिलेले अनुदानच होते. पुढे ब्रिटीश कालावधीत १८१९ च्या सनदी कायद्यात भारतात शिक्षणाच्या प्रसारासाठी अंदाजपत्रकामध्ये १ लाख रु. ची तरतुद केली तसेच ब्रिटीश बोर्ड ऑफ कंट्रोल चे अध्यक्ष सर चार्ल्स वूड यांनी शिक्षणासंबधी खलिता तयार केला तसेच याच ब्रिटीश कालावधीत १८५७ मध्ये मुंबई, मद्रास व कलकत्ता विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. १९०४ मध्ये भारतीय विद्यापीठ कायदा बनविला आणि त्याद्वारे विद्यापीठाच्या विकासासाठी अनुदान म्हणून शासनाने ५ वर्षांसाठी प्रतिवर्ष ५ लाख रु. दिले तर १९०६ मध्ये बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले तसेच १९१२ मध्ये वायव्य सरहद्द प्रांतात प्राथमिक शिक्षण निःशुल्क करण्यात आले. त्यामुळे १९१३ पर्यंत भारतात एकुण ५ विद्यापीठे व १८५ महाविद्यालये होती. १९३५ मध्ये पायाभूत शिक्षणासाठी महात्मा गांधीनी वर्धा योजना सुरु केली. सन १९४८-४९ मध्ये राधाकृष्णन आयोग, १९६४ मध्ये कोठारी आयोग व १९८६ मध्ये नवशिक्षण धोरणामध्येही प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर भर देण्यात आला. या विविध धोरण व आयोगामध्ये शिक्षणाचा दर्जा, साक्षरतेचा दर वाढविण्यासाठी शासनाद्वारे अनुदानाच्या स्वरुपात मदत केली.

प्रस्तावित संशोधन अभ्यासामध्ये संशोधकाने ठाणे जिल्हातील शहापुर तालुक्यामधील प्राथमिक व माध्यमिक शाळांना प्राप्त होणाऱ्या सरकारी अनुदानांच्या परिणामांचा अभ्यास केला आहे. शिक्षण हा देशातील एक महत्वपुर्ण क्षेत्र आहे. या क्षेत्रामध्ये शासनाने अनुदान दिल्याने शिक्षण क्षेत्रातील बदलांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२ समस्या विधान :-

''सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हातील शहापुर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास (२००७-२०१३)'' हा सदर संशोधन प्रबंधाचा विषय आहे.

## • संदर्भ साहित्याचा आढावा :-

**श्री. कुलकर्णी** यांनी १९९७ मध्ये रायगड जिल्हयातील उच्च शिक्षणाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास हा आपल्या शोधनिबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे येथे सादर केला आहे. या शोधनिबंधात त्यांनी पुढील उद्दिष्टये विचारात घेतले आहेत. राष्ट्रीय, राज्यस्तरीय व जिल्हा स्तरावरील प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेणे, रायगड जिल्हयातील उच्च शैक्षणिक संस्थाच्या वाढीचा सखोल अभ्यास करणे, ज्या वर्गातील लोकांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळतो त्या वर्गाचा आर्थिक व सामजिक दर्जा तपासणे, उच्च शिक्षण संस्थाच्या आर्थिक समस्यांची कारणे शोधणे. या शोधनिबंधात असे लक्षात येते की, आर्थिक विकासासाठी शिक्षण हे महत्वपुर्ण आहे म्हणून शिक्षणाची उपभोगासाठी मागणी केली जाते. ज्याचा प्रत्यक्ष फायदा उपभोक्ता घेतो, उच्च शिक्षण हे शिक्षणाच्या त्रिकोणाचे सर्वोच्च टोक आहे. तसेच देशाच्या महत्वपुर्ण समस्या सोडविण्यासाठी उत्तम शिक्षण व्यवस्थेची गरज आहे त्यासाठी दुरस्थ शिक्षण हा शिक्षणाचा चांगला मार्ग आहे. उच्च शिक्षण संस्थाना सरकारकडून आर्थिक पुरवठा वाढविला आहे. जो ४९% वरून ९०% वाढला आहे. गेल्या ५० वर्षात शिक्षणात बदल झाला आहे.[१]

**श्री.रमेश सयाजी मावची** यांनी आदिवासी आश्रमशाळा एक चिकित्सक अभ्यास ( विशेष अभ्यास) धुळे जिल्हयातील साक्री तालुका ( २००१-२००८ ) हा शोधनिबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठ पुणे, येथे सादर केला आहे, या शोधनिबंधात पुढील उद्दिष्टे विचारात घेतली आहेत, आश्रमशाळेतील सोयी–सुविधांचा (भौतिक सुविधा) अभ्यास करणे, आश्रमशाळेतील निवास विदयार्थ्यांच्या भोजन, निवास व्यवस्थेचा अभ्यास करणे, आश्रमशाळेतील प्राप्ती व खर्च साधनांचे अध्ययन करणे. या शोधनिबंधात असे लक्षात येते की, सुरूवातीच्या काळात म्हणजेच २००२-०३ मध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

---

१.श्री. कुलकर्णी, (१९९७), रायगड जिल्हयातील उच्च शिक्षणाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे .

नंदुरबार मधील विदयार्थ्यांच्या संस्थेत घट झाली होती. मात्र २००६-०७ मध्ये विदयार्थी संख्या वाढली. तर शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील विदयार्थी संख्या २००४-०५ मध्ये ६६.४४% होती. या आश्रम शाळांना प्रत्येकी स्वतंत्र मैदान असुन बांधकाम सिंमेट व कॉंक्रिटचे आहे,सदर संशोधनासाठी संशोधकाने प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे.[२]

**श्री.आनंद (प्रितपाल सिंग )** यांनी १९८२ मध्ये पुणे विदयापीठास शैक्षणिक योजना सर्वेक्षणासाठी गरजेचे असणारे मानवी श्रमचा संदर्भात एक दृष्टीकोन हा शोधनिबंध सादर केला आहे. या संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे विचारात घेतली आहेत, प्रत्येक शिक्षणाच्या स्तरावर व शाखांवर होणाऱ्या खर्चाची पद्धती प्राप्त करणे, आर्थिक विकास व शिक्षणाचा संबंध स्पष्ट करणे, या संशोधनात उपलब्ध असणाऱ्या अभ्यासाचा उद्देश पुर्ण करणे सदर संशोधनात असे लक्षात येते की,अर्थविकास देशात श्रमशक्तीचा पर्याप्त वापर होण्यासाठी शक्य असल्यास मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. रोजगाराच्या सिमांत समस्या सोडविण्यापेक्षा प्रचंड प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दयावा. पण हया प्रकारच्या बदलासाठी श्रमशक्तीस गरज आहे ती आर्थिक योजनांची तरच हे बदल शक्य होतील. आर्थिक विकास हा शैक्षणिक समस्यातील त्रुटी काढून टाकण्यावर अवलंबून आहे. जेणेकरून अर्धविकसित देशात श्रमशक्तीचा व्यवस्थित उपयोग करून घेता येईल.[३]

**श्री.विन्सेन्ट इक्वेन्ट** यांनी शिक्षण उत्पन्न व वृद्धी शैक्षणिक अर्थशास्त्राचा एक अभ्यास हा शोधनिबंध १९८१ मध्ये पुणे विदयापीठास सादर केला. या संशोधनात पुढील उद्दिष्टे विचारात घेतली आहेत, शिक्षणाची आर्थिकमुल्य समजुन घेणे, ओळखणे, मोजण्याचा प्रयत्न करणे, आर्थिक वृद्धीसाठी शिक्षणामध्ये जी गुंतवणुक व योगदान दिले आहे, त्याचा मिळणारा परतावा अभ्यासणे. सदर संशोधनासाठी दुय्यम

---

२. रमेश सयाजी मावची, ( २००८-०९ ), आदिवासी आश्रमशाळा एक चिकित्सक अभ्यास, टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे.

३. श्री.आनंद प्रितपाल सिंग, (१९८२), शैक्षणिक योजना सर्वेक्षणासाठी गरजेचे असणारे मानवी श्रमचा संदर्भात एक दृष्टीकोन, पुणे विदयापीठ.

साधनसाधनांतील शासकीय अहवालाचा वापर करण्यात आला आहे तसेच प्राथमिक साधनांचा वापर केला आहे. या संशोधनात असे लक्षात येते की,शिक्षणापासुन प्राप्त होणाऱ्या बाहयता तपासण्यांसाठी कोणत्याही प्रकारचे साधन उपलब्ध नाही, तसेच मिळकत मोजण्याचे घटक म्हणजे क्षमता, लैगिंकता, धर्म व वैयक्तिक विकास हया घटकांमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. तसेच शिक्षणाची उत्पन्नक्षमता म्हणजेच शिक्षणातून उत्पन्नाची क्षमता प्राप्त होते. त्यास शिक्षणाचा परतावा म्हणतात. शिक्षण आणि उत्पन्नवाढ कोणताही देश सुशिक्षित लोकांमुळे दिवाळखोरीत निघत नाही. यावरून असे लक्षात येते की, शिक्षण ही देशाच्या प्रगतीची महत्वाची बाब आहे.[४]

**श्रीमती . उर्मिला प्रसाद** यांनी राष्ट्रीय बॅकाचा उच्च शिक्षणासाठी कर्ज माध्यमातून बजावलेल्या भुमिकांचा अभ्यास करणे (मुंबई विभाग) हा शोधनिबंध टिळक महाराष्ट्र विदयापीठास २०१० मध्ये सादर केला आहे. सदर शोधनिबंधात पुढील उद्दिष्टे विचारात घेतली आहेत, मुंबई मधील बॅकांनी दिलेल्या शैक्षणिक कर्ज योजनामध्ये झालेली वाढ व कामगिरी मुल्यमापन करणे, शैक्षणिक कर्जविभागातील वेगवेगळे प्रकार व वाढीचा अभ्यास करणे , शैक्षणिक क्षेत्रास कर्जपुरवठा करताना R.B.I ची नियंत्रकाची व विकासकाची भुमिका अभ्यासणे, शैक्षणिक कर्जपुरवठयातील समस्या व वादांचा अभ्यास करणे, राष्ट्रीयकृत बँकाद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जासंदर्भात भविष्यात वाढ करण्यासाठी उपाय सुचविणे. सदर संशोधनात असे लक्षात आले की, म्हणजेच राष्ट्रीयकृत बँकाद्वारे कर्ज योजनांचा लाभ घेणाऱ्या विदयार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २००१ ते २००८ चा विचार करता प्रतिवर्षी राष्ट्रीयकृत बँकाद्वारे ३०% कर्ज मागण्यांना मान्यता I मिळाली, याच काळात राष्ट्रीयकृत बँकांनी मधील S.B.I ने सर्वात जास्त शैक्षणिक कर्जपुरवठा केला आहे, शहरी भागांमध्ये उपनगर व गावांपेक्षा तुलनात्मकदृष्टया जास्त कर्ज पुरवठा केला जातो. आतापर्यत घेतलेल्या आढाव्यात आश्रमशाळात पुरविल्या जाणाऱ्या सोयीसुविधा , शैक्षणिक

---

४. श्री.विन्सेन्ट इक्वेन्ट, (१९८१), शिक्षण, उत्पन्न व वृद्धी शैक्षणिक अर्थशास्त्राचा एक अभ्यास, पुणे विदयापीठ.

कर्जपुरवठा श्रमशक्तीचा विकास, उच्चशिक्षणाच्या आर्थिक समस्या, आर्थिक विकासातील शिक्षणाचे योगदान या विविध गोष्टींचा अभ्यास केलेला आढळून येतो.[५]

**स्वाती सुभाष देसाई** यांनी २०१२ मध्ये संख्याशास्त्रीय तंत्राची शिक्षण क्षेत्र सार्वत्रिकरण उपयोजन व मुल्यमापनातील कामगिरी हा आपला शोधनिबंध श्री.जगदिश प्रसाद जाबरमल टिबंरेवाला विदयापीठ, राजस्थान येथे सादर केला आहे. सदर संशोधनात शिक्षक प्रशिक्षण प्रभावीपणा, मध्यान्ह भोजन, शाळेत दूध वितरण यामुळे शाळेत विदयार्थ्यांची उपस्थिती, सरकारी योजनांच्या वाढीमुळे विदयार्थ्यांची उपस्थिती विशेष करून मुलींची उपस्थिती या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला आणि त्यासाठी लॉटरी पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. सदर संशोधन करताना असे आढळून आले की, नमुना शाळांमध्ये विदयार्थी संख्या ही प्रति शिक्षक अधिक आढळून आली. परंतु विदयार्थी संख्येमध्ये २००५-०६ मध्ये घट होताना दिसुन आली. परंतु सर्वशिक्षा अभियान व सर्वांसाठी शिक्षण कायदयाने एकत्र येऊन हे प्रमाण कमी केल्याचे दिसते तर शिक्षकांबाबत विचार करता असे आढळून येते की, १३.७८ % शिक्षक हे बी.ए.बी एड.आहेत तर ८४% शिक्षकांनी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहेत , तर सदर संशोधन करताना असे आढळून आले की, प्रशिक्षण कार्यक्रम कालावधी १ दिवसांचा न ठेवता तो ५ ते ६ दिवसांचा असावा.[६]

**भारतातील पूर्व प्राथमिक शिक्षण थोडक्यात (भारतीय धोरण )** सदर लेख डिसेंबर २०१० मध्ये कॉन्सॅरटियम फॉर रिसर्च ऑन एज्युकेशन ॲसिस, ट्रान्सिशियन ॲण्ड इक्विटी (CREATE) या संस्थेने प्रसिद्ध केला असून सदर लेखामध्ये वरून असे समजते की, भारतात पूर्व प्राथमिक शाळा हया अधिक प्रमाणात असून त्यात मुलांची उपलब्धी ही अधिक प्रमाणात दिसून येते. पूर्व प्राथमिक शिक्षण हे तरूणांच्या विकासासाठी महत्वपूर्ण आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण ही पहिली पायरी आहे जी मुलांना या जगात निरोगी व

---

५. श्रीमती. उर्मिला प्रसाद, (२०१०), राष्ट्रीय बॅकाचा उच्च शिक्षणासाठी कर्ज माध्यमातून बजावलेल्या भुमिकांचा अभ्यास करणे (मुंबई विभाग), टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे.

६. स्वाती सुभाष देसाई, (२०१२), संख्याशास्त्रीय तंत्राची शिक्षण क्षेत्र सार्वत्रिकरण उपयोजन व मुल्यमापनातील कामगिरी, श्री.जगदिश प्रसाद जाबरमल टिबंरेवाला विदयापीठ, राजस्थान .
Weblink - http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/6903/1/swati%20thesis%2007.06.2012.pdf

हेतूपुर्ण जीवन जगायला शिकवते. म्हणजेच मुलांचा संज्ञानात्मक विकास घडवून आणतो आणि असे हे पूर्व प्राथमिक शिक्षण बालवाडी तसेच खाजगी शाळांद्वारे पुरविले जाते. वरील चर्चेमध्ये असे समजते की, पूर्व प्राथमिक शिक्षणाचा शिक्षण प्रवेशामध्ये महत्वपूर्ण वाटा आहे. त्यातही समाजातील दुर्लक्षित गटातील मुलं विशेषतः मुली हया सरकारी शाळांवर अवलंबून असतात. तसेच हया सार्वजनिक पूर्व प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असावेत तसेच शाळांमध्ये निरोगी व योग्य वातावरण असणे गरजेचे आहे तर मोफत पौष्टिक अन्न वाटपासारख्या योजना राबविण्यात याव्या, आवश्यक शैक्षणिक साहित्य त्यांना पुरविण्यात यावे आणि त्यांची अदयावत पाहणी करावी. पूर्व प्राथमिक शिक्षणासाठीचे चांगले नियोजन व धोरणांची अमंलबजावणी केली तर त्यांची भविष्यातील गुणवत्ता वाढेल.[७]

**जे.बी.टिळक** यांनी भारतीय शिक्षण सार्वजनिक अनुदान हा लेख जानेवारी २००४ मध्ये इकॉनॉमिक पॉलिटिकल विकली मध्ये सादर केला आहे. सदर लेखात भारतात शिक्षण अनुदान पातळी विशेषतः उच्च आहे की नाही, तिचे दर, खर्च, पुर्नप्राप्ती यासंबंधीत चर्चा केली आहे. जगातील सर्वच देशामध्ये शिक्षण हे सार्वजनिकरित्या देण्यात येते. प्राथमिक शिक्षण व उच्चशिक्षणासाठी राज्य प्रमाणवार अनुदान उपलब्ध करून येते. शिक्षण खर्चावर स्वातंज्योत्तर काळात वाढ झाली आहे त्यातून प्राप्त होणाऱ्या परताव्यासंबंधी अनेक युक्तिवाद झाले. सदर शोधनिबंधात असे लक्षात आले की, अनुदान हे फक्त मुलभूत शिक्षणासाठीच नाही तर उच्च तांत्रिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण यासाठीही राज्यसरकार अनुदान देते, शोधनिबंधात शिक्षणासाठीचा जलद पद्धतीने (Quick Review) विचार करून असा मुद्दा मांडला गेला की, राज्य अनुदान कमी करणे शक्य नाही आणि ते योग्यही नाही, राज्य अनुदान हे शिक्षण प्रणालीतील सर्वात प्रभावी बाब आहे त्याबाबत असे मत मांडले जाते की, भारतातील उच्च शिक्षणाबाबतची अनुदानांची परिस्थिती ही लोकशाही पद्धतीने समाजातील दुर्बल घटकांसाठी राहिल अशी व्यवस्था शोधण्याचा प्रयत्न

---

७. कॉन्सॅरटियम फॉर रिसर्च ऑन एज्युकेशन ॲसिस, ट्रान्सिशियन ॲण्ड इक्विटी (CREATE), डिसेंबर २०१०, भारतातील पूर्व प्राथमिक शिक्षण थोडक्यात (भारतीय धोरण ).

Weblink-http://www.nuepa.org/Download/Publications/Create/India%20Policy%20Brief/India_Policy_Brief_1.pdf

केला पाहिजे.शैक्षणिक अनुदानासंदर्भात एक सार्वजनिक धोरण म्हणून यू.जी.सी.ने १९९३ पासून असे विधित केले की, शिक्षणाच्या  सर्व क्षेत्रामध्ये अनुदान महत्वपूर्ण असून ते एकमेकांशी संबधित असतील. भारतामध्ये शिक्षणाच्या सर्व प्रकारामध्ये अनुदानाचा सढळपणे वापर करण्यात आला आहे. परंतु खाजगी शैक्षणिक संस्था हया शैक्षणिक अनुदान प्राप्ती बाबत समाधानी नाहीत, तर प्राथमिक शाळांमध्ये मोफत शिक्षण, मध्यान्ह भोजन, मोफत पाठयपुस्तक व शैक्षणिक साहित्य या मागील अनुदानामध्ये वाढ होत आहे आणि ही पद्धती एकंदरित समाजातील सर्व घटकांसाठी लाभदायक ठरली आहे.परंतु या शोधनिबंधामध्ये अनुदानास योग्य पर्याय मिळाला नाही.[८]

**डॉ. मेधा गुप्ते** यांनी २०१५ मध्ये सार्वजनिक फंड आणि भारतातील व्यावसायिक महाविदयालयांची अल्प वाढ हा शोधनिबंध सादर केला आहे. शिक्षणाचा अधिकार हा भारतातील मुलभूत हक्क आहे. भारतात १९९७ पर्यंत फक्त प्राथमिक शिक्षणास चांगल्या वा गुणवत्तापूर्ण घटक म्हणून अनुदान दिले जाई. मात्र भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने उच्च शिक्षणास ही गुणवत्तापूर्ण घटक – २ म्हणून अनुदान देण्यात यावे अशी मागणी वाढत आहे परंतु शिक्षण देणारी महाविदयालये कमी व विदयार्थी संख्या जास्त यामुळे व स्पर्धात्मक युगात सार्वजनिक निधीची कमतरता यामुळे शिक्षण क्षेत्रात खाजगीकरणात वाढ झाली आहे. भारतातील संशोधकांच्या मते, उच्च शिक्षणाने मागील काही वर्षापासून अभूतपूर्व बदलांना सामोरे जात आहे. कारण लोकसंख्या वाढ, मध्यम वर्गाचा उदय व आर्थिक बदल होय. सदर शोधनिबंधात सार्वजनिक खर्च, शिक्षणाचे खाजगीकरणाची गरज, खाजगी वित्त स्त्रोत व भारतातील व्यावसायिक प्रशिक्षण संस्थामधील वाढीचा अभ्यास केला आहे. संशोधकास असे वाटते की, शिक्षण क्षेत्र हे संपूर्णपणे सरकारच्या हाती असावे आणि शासनाने उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाना उत्तेजन दयावे. पण या खाजगी सस्थांनी शिक्षण देताना सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व लोकशाहीची मुल्य जपावीत व अध्ययन–

---

८. जे.बी.टिळक, (जानेवारी २००४),  भारतीय शिक्षण सार्वजनिक अनुदान,इकॉनॉमिक पॉलिटिकल विकली.

Weblink- http://nuepa.org/libdoc/e-library/articles/2004jbgtilak.pdf

अध्यापन प्रक्रिया उच्चप्रतिची प्रतिष्ठेची असावी याकडे लक्ष दयावे आणि हया खाजगी उच्चशिक्षण संस्थानी स्वतःचे हित न बघता देशाच्या हिताचा विचार करावा आणि हया सर्व बाबींचा समन्वय होऊन भारताचा एकसंघ शैक्षणिक उदय घेऊन आंतराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण झाल्या पाहिजेत.[९]

**नितीन प्रभुतेंडूलकर** यांनी २०१० मध्ये प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेची हमी हा आपला शोधनिबंध मुबंई विदयापीठास सादर केला आहे. सदर शोधनिबंधात सर्वशिक्षा अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्यातील मध्ये प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेचा दर्जाचे परिक्षण करून सदर कार्यक्रमात शिक्षण गुणवत्तेत वाढ होण्यासाठी उपाय सुचविणे यावर अभ्यास केला आहे. सदर संशोधनात प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेच्या संकल्पना प्राथमिक शाळांना उपयुक्त असे दर्जेदार निर्देशांक ओळखणे तसेच प्राथमिक शिक्षणातील मोठया दर्जाच्या मूल्यांकनासाठी व्यापक साधने तयार करण्यास मदत करणे, तसेच महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांची शिक्षणाची गुणवत्तेची सदयस्थिती अभ्यासणे आणि सर्व शिक्षा अभियानांतर्गत ठरविण्यात आलेले ध्येय पूर्तीसाठी म्हणजेच प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध क्रिया कार्यक्रम सुचविणे अशी उद्दिष्टे सदर शोधनिबंधात आढळून येतात. सदर शोधनिबंधात संशोधकाने असे निष्कर्ष मांडले आहेत की, शाळांमधील पायाभूत सुविधा या फक्त विकसित असू नयेत तर त्यांची देखभाल ही केली जावी, शाळांमध्ये क्रिडांगणांची व्यवस्था असावी. शाळांमध्ये राष्ट्रभक्ती, सांस्कृतिक ठेवा जपणारे मुल्यालक शिक्षणाची सुविधा दिली जावी आणि त्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा कार्यक्रमाची आखाणी केली जाते. त्याद्वारे विदयार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास होण्यास मदत होते. तसेच दुर्बल घटकांशी (गरिब विदयार्थी ) सहकार्यपूर्व वातावरण असावे. शाळेत शिक्षकांना अध्यापनासाठी, विविध नवीन उपक्रम करण्यासाठी मुख्याध्यापकांनी सहकार्य

---

९. डॉ.सौ.मेधा गुप्ते,२०१५ , सार्वजनिक फंड आणि भारतातील व्यावसायिक महाविदयालयांची अल्प वाढ, ग्लोबल जनरल पब्लिकेशन. यु.एस.ए.

Weblink-https://globaljournals.org/GJHSS_Volume15/3-Paucity-of-Public-Funds-and-Growth.pdf

करावे आणि त्यासाठी प्राप्त होणाऱ्या अनुदानाचे योग्यरित्या वापर व्हावा, तसेच शाळांचे नियमितपणे विविध शैक्षणिक संस्थाद्वारे मूल्यमापन केले जावे.[१०]

**निशित देसाई** असोशिएशन (NDA) यांच्या शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक (मे २०१६) या शोधनिबंधात भारतातील शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले आहेत हे लक्षात येते. भारतात प्राथमिक शिक्षण संस्था व उच्च शिक्षण देणाऱ्या तंत्रज्ञान संस्था हया शिक्षण क्षेत्राचा महत्वपूर्ण आधार आहेत. आर्थिक बाजारपेठामधील वाढती स्पर्धा यामुळे शिक्षणाच्या दर्जामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. आणि भारतीय शिक्षणाचे धोरण सुधारणा मार्गावर आहे त्यातच एप्रिल २००० मध्ये थेट परकीय गुंतवणूकदारांनी ९६४ दशलक्ष डॉलरची परकीय गुंतवणूक भारतात आकर्षित केली आहे. १९९१ नंतर भारत शासनाने शिक्षणक्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक १००% पर्यंत वाढ करण्याची परवानगी दिली गेली. संशोधकांच्या मते, जर आपण शिक्षण खर्च उभा करू शकत नाही तर परकीय देशांकडून मदत घ्यायला हरकत नाही. शोधनिबंधातून असे लक्षात येते की, भारतीय शिक्षणक्षेत्रात अनेक आव्हाने आहेत, पण त्यातही गुंतवणूक दाराला अनेक गुंतवणूकीच्या संधी आहेत. भारतात कर्त्या लोकसंख्येपैकी २/३ लोकसंख्या ही शिक्षण घेणारी आहे आणि त्यांना शैक्षणिक सुविधांच्या कमतरतेशी सामना करावा लागतो. यासाठी थेट परकीय गुंतवणूकीचा शिक्षण क्षेत्रात प्रवेश मिळवून आपले शैक्षणिक समस्या दूर करू शकतो.[११]

## ३.४. अभ्यास विषयाचे महत्व :-

शिक्षणाशिवाय मानवी जीवनास कोणतेही महत्व नाही. शिक्षणातूनच मनशक्ती, चेतना, सद्बुध्दी, विचारशिलता, धन तसेच ज्ञानाची वृध्दी होते. आपण नेहमीच विद्येने सुशिलता प्राप्त होते.

---

१०.नितीन प्रभुतेंडूलकर ,( २०१०), प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेची हमी,मुबंई विदयापीठ

११. निशित देसाई असोशिएशन ( NDA ), (मे २०१६) शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक.

Weblink-http://www.nishithdesai.com/fileadmin/user_upload/pdfs/Research%20Papers/Investment_in_the_Education_Sector.pdf

शिक्षणाने जीवनात यशाचा मार्ग प्राप्त होतो. शिक्षण मानवी जीवनाचा अविभाज्य अंग आहे. शिक्षणाशिवाय मानवी विकास शक्य नाही. सुशिक्षित व्यक्ती जीवनात पुढे जातो. आपले भविष्य उज्वल बनवितो. मानवास आत्मनिर्भर व स्वावलंबी बनवितो.

शिक्षणाने देशाची आर्थिक व सामाजिक व्यवस्था दृढ होऊन देशाचा आर्थिक विकास साध्य होतो. म्हणजेच समाजाचे भविष्य बनविण्यासाठी सगळयांनीच शिक्षणाचे महत्व समजून घेऊन त्याचा प्रसार केला पाहिजे.

प्राचीन काळापासून शिक्षणास विशेष महत्व दिले गेले आहे. परंतु भारतात स्वातंत्र्यापासुन ते आजपर्यंत शिक्षणाचा कमी प्रमाणात झालेला विस्तार ही खरोखर विचार करण्यासारखी बाब आहे. निरक्षरता एक अभिशाप आहे. जो आपल्या येणाऱ्या पिढ्यांच्या विकासात अडथळा आणतो. निरक्षर व्यक्ती स्वतःसोबत, परिवारासोबत देशाचा भविष्य सांभाळत नाही. त्यासाठी शिक्षणाच महत्व लक्षात येते.

प्राथमिक शिक्षणाचा आढावा घेतला तर लक्षात येते की, ब्रिटीश काळातही प्राथमिक शिक्षण वंचित राहिले. १८८२ ला महात्मा फुलेंनी सक्तीच्या शिक्षणाची सनद देऊन ब्रिटिशांवर फार परिणाम झाला नाही. १८८१ साक्षरतेचे प्रमाण ६.३ टक्के वरुन १९५१ मध्ये ब्रिटीश निघुन गेल्यानंतर १६.६ टक्के इतके झाले म्हणजे ७० वर्षात साक्षरता केवळ १० टक्के ने वाढली.

आज शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात स्वातंत्र्यानंतर ६५ वर्षे झाली तरी यश मिळाले नाही. याचे कारण शासकीय धोरण हे आहे. स्वातत्र्यानंतर पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये उद्योग उभारणीवर भर दिल्याने शिक्षणाला फारसे महत्व नव्हते. त्यामुळे जेव्हा जेव्हा नियोजन खर्चात कपात करण्याची वेळ आली तेव्हा पहिला फटका शिक्षणाला बसला. जर जपानसारख्या देशाने १ रुपयांपैकी ८५ पैसे प्राथमिक शिक्षणावर खर्च केले तर भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकुण खर्चापैकी प्राथमिक शिक्षणासाठी ५६ पैसे खर्च केले. त्यामुळे धोरणात्मक पातळीवर प्राथमिक शिक्षण हा शासनाचा उपक्रम बनला पाहिजे तरच गुणवत्तापुर्ण प्राथमिक शिक्षण मिळू शकेल.

आतापर्यंत घेतलेल्या आढाव्यात काही संशोधकांनी विद्यार्थ्यांना प्राप्त होणाऱ्या सोयीसुविधा, शैक्षणिक कर्जपुरवठा, मानवीश्रमशक्ती व शिक्षण, उच्च शिक्षणातील समस्या याचा आढावा घेतला आहे. इतर क्षेत्राशी तुलना करता शिक्षणास दिली जाणारी अनुदान ही जास्त आहेत. त्यामानात शिक्षणापासुन मिळणारा परतावा कसा आहे? हया अनुदानांचा पर्याप्त वापर होतो का?

तसेच, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हा उच्चशिक्षणाचा पाया आहे. परंतु प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा विकास झाला नाही. तर उच्चशिक्षणाबरोबरच देशाचाही विकास साध्य होणारा नाही. यासाठी सरकारी अनुदानांचा शाळांवरील परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ३.५. उद्दिष्ट्येः-

१. सरकारी अनुदानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे.

२. शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेणे.

३. सरकारी अनुदानांमुळे शाळांमध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

४. सरकारी शैक्षणिक अनुदानांच्या विनियोगाचा अभ्यास करणे.

## ३.६.गृहितकृत्य-

१. शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदान रकमेचा शैक्षणिक विकासासाठी योग्यप्रकारे उपयोग होतो.

२. शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदानाच्या रकमेचा योग्यप्रकारे उपयोग केल्यास सरकारी अनुदानामागील उद्देश साध्य होतात.

३. सरकारी अनुदानांमुळे प्राथमिक व माध्यमिक शाळामध्ये शैक्षणिक व भौतिक रचनात्मक बदल होऊन शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावतो.

४. सरकारी अनुदानांमुळे शिक्षकांच्या कौंटुबिक, आर्थिक स्तरात बदल होण्यास मदत होते.

५. शाळांच्या विकासामुळे विदयार्थ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सरकारी अनुदान मदत करते.

## ३.७. संशोधनाचे कार्यक्षेत्र व कालावधीः-

**अ) कार्यक्षेत्र :-**

संशोधनाचे कार्यक्षेत्र हे ठाणे जिल्हातील शहापुर तालुक्यापुरतेच मर्यादित असुन त्याची व्याप्ती ही मर्यादित आहे. तसेच शहापुर तालुक्यातील अनुदानित, विना अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्था व शासकिय शाळांपुरताच अभ्यासाचा विषय मर्यादित आहे.

**ब) कालावधी :-**

अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करित असतांना संशोधनाचा कालावधी विचारात घेतला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी ''२००८-२००९ ते २०१२-२०१३'' असा पाच वर्षांचा कालावधी विचारात घेतला आहे.

## ३.८. संशोधन पद्धतीः-

संशोधन समस्येच्या अध्ययनासाठी आवश्यक व योग्य माहिती गोळा करून गुणात्मक संशोधन करण्यासाठी नमुना पद्धतीचा वापर करण्यात आला.

माहिती संकलनासाठी प्राथमिक माहिती सामग्री व दुय्यम माहिती सामग्री या साधन सामुग्रीचा वापर करण्यात आला. प्राथमिक माहिती ही प्रश्नावली, मुलाखत व शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांसोबत चर्चा करुन मिळवली आहे. दुय्यम सामुग्री सरकारी अहवाल, वार्षिक, पुस्तके तसेच विविध मंडळे व समित्यांचे अहवाल इ. मधुन घेतली आहे.

नमुनाकरण नमुनानिवड, माहिती जमा करणे, माहितीचे संकलन, वर्गीकरण, सारणीकरण, पृथक्करणासाठी योग्य अशा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला आहे. सदर संशोधन प्रकल्पाची उद्दिष्ट गाठण्यासाठी व गृहितकृत्ये तपासण्यासाठी योग्य अशा शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधन अहवाल प्रचलित संशोधन पद्धतीत सादर केला आहे.

## प्राथमिक स्त्रोतः-

ठाणे जिल्हातील शहापुर तालुक्यातील शाळांवर सरकारी अनुदानाचा झालेला परिणाम अभ्यासतांना शहापुर केंद्र स्थानी मानुन त्याच्या सभोवतालच्या १५ कि.मी. क्षेत्रातील शाळांची हेतुपूर्वक निवड पध्दतीने केलेली आहे.

## १. नमुना निवड :-

अभ्यासासाठी स्तरित यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. त्यातील कोटा पध्दती व्दारे नमुना निवडण्यात आला. शहापूर तालुक्यातील एकूण ५०५ पैकी ५० शाळांची निवड करण्यात आली. एकुण शाळांच्या संख्येच्या १० टक्के प्रमाणे शाळांची निवड करण्यात आली त्यात ६ शासकीय व ४ खाजगी अनुदानित, ५ विना अनुदानित व ३५ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

## २. लाभार्थी :-

ठाणे जिल्हातील १३ तालुक्यापैकी नमुना म्हणुन निवडलेल्या तालुक्यातील शाळांचा एक लाभार्थी म्हणुन झालेला सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करणे यासाठी शहापूर तालुक्यातील ५० शाळांची लाभार्थी शाळा म्हणुन निवड केलेली आहे.

### ३. प्रश्नावली :–

प्रस्तुत अभ्यासासाठी लाभार्थीशाळा मधील अनुदानासंबधित सर्व प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी विस्तृत प्रकारची प्रश्नावली तयार करण्यात आली. हया प्रश्नवलीसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. ह्या प्रश्नावलीसाठी अधिक प्रमाणात माहिती मिळविण्यात आली.

## दुय्यम स्त्रोतः-

जिल्हा, तालुका व गावे यांची प्राथमिक स्वरुपाची विस्तृत माहिती जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालय त्यांच्या सहाय्याने प्राप्त केली. ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकीय माहिती, महाराष्ट्राची, आर्थिक पाहणी संशोधना संबंधीची मासिके, नियतकालिके, दैनिक इत्यादीचा वापर करुन माहिती गोळा केली आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, पुणे गोखले इन्स्टिटयुट ऑफ इकोनॉमिक यांच्या ग्रंथालयातील पुस्तके, संशोधन साहित्याचा अभ्यास करण्यासाठी वापरण्यात आली आहेत.

शैक्षणिक विकासासाठी प्राप्त एक सकारात्मक परिणाम म्हणजेच उत्पन्नाची समानता कारण कमी उत्पन्न व शिक्षण असणाऱ्या लोकांना आर्थिक विकासची कमी संधी प्राप्त होतात. उदा. एका अभ्यासामध्ये असे आढळुन आले की, माध्यामिक शिक्षणाने कामगार संख्येत १.१ ने वाढ झाली व त्याचाच परिणाम म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नात ४० ते ६० टक्के वाढ घडु शकते.

## ३.९. अभ्यासाची व्याप्तीः-

१. सदर संशोधन अभ्यास विषयाची भौगोलिक व्याप्ती शहापुर तालुक्यातील ५० शाळांपूरते मर्यादित आहेत.

२. संशोधन अभ्यास फक्त प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा संदर्भात आहे.

३. अभ्यासाचा कालावधी २००८-०९ ते २०१२-१३ आहे.

## ३.१० संशोधनाच्या मर्यादा :-

१. सदर संधोधन प्रकल्प फक्त शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील आर्थिक बदलांच्या प्रवृत्तीवर केंद्रित आहे.

२. सदर संशोधन अभ्यासाचे  निष्कर्ष इतर जिल्हातील शाळांना लागू पडतीलच असे नाही.

३. सदर संशोधन प्रकल्पात सरकारी अनुदान या फक्त एकाच घटकाचा विचार केला आहे.

## ३.११. संशोधन आराखडा :-

एकुण सहा प्रकरणामध्ये या संशोधनाचा आराखडा स्पष्ट केला आहे. पहिल्या प्रकरणामध्ये ग्रामीण विकासाची जागतिक, भारतातील,महाराष्ट्रातील आणि ठाणे जिल्हातील पार्श्वभूमी व शिक्षणाचा विकास याचा आढावा घेण्यात आला. दुसऱ्या प्रकरणामध्ये शिक्षण व अनुदानासंदर्भातील साहित्याचा आढावा घेण्यात आला. तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधन पध्दतीने विस्तारीत स्वरुप स्पष्ट केले आहे. चौथ्या प्रकरणामध्ये ठाणे जिल्हा व शहापूर तालुक्याची पार्श्वभूमी याचा आढावा घेण्यात आला आहे. पाचव्या प्रकरणामध्ये शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, विदयार्थी संख्या, शिक्षक संख्या व त्या शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या विनियोगाचे स्पष्टीकरण दिले आहे. तर सहाव्या प्रकरणामध्ये संशोधनाचे निष्कर्ष, गृहितकांची पडताळणी, सैद्धांतिक पडताळणी व शिफारशी सुचविल्या आहेत.

## ३.१२  सैध्दान्तिक पार्श्वभूमीः-

संशोधकाने सरकारी अनुदांनाच्या विनीयोगाचा अभ्यास करताना मानवी विकास निर्देशांकातील (Human Development Index) ज्ञान, शैक्षणिक कौशल्य या घटकांचा आधार घेतला आहे. यासाठी शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना मिळणारा शैक्षणिक सरकारी अनुदान कसा लाभदायक आहे हे सिद्‌ध करण्यासाठी संशोधकाने या घटकाचा आधार घेतला आहे.

आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्नाव्यतिरिक्त मानवी विकास निर्देशांक (HDI) उपयुक्त आहे. या मानवी विकासाच्या सहाय्याने आर्थिक विकासाचा वेग लक्षात घेतला जातो. हा मानवी विकास निर्देशांक हा शिक्षण (ज्ञान), आरोग्य व आहार या सर्वच दृष्टीकोनातून तयार केला जातो. आयुर्मान व साक्षरता यानुसार विभागलेली लोकसंख्या उत्पन्नानुसार विभागलेल्या लोकसंख्येपेक्षा जास्त उपयुक्त ठरते. समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढत असेल आरोग्यमान उत्तम राहत असेल तर उत्पन्नवाढीपेक्षा हा बदल आर्थिक विकासाच्या मोजमापाच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचा ठरतो.

मानवी विकास निर्देशांक  दीर्घायुष्य, ज्ञान व जीवनमान हे तीन प्रमुख निर्देशांक मिळून तयार केला जातो. दीर्घायुष्य  हे सरासरी आयुमानच्या सहाय्याने मोजले जाते. तर ज्ञान हे शैक्षणिक कौशल्य किंवा प्रौढ साक्षर प्रमाण किंवा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण यांच्या सहाय्याने मोजले जाते तर जीवनमान दर्जा हा राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहाय्याने मोजता येतो. तसेच १५ वर्षांपर्यंतच्या मुलांची शैक्षणिक प्रगती, प्रशिक्षित शिक्षक, एका शिक्षकामागे असलेली विद्यार्थी संख्या व एकुण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा विचार केला जातो.

निर्देशांक व आर्थिक विकासाचा जवळचा संबंध आहे. आर्थिक विकास हा मानवी विकास अभावी मंदगतीने होत आहे. मानवी विकास निर्देशांक देशातील, प्रांतातील वांशिक, भाषिक, धार्मिक, समूहातील मोठया प्रमाणावरील तफावतीवर प्रकाश झोत टाकत असतो. मानव विकास निर्देशांक हा अपेक्षित उद्दिष्टांचा मापन दंड होय.

# प्रकरण चौथे

## ठाणे जिल्हा व शहापूर तालूका परिसरातील शैक्षणिक व आर्थिक विकासाची पार्श्वभूमी

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| ४.१ | प्रस्तावना |
| ४.२ | ठाणे जिल्हयाची पार्श्वभूमी<br>४.२.१. ठाणे जिल्हयातील भुरूपे<br>४.२.२. ठाणे जिल्हयातील नदया व पाणीपुरवठा<br>४.२.३. ठाणे जिल्हयातील नैसर्गिक संपत्ती<br>४.२.४. ठाणे जिल्हयातील उद्योगधंदे<br>४.२.५. ठाणे जिल्हयातील शैक्षणिक सुविधा<br>४.२. ६. ठाणे जिल्हयातील लोकसंख्या<br>४.२.७. ठाणे जिल्हयातील साक्षरता |
| ४.३ | शहापूर तालुक्याचा आर्थिक व सामाजिक विकास<br>४.३.१. शहापूर तालुक्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>४.३.२. शहापूर तालुक्यातील दळण वळण सुविधा<br>४.३.३. शहापूर तालुक्यातील उद्योगधंदे, शेती व रोजगार<br>४.३.४. शहापूर तालुक्यातील नदया व जलाशय<br>४.३.५. शहापूर तालुक्यातील शैक्षणिक सुविधा<br>४.३.६. शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता |

# ठाणे जिल्हा व शहापूर तालूका परिसरातील शैक्षणिक व आर्थिक विकासाची पार्श्वभूमी

## ४.१. प्रस्तावना :-

संशोधनासाठी निवड झालेल्या नमुन्यातील शाळांची आर्थिक व सामाजिक स्थिती समजण्याकरिता त्या भागांची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक अभ्यास करणे आवश्यक आहे. या प्रकरणामध्ये अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी मध्ये भौगोलिक, सामाजिक व आर्थिक इ. घटकांचा सविस्तर अभ्यास करण्यात आलेला आहे. ठाणे हा महाराष्ट्रातील काही मोजक्या औदयोगिदृष्टया प्रगत जिल्हयांपैकी एक जिल्हा आहे.जो कोकणच्या कुशीत वसलेला शहापूर हा ठाणे जिल्हयातील सर्वात मोठा तालुका आहे. जो सहयाद्रीच्या पर्वत रांगामध्ये वसलेला आहे. या ठाणे जिल्हयाच्या व त्यातील शहापूर तालुक्याच्या सविस्तर माहितीचा संदर्भ घेतलेला आहे.

## ४.२. ठाणे जिल्हयाची पार्श्वभूमी:-

महाराष्ट्रातील प्रगत जिल्हयांपैकी ठाणे हा एक जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याचा नकाशा (नकाशा क्र.४अ) सोबत जोडला आहे. त्याचे स्थान उत्तरेकडील कोकण विभागातील आहे. ठाणे हे एक सुंदर , सुव्यवस्थित बंदर व व्यापारी केंद्र होते. प्राचीन काळी हया बंदरातून इजिप्त, बाबीलोन, ग्रीस, पर्शिया इत्यादी देशांबरोबर व्यापार चाले तसेच इथून देशांतर्गत व्यापारही चाले.

ठाणे जिल्हा हा कोकणाचा उत्तरभाग असून तो पुर्वेकडे सहयाद्रीच्या पर्वत रांगा व पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या किनारपट्टीच्या दरम्यान पसरला आहे. ठाणे जिल्हयाला ११२ चौ. किमी. लांबीची किनारपट्टी लाभली असून जिल्हयाचे भौगोलिक स्थान ७२.४५ आणि ७३.४८ पूर्व रेखांश व १८.४२ आणि २०.२० उत्तर अक्षांश मध्ये येते. जिल्हयाची दक्षिणोत्तर लांबी १४० किमी पूर्वपश्चिम रूंदी १०१ किमी आहे. जिल्हयाचा आकार त्रिकोणी असून (नकाशा क्र.४ब) पूर्वेला पुणे व अहमदनगर जिल्हे आहेत तर उत्तर

पूर्वेला नाशिक जिल्हा तर उत्तरेला गुजरात राज्य आणि केंद्रशासित दादरानगर हवेली हा प्रदेश आहे. हया जिल्हयाच्या पश्चिमेला अरबी समुद्र पसरलेला असून दक्षिणेला बृहन्मुंबई व रायगड जिल्हे आहेत. ठाणे जिल्हयाचे क्षेत्रफळ ९५५८ चौ. किमी. असून ते राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३.११ टक्के आहे. राज्यात जिल्हयाचा क्षेत्रफळाच्या दृष्टीने विसावा क्रमांक लागतो.

## ४.२.१. ठाणे जिल्हयाची भुरूपे :-

ठाणे जिल्हयात विविध भुरूपे आहेत. जिल्हयाचा पश्चिम भाग मैदानी आहे. तुंगार, जीवधन, तांदूळवाडी, टकमक इत्यादी डोंगर आहेत. जिल्हयाच्या पूर्वे सीमेवर सहयाद्री पर्वत आहेत. भुरूपाच्या उंच सखलपणावरून प्राकृतिक रचना समजते. प्राकृतिक रचनेनुसार जिल्हयाचे तीन भाग पडतात.

### १. सहयाद्रीचा डोंगराळ प्र्द्रेश :-

जिल्हयातील पूर्व भाग सहयाद्री पर्वतरांगांचा आहे. या भागात मुरबाड, शहापूर, जव्हार, मोखाडे व विक्रमगड या तालुक्याचा भाग येतो.

### २. नदयांच्या खोऱ्यांचा प्र्द्रेश :-

जिल्हयातील मध्यभाग बराचसा सखल आहे. यात उल्हासनगर ,कल्याण, भिंवडी,वाडे, डहाणू, अंबरनाथ व तलासरी या तालुक्याचा भाग येतो.

### ३. किनारी प्र्द्रेश :-

जिल्हयाचा पश्चिम भाग किनारी मैदानाचा आहे. यात डहाणू, पालघर, वसई, ठाणे या तालुक्याचा भाग येतो. जिल्हयातून पूर्वेस नाशिक जिल्हयात जाणारे रस्ते शिरघाट व थळघाटातून जातात. आग्नेयेस पुणे जिल्हयाच्या सीमेवरील नाणेघाट पुर्वीपासून वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. जिल्हयातील अर्नाळा किल्ला प्रसिदध आहे.

## ४.२.२. ठाणे जिल्हयातील नदया व पाणीपुरवठा :-

वैतरणा व उल्हास या ठाणे जिल्हयातील दोन प्रमुख नदया आहेत. ठाणे जिल्हयातील वैतरणा, तानसा , भातसा ही प्रमुख धरणे आहेत. तेथे मोठे जलाशय आहेत. मुंबई शहरास पाणीपुरवठा ठाणे जिल्हयातील काही तलावांतून होतो. तसेच नदया, तलाव, विहीरी यांचाही पाणीपुरवठयासाठी उपयोग केला जातो. वसई, पालघर, डहाणू, या भागात विहीरी जास्त आहेत.

## ४.२.३. नैसर्गिक संपत्ती :-

### १. वनसंपत्ती –

ठाणे जिल्हयातील डोंगराळ भागात वने आहेत. डहाणू, पालघर, शहापूर, जव्हार, वाडे, मोखाडे इत्यादी तालुक्यात दाट वने आहेत. या वनात साग, शिसव, ऐन, खैर, पळस, पांगारा, इत्यादी वृक्ष आहेत. याशिवाय वड, आंबा, चिंच, माड, हे वृक्षही आहेत. समुद्रकिनाऱ्यावर सरू व निलगिरी वृक्षांची लागवड केली आहे. जिल्हयात तानसा हे अभयारण्य असून त्यात बिबटया, वाघ, सांबर इ. प्राणी आहेत.

### २. खनिजसंपत्ती –

बॉक्साईट खनिजाचे साठे वसई तालुक्यातील तुंगारच्या डोंगरात आहेत. ठाण्याच्या खाडीत, उल्हास नदीच्या पात्रात घर बांधणीस उपयोगी पडणारी रेती आढळते. तर मुंब्रा हे बंदर असून येथे रेती काढली जाते. जिल्हयात ठाणे, कल्याण, अंबरनाथ, वसई, या तालुक्यात बेसॉल्ट नावाचा काळा कठीण खडक सापडतो. त्याचा उपयोग घर बांघणी, रस्ते, तयार करण्यासाठी होते.

### ३. सागरसंपत्ती —

समुद्रकिनाऱ्यावर मासे पकडतात. उत्ताण, अर्नाळा, माहीम, सातपाटी, चिंचणी, डहाणू इ. बंदरे मासेमारीसाठी प्रसिद्‌ध आहेत. वसई, भाईदर, डहाणू इ. ठिकाणी अनेक मिठागरे आहेत. समुद्रापासून शंख शिंपलेही मिळतात. वसई समुद्रात हाय हे खनिज तेलक्षेत्र आहे.

## ४.२.४. ठाणे जिल्हयातील उदयोगधंदे :-

महाराष्ट्र राज्यात ठाणे जिल्हा हा उदयोग धंदे वाढीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जिल्हयात अनेक लहान-मोठे उदयोग आहेत. ठाणे व शेजारच्या परिसरात विविध प्रकारचे कापड उदयोग आहेत. सुती व लोकरी कापडाच्या गिरण्या ठाणे येथे आहेत. रेशीम धागे व कापड भिंवडी येथे तयार केले जाते. भिंवडी येथील यंत्रमागावर कापड विणण्याचा उदयोग फार मोठा आहे. कृत्रिम रेशीम तयार करण्याचा कारखाना मोहने येथे आहे.

ठाणे-बेलापुर भागात लोह-पोलादापासून विविध वस्तू तयार करण्याचे कारखाने आहेत. निरनिराळ्या प्रकारची यंत्रे, धातूची उपकरणे तयार करण्याचे कारखाने ठाणे येथे आहेत. कल्याण व डहाणू येथे मोटारीचे सूटे भाग तयार करण्याचे कारखाने आहेत. औषधे व रसायनांचे कारखाने अंबरनाथ, भाईंदर, ठाणे येथे आहेत. विविध रंग व रसायने यांचे कारखाने ठाणे व भाईंदर येथे आहेत. कागदाची गिरणी ठाणे येथे आहे. प्लॅस्टिकच्या वस्तू उल्हासनगर व भाईंदर येथे तयार केल्या जातात. आगपेट्या तयार करण्याचे कारखाने अंबरनाथ व ठाणे येथे आहेत. विविध प्रकारचे खादयपदार्थ, फळांचा रस हवाबंद डब्यात भरण्याचे कारखाने तसेच पेयांचे कारखाने ठाणे व कल्याण येथे आहेत. दापचारी येथे मोठा दूध प्रकल्प असून पाली, सरळगाव येथे मोठा दूध शीतकरण केंद्रे आहेत. बांगडया तयार करण्याचे कारखाने तारापूर, चिंचणी भागात आहेत. भारतातील पहिला अणुवीज प्रकल्प ठाणे जिल्हयात तारापूर येथे उभारण्यात आला याशिवाय यंत्रसामग्री उपकरणांचे लहान-मोठे कारखाने ठाणे व उल्हासनगर भागात मोठया संख्येने आढळतात. ठाणे जिल्हयात अंबरनाथ, कल्याण, भिंवडी, ठाणे, बेलापूर, बदलापूर, तारापूर, मुरबाड येथे औदयोगिक वसाहती आहेत.

## ४.२.५. ठाणे जिल्हयातील शैक्षणिक सुविधा :-

ठाणे जिल्हयातील सन २०११-१२ मध्ये २५१५ प्राथमिक शाळा, १४५८ माध्यमिक शाळा, ४१४ उच्च माध्यमिक शाळा (कनिष्ठ महाविदयालयासह) आहेत. १ लाख लोकसंख्येमागे प्राथमिक शाळा ५३, माध्यमिक शाळा १५, उच्च माध्यमिक ४ व महविदयालय १ असे प्रमाण होते.

## ४.२.६. ठाणे जिल्हयातील लोकसंख्या :-

ठाणे जिल्हातील सन १९९१– २०११ च्या कालावधीतील लोकसंख्येचा तपशील तक्ता क्र. ४.१ मध्ये दिला आहे.


**तक्ता क्र. ४.१**

| वर्ष | | ग्रामीण | टक्के | नागरी | टक्के | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९१ | पुरुष | ९४९६१९ | ५१.१६ | १८४३२५५ | ५४.३२ | २७९२८७४ | ५३.२० |
| | स्त्री | ९०६३०० | ४८.८४ | १५४९९५२ | ४५.६८ | २४५६२४२ | ४६.७९ |
| | एकूण | १८५५९१९ | १००.०० | ३३९३२०७ | १००.०० | ५२४९११२६ | १००.०० |
| २००१ | पुरुष | ५२२७४६ | ४९.८९ | ७८०६३ | ५१.४९ | ६००८०९ | ५०.०९ |
| | स्त्री | ५२४९६४ | ५०.१० | ७३५१७ | ४८.५० | ५९८४८१ | ४९.९० |
| | एकूण | १०४७७१० | १००.०० | १५१५८० | १००.०० | ११९९२९० | १००.०० |
| २०११ | पुरुष | ११४८१२३ | ५१.४९ | ३२२९६२४ | ५४.७१ | ४३७७७४७ | ५३.८३ |
| | स्त्री | १०८१२५३ | ४८.५० | २६७२८४९ | ४५.२८ | ३७५४१०२ | ४६.१६ |
| | एकूण | २२२९३७६ | १००.०० | ५९०२४७३ | १००.०० | ८१३१८४९ | १००.०० |

(संदर्भ - जनगणना अहवाल १९९१, २००१, २०११)

# आलेख क्र. ४.१

## <u>ठाणे जिल्हयातील लोकसंख्या</u>




तक्ता क्र. ४.१ आधारे पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. ठाणे जिल्हयातील एकूण लोकसंख्या १९९१ मध्ये ५२,४९,१२६ होती जी २०११ मध्ये ८१,३१,८४९ इतकी झाली म्हणजेच २० वर्षात २८,८२,७२३ ऐवढी वाढ झाली.

२. १९९१ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी नागरी लोकसंख्या ६४.६४ टक्के होती तर २०११ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी ७२.५८ झाली. याचाच अर्थ औदयोगीकीकरणामुळे ठाणे जिल्हयातील नागरीकरण जलद गतीने झाले.

३. १९९१ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ३५.३५ टक्के होती तर २०११ मध्ये हे प्रमाण एकूण लोकसंख्येपैकी २७.४१ टक्के झाले. नोकरी व्यवसायामुळे लोक ग्रामीण भागातून नागरी भागात स्थलांतरीत झाल्याने बदल घडून आल्याचे दिसून येते.

## ४.२.७. महाराष्ट्र राज्य व ठाणे जिल्हयातील साक्षरता :-

एकंदरीत पाहता १९९१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्राची लोकसंख्या वाढली तर साक्षरतेमध्येही काही पटीने वाढ झाल्याचे दिसून येते. २०११ मध्ये जिल्हयाच्या एकूण साक्षरतेपैकी पुरुषांची साक्षरता ९०.९० टक्के होती. महाराष्ट्रामध्ये पुरुष साक्षरतेमध्ये ठाणे जिल्हयाचा १३ वा क्रमांक लागतो तर स्त्री साक्षरता ८०.७८ टक्के होती. एकूण राज्यात स्त्री साक्षरतेत ठाणे जिल्हयाचा ८ वा क्रमांक लागतो. या साक्षरता वाढीचे मुळ कारण जिल्हयातील शैक्षणिक सुविधांमध्ये झालेली वाढ व मुंबई उपनगराशी असलेली जवळीक होय. तक्ता क्र. ४.२ मध्ये ठाणे जिल्हयाची साक्षरता दिलेली आहे.


### तक्ता क्र. ४.२

| तपशील | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| महाराष्ट्राची साक्षरता | | | |
| पुरुष | ७६.५६ | ८६.०० | ८८.४ |
| स्त्रिया | ५२.३२ | ६७.०० | ७५.९ |
| एकूण | ६४.८७ | ७६.९ | ८२.३० |
| ठाणे जिल्हाची साक्षरता | | | |
| पुरुष | ७७.५६ | ८७.०६ | ९०.९० |
| स्त्रिया | ६०.२८ | ७३.१० | ८०.७८ |
| एकूण | ६९.५४ | ८०.६६ | ८६.१८ |

स्त्रोत :- Census of India (Maharashtra) Report 1991, 2001, 2011(Registar genral & Census commissioner India)

## आलेख क्र. ४.२

## <u>महाराष्ट्र राज्य व ठाणे जिल्हयातील साक्षरता</u>



| | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| महाराष्ट्राची साक्षरता | | | |
| पुरुष | ७६.५६ | ८६ | ८८.४ |
| स्त्रीया | ५२.३२ | ६७ | ७५.९ |
| ठाणे जिल्हाची साक्षरता | | | |
| पुरुष | ७७.५६ | ८७.०६ | ९०.९ |
| स्त्रीया | [illegible] | [illegible] | ८०.७८ |



**तक्ता क्र. ४.२ वरुन पुढील निष्कर्ष येतात.**

**१. ठाणे जिल्हयातील साक्षरता प्रमाण महाराष्ट्रातील साक्षरतेपेक्षा जास्त आहे.**

**२. २०११ मध्ये ठाणे जिल्हयातील पुरुष साक्षरतेच्या प्रमाणात १९९१ च्या तुलनेत वाढ झाली आहे तर स्त्री साक्षरतेच्या प्रमाणातही हया काळात वाढ झाली आहे.**

**३. महाराष्ट्रात आणि ठाणे जिल्हयात सुद्धा पुरुष साक्षरतेचे प्रमाण जास्त आढळून येते.**

## ४.३. शहापूर तालुक्याचा आर्थिक व सामाजिक विकास :-

ठाणे जिल्हयामध्ये एकूण १५ तालुके आहेत. शहापूर हे त्यापैकी एक सर्वात मोठा तालुका आहे. शहापूर हा प्रामुख्याने एक आदिवासी तालुका आहे. शहापूर तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १५७४३३.६६ हेक्टर असा आहे. शहापूर तालुक्याचा नकाशा (नकाशा क्र. ४ क) सोबत जोडला आहे. शहापूर तालुक्याची लोकसंख्या सन २००१ च्या जनगणनेनुसार २,७३,३०४ इतकी आहे. या तालुक्याचा विकास हा मोठया प्रमाणावर झालेला आपल्याला दिसून येतो. ठाणे जिल्हयापासून साधारणपणे ५६ कि.मी. अंतरावर असलेल्या या तालुक्याचे प्रशासकीय कामकाज हे शहापूर या ठिकाणाहून चालते. शहापूर तालुक्यात २३१ महसुल गावे आहेत. महाराष्ट्र शासनाने शहापूर तालुक्यास पर्यटन केंद्र म्हणून जाहिर केले आहे.

## ४.३.१ शहापूरची भौगोलिक पार्श्वभूमी व ऐतिहासिक इतिहास :-

भौगोलिक दृष्टया पाहता शहापूर हा सहयाद्रीच्या पर्वत रांगांनी व्यापला आहे. शहापूर हे महाराष्ट्रात १९.४५ नैऋत्य व ७३.३३ पूर्वे व्यापलेला आहे. त्यांची समुद्रसपाटी पासूनची उंची १५१ फिट उंच आहे.

शहापूर तालुका हा डोंगरदऱ्या व खोऱ्यांनी नटलेला आहे. तालुक्याच्या पश्चिमेला माहुली किल्ला हे प्रेक्षणिय स्थान आहे. पुर्वेला सहयाद्री पर्वत असून या पर्वत राजाच्या कुशीत तालुक्याला भुषणावर ठरणार आजा पर्वत आहे. तेथे वाल्मिकी ऋषीची समाधी आहे. हे पर्वत म्हणजे गिर्यारोहणाची प्रसिदध ठिकाणे आहेत.तसेच कासणेगाव येथे बौध्द धर्मीय लोकांसाठी बुद्‌धविहार आहे. तसेच मानसमंदिरम्‌ हे प्रसिद्‌ध जैन मंदिर आहे. तसेच आसनगाव येथे प्रसिद्‌ध असा गुरूद्‌वारा आहे. मुस्लीम धर्मीयांच्या मज्जिद आहेत. तर वेहळोली येथे ख्रिश्चन धर्मीयांसाठी चर्च आहे. यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनाने पर्यटन केंद्र म्हणून घोषित केले आहे. या शहापूर मध्ये विविध जाती धर्माचे लोक वर्षानुवर्षे एकत्र राहत आहेत. हयात हिंदु, जैन, बौध्द व मुस्लीम धर्मीय लोकांचा अंतर्भाव होतो. हिंदू मध्ये प्रामुख्याने कुणबी, मराठा, ब्राम्हण, वाणी, मराठा, लेवा पाटील, आगरी इ. जातीची लोक राहतात.

## ४.३.२. शहापूर व दळणवळण सुविधा:-

शहापूर हा ठाणे जिल्हयातील प्रमुख तालुका आहे. या शहापूर मध्ये जवळजवळ २३१ गावे येतात. त्यात किन्हवली, डोळखांब, शेणवा, गुंडयाचा पाडा, चोंढा,नेहरीली, गेगाव, वासिंद ही प्रमुख बाजाराची ठिकाणे आहेत. शहापूर तालुका हा साधारणता मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर मुंबई पासून ९० किमी अंतरावर वसलेला आहे. आसनगाव, वासिंद हे रेल्वे स्थानक असून ते मुंबईच्या मध्य उपनगरीचे रेल्वेमार्गा वरील मुंबई सी.एस.टी पासून ८० – ८५ कि.मी. अंतरावर आहे तसेच शहापूर पासून अवघ्या २५ कि.मी. कल्याण, ४५ कि.मी. अंतरावर ठाणे स्थानक आहेत. रोज कामानिमित्त मुंबईस ये – जा करणाऱ्याची संख्या मोठी आहे. त्यासाठी मुंबई उपनगरीय रेल्वे हे प्रमुख साधन आहे.

तसेच छत्रपती शिवाजी अंतराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथे आहे. तसेच रस्ते वाहतुकीसाठी मुंबई-नाशिक महामार्ग आहे. जसे मुंबई व पुणे या शहरांना जोडणाऱ्या राजमार्गावर खंडाळा हा घाट येतो त्यामुळे मुंबई ते कर्जत लोणावळा ते पुणे असे दोन भाग होतात. तसेच मुंबई नाशिक या दोन शहरामध्ये इगतपुरी येथील माळशेज घाट येतो. त्यामुळे मुंबई ते कसारा व इगतपुरी ते नाशिक असे दोन भाग होतात.

असे म्हटले जाते हिमालयामुळे युरोप व भारत आशिया खंड असे दोन भाग झालेले आहेत. त्यामुळे युरोपच्या थंड हवेमुळे भारताचे जसे संरक्षण झाले आहे आणि युरोप व भारत देश आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. तसेच मुंबई - पुणे, मुंबई -नाशिक ही शहरे आप आपले अस्तित्व टिकवून आहेत.

नवीन जनगणनेप्रमाणे ठाणे, डोंबिवली, भिंवडी, कल्याण, वसई, विरार, भाईंदर ही छोटी गावे महानगर पालिका म्हणून अस्तित्वात आली आहेत. त्यामुळे शहापूर तालुक्यातील औदयोगिक, शैक्षणिक व आर्थिक विकास स्वातंत्र अस्तित्वासह दिसून येत आहे. आणि भविष्यात शहापूर तालुक्याचे ठिकाण महानगरपालिका होण्याची शक्यता आहे.

## ४.३.३. उदयोगधंदे ,शेती व रोजगार :-

शहापूर तालुक्यातील लोंकाचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती हे आहे. शेती मध्ये प्रामुख्याने भात शेती केली जाते तर काही आदिवासी बाडयामध्ये नाचणीचे उत्पादन घेतले जाते. तसेच विविध फळभाज्या, पाले भाज्यांचे उन्हाळी उत्पादन घेतले जाते.तूर, मुग, उडीद, वाल, मिरची, कांदे, वरी, नाचणी, इतर तृणधान्य, हरभरा यांचे उत्पादन घेतले जाते. तसेच पर्यटन केंद्र म्हणून व मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग जवळ असल्याने हॉटेल्स देखिल दिसून येतात. जवळजवळ अंदाजे ६० टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर होतो तर ३० टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा नोकरीमध्ये होतो. हे ३० टक्के लोक नोकरीसाठी कल्याण, डोंबिवली, ठाणे व मुंबई येथे येतात तर शिल्लक राहिलेल्या १० टक्के लोकांना हॉटेल्स मधून रोजगार प्राप्त होतो.

तसेच शहापुर तालुक्यातील आसनगाव व वासिंद हया ठिकाणी अधिक प्रमाणात उदयोगाचा विकास झाला आहे. यात वासिंद येथे जिंदाल स्टील वर्क्स ची एक शाखा आहे. तर सापगाव येथे लिबर्टी ऑईल मिल, आसनगाव येथे मुंबई-नाशिक हायवे जवळ ओसवाल इंडस्ट्रियल इस्टेट प्लास्टिक कंपनी, एस के आय, शेट्रॉन सारखे उदयोग आहेत.

## ४.३.४ शैक्षणिक सुविधा:-

शहापूर तालुक्यातील शासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळांची उपलब्धता मुबलक प्रमाणात आहेत. त्यात सोनुभाऊ बसवंत आर्टस, कॉमर्स, बॅंकिंग व सायन्स महाविद्यालय, शिवाजीराव जोंधळे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी ( आसनगाव ), koti collage of इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी (सापगाव), ग.वि.खाडे विदयालय व ज्युनिअर कॉलेज, पी.एस.देशमुख इंग्लीश मिडियम स्कूल, बिंग स्माईल स्कूल बिरवाडी, जिंदाल विदयामंदिर, सरस्वती विदयालय, वासिंद, बरोरा विदयालय, महिलामंडळ शाळा, शहापूर, उत्कर्ष महाविदयालय, वासिंद, भिमराव प्रधान महाविदयालय, ITI शहापूर यासारख्या शैक्षणिक संस्था आहेत.

## ४.३.५. नदया व जलाशये :-

एक आदिवासी तालुका म्हणून शहापूर कडे पाहिले जाते. शहापूर हा धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो. या शहापूर मध्ये भातसा, तानसा, उल्हास यासारख्या नदया आहेत. तसेच भातसा, तानसा, मोडक सागर, वैतरणा ही जलाशये असून ती संपूर्ण प्रतिदिन २९०० मेगालिटर पाणीपुरवठा करतात. तसेच दोन मोठे तलाव बोरिवली व विहार या ठिकाणी आहेत. जे प्रतिदिन १०० मेगालिटर पाणीपुरवठा करतात.

या शहापूर तालुक्यातूनच मुंबईला सर्वाधिक पाणीपुरवठा केला जातो. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने शहापूर तालुक्याला रसायन विरहित क्षेत्र म्हणून जाहिर केले आहे.

## ४.३.६. शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता प्रमाण :-

तक्ता क्रमांक ४.३ मध्ये शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता दर दिलेला आहे.

**तक्ता क्रमांक ४.३**


**शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता**

| वर्ष | | ग्रामीण | टक्के | नागरी | टक्के | एकूण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शहापूर तालुक्यातील लोकसंख्या | | | | | | | |
| २०११ | पुरुष | १२३७२१ | ५०.८३ | ३६७४५ | ५१.९६ | १६०४६६ | ५१.०८ |
| | स्त्री | ११९६७२ | ४९.१६ | ३३९६५ | ४८.०३ | १५३६३७ | ४८.९१ |
| | एकूण | २४३३९३ | ७७.४८ | ७०७१० | २२.५१ | ३१४१०३ | १०० |
| शहापूर तालुक्यातील साक्षरता | | | | | | | |
| २०११ | पुरुष | ८७९७५ | ५७.२७ | २९५३५ | ५५.०४ | ११७५१० | ५६.७० |
| | स्त्री | ६५६१३ | ४२.७२ | २४१२३ | ४४.९५ | ८९७३६ | ४३.२९ |
| | एकूण | १५३५८८ | ७४.१० | ५३६५८ | २५.८९ | २,०७,२४६ | ६५.९८ |

स्त्रोत :- Census of India (Maharashtra) Report 2011

# <u>आलेख क्र. ४.३</u>

## <u>शहापूर तालुक्यातील लोकसंख्या व साक्षरता प्रमाण</u>




**शहापूर तालुक्यामध्ये २०११ मध्ये एकूण लोकसंख्या ३१४१०३ इतकी होती. त्यात शहरी भागातील पुरुषांचे प्रमाण ५१.९६ टक्के होते आणि शहरी भागांशी तुलना करता ग्रामीण भागातील लोकसंख्या कमी होती.**

**तर स्त्रीयांच्या बाबतीत हेच प्रमाण शहरी भागात ४८.०३ टक्के तर ग्रामीण भागात ४९.९६ टक्के इतके दिसून येते म्हणजेच ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रमाण हे जास्त दिसून येते. एकंदरित पाहता ग्रामीण भागातील लोकसंख्या ७७.४८ टक्के ही शहरी भागातील लोकसंख्येपेक्षा (२२.५१) टक्के जास्त आढळून आली.**

साक्षरतेचे विचार करता संपूर्ण शहापूर तालुक्याची साक्षरता ६५.९८ टक्के आहे. त्यात ग्रामीण भागातील साक्षरता दर ७४.१० टक्के इतका असून त्यात परुष साक्षरतेचे प्रमाण अधिक आढळून येते. आणि शहरी भागाचा विचार करता शहरी भागात पुरुष साक्षरता (५५-०४) ही स्त्री साक्षरतेपेक्षा (४४.९५) जास्त आढळून येते आणि एकंदरितच ग्रामीण साक्षरता (७४.१०) टक्के हा शहरी साक्षरता (२५.८९) टक्के पेक्षा जास्त आहे.

# प्रकरण पाचवे

## शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदानांची विश्लेषणात्मक माहिती

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| ५.१ | प्रस्तावना |
| ५.२ | शहापूर तालुक्यातील शाळांचा तपशील<br>५.२.१.शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या<br>५.२.२.शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या<br>५.२.३.शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्या<br>५.२.४.शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांची संख्या<br>५.२.५.शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांची संख्या<br>५.२.६.शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थी संख्या |
| ५.३ | अनुदान विनियोग<br>५.३.१. शिक्षक अनुदान<br>५.३.२. शाळा अनुदान<br>५.३.३. बांधकाम अनुदान<br>५.३.४. अपंग एकात्मिक शिक्षण अनुदान<br>५.३.५. व्यवस्थापन अनुदान<br>५.३.६. संशोधन व मुल्यमापन अनुदान |

| | |
|---|---|
| | ५.३.७. शाळा दुरुस्ती अनुदान<br>५.३.८. एकूण अनुदान<br>५.३.९. विद्यार्थी संख्येनुसार शाळांचे वर्गीकरण<br>५.३.१०. इमारतीच्या रचनेनुसार शाळांचे वर्गीकरण<br>५.३.११. शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकांचे वर्गीकरण<br>५.३.१२. शिक्षकांच्या शालेय व रिकाम्या वेळेचा वापरानुसार वर्गीकरण<br>५.३.१३. क्रिंडागण/मैदान उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण<br>५.३.१४. स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण<br>५.३.१५. उपलब्ध पाणीपुरवठा सुविधेनुसार शाळांचे वर्गीकरण<br>५.३.१६. शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागनुसार वर्गीकरण<br>५.३.१७. अनुदानांचे प्राप्त रकमेनुसार वर्गीकरण<br>५.३.१८. अनुदानाबाबत शिक्षकांच्या मताचे वर्गीकरण |

# शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदानांची विश्लेषणात्मक माहिती

## ५.१. प्रस्तावना :-

प्रस्तुत प्रकरणामध्ये शहापूर परिसरामधील प्राथमिक व माध्यमिक शाळांना प्राप्त होणाचा अनुदांनाच्या सामाजिक व आर्थिक परिणांमाचा अभ्यास केला आहे. तसेच संशोधकाने प्रश्नावलीच्या मदतीने शहापूर मधील ग्रामीण भागातील काही निवडक शाळां मधील शिक्षक व प्राचार्याची मुलाखत घेऊन अनुदाना बाबतची माहिती यथायोग्य रितीने मांडली आहे.

सदर संशोधनासाठी शहापूर तालुक्यातील शासकीय (६) खाजगी अनुदानित (४) व खाजगी विनाशासकीय अनुदानित (५) व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या (३५) अशा ५० शांळाची व त्यातील प्रत्येकी २ अशा १०० शिक्षकांची निवड केली आहे. सदर प्रकरणात शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदांनाची सविस्तर माहिती दिली आहे.

## ५.२. शहापूर तालुक्यातील शाळांचा तपशिल :-

ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी व शिक्षण संचालक, मुंबई यांच्या अहवालाप्रमाणे (ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन) ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील २००८-२०१३ या ५ वर्षांच्या कालावधीतील प्राथमिक व माध्यामिक शाळांचा अभ्यास करताना असे आढळून आले..

## ५.२.१. शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या :-

तक्ता क्रमांक ५.१ मध्ये शहापूर तालूक्यातील प्राथमिक शाळांच्या संख्येचे वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ५.१**

| वर्ष | शासकिय शाळा | | स्थानिक स्वराज्य संस्था | | खाजगी अनुदानित | | खाजगी विनाअनुदानित | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | |
| २००८-०९ | १३ | २.५८ | ४७१ | ९३.८२ | ७ | १.३९ | ११ | २.१९ | ५०२ |
| २००९-१० | १३ | २.५८ | ४७१ | ९३.८२ | ७ | १.३९ | ११ | २.१९ | ५०२ |
| २०१०-११ | १४ | २.७८ | ४६८ | ९३.०४ | ७ | १.३९ | १४ | २.७८ | ५०३ |
| २०११-१२ | १४ | २.७८ | ४६८ | ९२.६७ | ९ | १.७८ | १४ | २.७७ | ५०५ |
| २०१२-१३ | १४ | २.७६ | ४६८ | ९२.३० | १० | १.९ | १५ | २.९ | ५०७ |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८ – २००९ व सन २००९ – २०१० मध्ये याच प्राथमिक शाळांची संख्या ५०२ पर्यंत वाढली. यामध्ये शासकीय शाळा १३(२.५८%), तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा ४७१(९३.८२%) तर खाजगी अनुदानित शाळा ७(१.३९%) तर खाजगी विना अनुदानित ११(२.१९%) इतक्या होत्या या वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची संख्या जास्त होती.

२. सन २०१० – २०११ चा अभ्यास करता शहापूर तालुक्यातील एकूण प्राथमिक शाळांची संख्या ५०३ इतकी झाली त्यात शासकीय शाळा १४(२.७८%) स्थानिक स्वराज्य संख्या शाळा ४६८ (९३.०४%) खाजगी अनुदानित ७(१.३९%) तर खाजगी विना अनुदानित १४(२.७८%) इतक्या होत्या एकंदरित

पाहता स्थानिक स्वराज्य संख्याच्या शाळा अधिक नाहीत, परंतु २००८ – २०१० च्या तुलनेत त्यांच्यात (०.८%) नी घट झाली. परंतु खाजगी अनुदानित शाळांमध्ये वाढ (०.५९%) झालेली आढळते.

३. सन २०११–२०१२ चा अभ्यास करता शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या ५०५ इतकी झाली त्यात शासकीय शाळा १४(२.७७%), स्थानिक स्वराज्य शाळा ४६८(९२.६७%), खाजगी अनुदानित शाळा ९(१.७८%) व खाजगी विनाअनुदानित शाळा १४(२.७७%) होत्या. या वर्षामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांची संख्या जास्त होती. या वर्षामध्ये खाजगी अनुदानित शाळांची संख्या (०.३९%) नी वाढ झाली.

४. सन २०११–२०१३ चा अभ्यास करता शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांची संख्या ५०७ इतकी झाली त्यात शासकीय शाळा १४(२.७६%), स्थानिक स्वराज्य शाळा ४६८(९२.६७%), खाजगी अनुदानित शाळा ९(१.७८%) तर खाजगी विनाअनुदानित शाळा १५(२.९%) इतक्या होत्या. या वर्षामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची सर्वाधिक होती. या वर्षामध्ये २०१०–२०११ ची तुलना करता खाजगी अनुदानित शाळांमध्ये (०.१२%) व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये (०.१३%) नी वाढ झाली.

५. एकंदरीत पाहता शहापूर तालुक्यात प्राथमिक शाळांची संख्या २००८–२०१३ या कालावधीत वाढलेली दिसते.

## ५.२.२.शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षक संख्या :-

शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या तक्ता क्रं. ५.२ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र. ५.२

| वर्ष | शासकीय शाळा | | स्थानिक स्वराज्य संस्था | | खाजगी अनुदानित | | खाजगी विनाअनुदानित | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | |
| २००८-०९ | ७९ | ६.३३ | १०६९ | ८५.७२ | ५२ | ४.१७ | ४७ | ३.७६ | १२४७ |
| २००९-१० | ७९ | ५.७७ | ११८९ | ८६.८५ | ५२ | ३.७९ | ४९ | ३.५७ | १३६९ |
| २०१०-११ | ८५ | ५.८१ | १२५२ | ८५.६९ | ४५ | ३.०८ | ७९ | ५.४० | १४६१ |
| २०११-१२ | ११३ | ७.४६ | १२४९ | ८२.४९ | ६० | ३.९६ | ९२ | ६.०७ | १५४१ |
| २०१२-१३ | ११६ | ७.६९ | १२१९ | ८०.८३ | ६८ | ४.५० | १०५ | ६.९६ | १५०८ |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८—२००९ या वर्षामध्ये शहापूर मधील ५०२ प्राथमिक शाळांमध्ये एकूण १२४७ शिक्षक कार्यरत होते. यामध्ये ७९(६.३३%) शासकीय शाळेत १०६९ (८५.७२%), स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५२(४.१७%), खाजगी अनुदानित व ४७(३.७६%) हे खाजगी अनुदानित शाळामध्ये कार्यरत होते. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ४७१ शाळांमध्ये सर्वात जास्त १०६९ (८५.७२%) शिक्षक कार्यरत होते.

२. सन २००९—२०१० मध्ये शहापूर मधील ५०२ प्राथमिक शाळंमध्ये १३६९ शिक्षक कार्यरत होते. त्यात ७९(५.७७%) शासकीय शाळेत, ११८९ (८६.३५%) स्थानिक स्वराज्य संस्थात ,५२ (३.७९%) खाजगी अनुदानित शाळेत तर ४९(३.५७%) खाजगी विना अनुदानित शाळामध्ये कार्यरत होते. यामध्ये २००८—२००९ ची तुलना करता शासकीय शाळेत (०.५६%) ची घट झाली तर स्थानिक

स्वराज्य संस्थां (१.१३%) नी वाढ झाली तर खाजगी अनुदानित (०.९२%) नी घट झाली तर खाजगी विनाअनुदानित (०.१९%) नी घट झाली.

३. सन २०१०—२०११ या वर्षामध्ये शहापूर मधील ५०३ प्राथमिक शाळामध्ये १४६१ शिक्षक कार्यरत होते. त्यात ८५ (५.८१%) शासकीय शाळा, १२५२ (८५.६९%) स्थानिक स्वराज्य संस्था, ४५ (३.०८%) खाजगी अनुदानित तर ७९ (५.४०%) खाजगी विना अनुदानित शाळामध्ये कार्यरत होते. २००९—२०१० या वर्षाबरोबर तुलना करता शासकीय शाळामध्ये (०.०४%) वाढ झाली तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये (०.१६%) नी घट झाली, खाजगी अनुदानित शाळामध्ये (०.७१%) घट झाली तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये (१.८३%) ने वाढ झाली.

४. सन २०११—२०१२ या वर्षामध्ये शहापूर मधील ५०५ प्राथामिक शाळामध्ये १५१४ शिक्षक कार्यरत होते. त्यात ११३ (७.४६%) शासकीय शाळेत, १२४९ (८२.४९%) स्थानिक स्वराज्य संस्थेत, ६० (३.९६%) खाजगी अनुदानित तर ९२ (६.०७%) खाजगी विना अनुदानित मध्ये कार्यरत होते. २०१०—२०११ या वर्षामध्ये शासकीय शाळांमधील शिक्षक संख्येत (१.६५%) ने वाढ झाली, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये (३.२९%) ने घट झाली, खाजगी अनुदानित शाळामध्ये (०.८८%) ने घट झाली तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये (०.६७%) ने वाढ झाली.

५. सन २०१२—२०१३ या वर्षामध्ये शहापूर मधील ५०७ प्राथामिक शाळामध्ये १५०८ शिक्षक कार्यरत होते. त्यात शासकीय शाळेत ११६ (७.६९%), स्थानिक स्वराज्य संस्था १२१९ (८०.८३%) ,खाजगी अनुदानित शाळेत, ६८ (४.५०%) तर खाजगी विना अनुदानित शाळेत १०५ (६.९६%) मध्ये शिक्षक कार्यरत होते. २०११—२०१२ या वर्षाशी तुलना करता शासकीय शाळामध्ये (०.२३%) ने वाढ झाली, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये (१.६६) ने घट झाली तर खाजगी अनुदानित शाळामध्ये (०.५४%) ने वाढ झाली. तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये (०.८९%) ने वाढ झाली.

६. एकंदरीत पाहता २००८—२०१३ या वर्षामध्ये शिक्षकांच्या संख्येमध्ये वाढ होताना दिसते ही वाढ जास्तीत जास्त स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये व खाजगी विना अनुदानित शाळामध्ये दिसून येते.

## ५.२.३. शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थी संख्या :-

तक्ता क्रमांक ५.३ मध्ये शहापूर तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे वर्गीकरण दिले आहे.

**तक्ता क्र. ५.३**

| वर्ष | शासकीय संस्था | | | स्थानिक स्वराज्य संस्था | | | खाजगी अनुदानित | | | खाजगी विनाअनुदानित | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | |
| २००८-०९ | २९१९ | १२९१ | ४२१० | २९७०१ | १४७७४ | ४४,४७५ | ३०९६ | १४३५ | ४५३१ | २८७४ | ९९७ | ३८७१ | ५२०६९ |
| टक्के | ६९.३३ | ३०.६६ | १०० | ६६.७८ | ३३.२१ | १०० | ६८.३२ | ३१.६७ | १०० | ७४.२४ | २५.७५ | १०० | - |
| २००९-१० | १५४६ | १४३८ | २९८४ | १४८४० | १४८७० | २१,७१० | १७१० | १४०० | ३१०१ | १६७५ | ११३० | २८०५ | ३८६०० |
| टक्के | ५१.८० | ४८.१९ | १०० | ४९.९४ | ५०.०५ | १०० | ५५.०४ | ४५.१४ | १०० | ५९.७१ | ४०.२० | १०० | - |
| २०१०-११ | १७६२ | १५५३ | ३३१५ | १४००६ | १३६०० | २७,६०६ | १८४५ | १६३५ | ३४८० | १९३५४ | १८२३४ | ३७५८८ | ७१९८९ |
| टक्के | ५३.१५ | ४६.८४ | १०० | ५०.७३ | ४९.२६ | १०० | ५३.०१ | ४६.९८ | १०० | ५१.४८ | ९८.५१ | १०० | - |
| २०११-१२ | २११२ | १६५७ | ३७६९ | १३३५६ | १३२३१ | २६,५८७ | १४४७ | ११८६ | २६३३ | २७९० | १९९० | ४७८० | ३७७६९ |
| टक्के | ५६.०३ | ४३.९६ | १०० | ५०.२२ | ४९.७६ | १०० | ५४.९५ | ४५.०४ | १०० | ५८.३६ | ४१.९० | १०० | - |
| २०१२-१३ | २५८८ | २०३० | ४६१८ | १२९५३ | १२७९१ | २५,७४४ | २८३२ | २१११ | ४९४३ | ३३९० | २५५० | ५९४० | ४१२४५ |
| टक्के | ५६.०४ | ४३.९५ | १०० | ५०.३१ | ४९.६८ | १०० | ५७.२९ | ४२.७० | १०० | ५७.०७ | ४२.९० | १०० | - |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८—२००९ मध्ये शहापूर मध्ये ५०२ प्राथमिक शाळामध्ये एकूण ५२,०६९ विदयार्थी संख्या होती त्यात शासकीय शाळामध्ये एकूण ४२१० विदयार्थी होते. २९१९ (६९.३३%) मुलं व १२९१ (३०.६६%) मुली होत्या तर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेत ४४,४७५ विदयार्थी शिकत होते त्यात २१,७०१ (६६.७८%) मुलं तर १४,७७४ (३३.२१%) मुली होत्या. तर खाजगी अनुदानित शाळामध्ये ४५३१ विदयार्थी होते. त्यात ३०९६ (६८.३२%) मुलं तर १४३५ (३१.६७) मुली होत्या तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये ३८७१ मुलं होती त्यात २८७४ (७४.२४%) मुलं तर ९९७ (२५.७५%) मुली शिकत होत्या.

२. सन २००९—२०१० मध्ये शहापूर मध्ये ५०२ प्राथमिक शाळामध्ये ३८,६०० इतके विदयार्थी संख्या होते. त्यात शासकीय शाळेत २९८४ इतके विदयार्थी होते त्यात १५४६ (५१.८०%) मुलं व १४३८ (४८.१९%) मुली होत्या तर स्थानिक स्वराज्य संस्थाध्ये २९,७१० विदयार्थी शिकत होते त्यात १४,८४० (४९.९४%) मुलं तर १४,८७० (५०.०५%) मुली शिकत होत्या. तर खाजगी अनुदानित शाळामध्ये ३१०१ विदयार्थी होते. त्यात १७०१ (५५.०४%) मुलं व १४०० (४५.१४%) मुली शिकत होत्या तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये २८०५ विदयार्थी होते. त्यात १६७५ (५९.७१%) मुलं व ११३० (४०.२८%) मुली शिकत होत्या.

३. सन २०१०—२०११ साली ५०३ प्राथमिक शाळामध्ये ७१,९८९ विदयार्थी संख्या होते. त्यात शासकीय शाळेत ३३१५ इतके विदयार्थी होते त्यात १७६२ (५३.१५%) मुलं व १५५३ (४६.८४%) मुली होत्या तर स्थानिक स्वराज्य संस्थाध्ये २७,६०६ विदयार्थी होते त्यात १४,००६ (५०.७३%) मुलं तर १३,६०० (४९.२६%) मुली होत्या. त्यात खाजगी अनुदानित शाळांमध्ये ३४०८ विदयार्थी होते. त्यात १८४५ (५३.०१%) मुलं व १६३५ (४६.९८%) मुली होत्या व खाजगी विना अनुदानित शाळामध्ये ३७,५८८ विदयार्थी होते. त्यात १९,३५४ (५१.४८%) मुलं व १८,२३४ (४८.५१%) मुली शिकत होत्या.

४. सन २०११–२०१२ मध्ये ५०२ प्राथामिक शाळांमध्ये एकूण ३७,७६९ विदयार्थी संख्या होती त्यात शासकीय शाळेत ३,७६९ विदयार्थी होते त्यात २११२ (५६.०३%) मुलं व १६५७ (४३.९६%) मुली होत्या. तर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये २६५८७ विदयार्थी होते तर त्यात १३,३५६ (५०.२३%) मुलं तर १३,२३१ (४९.७६%) मुली होत्या. तर खाजगी अनुदानित शाळामध्ये एकूण २,६३३ विदयार्थी होते. त्यात १४४७ (५४.९५%) मुलं तर ११८६ (४५.०४%) मुली होत्या. तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये एकूण ४७८० विदयार्थी होती त्यात २७९० (५८.३६%) मुलं तर १९९० (४१.६३%) मुली शिकत होत्या.

५. सन २०१२–२०१३ मध्ये ५०७ प्राथामिक शाळांमध्ये एकूण ४१,२४५ विदयार्थी होते. त्यात शासकीय शाळामध्ये एकूण ४६१८ विदयार्थी होते त्यात २५८८ (५६.०४%) मुलं व २०३० (४३.९५%) मुली होत्या. तर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एकूण २५,७४४ विदयार्थी होते त्यात १२,९५३ (५०.३१%) मुलं व १२,७९१ (४९.६८%) मुलीचे प्रमाण होते. तर खाजगी अनुदानित शाळामध्ये एकूण ४,९४३ विदयार्थी होते. त्यात २८३२ (५७.२९%) मुलं तर २१११ (४२.७०%) मुली होत्या. तर खाजगी विना अनुदानित शाळामध्ये एकूण ५९४० विदयार्थी होते त्यात ३३९० (५७.०७%) मुलं तर २५५० (४२.९२%) मुली होत्या.

६. एकंदरीत पाहता सन २००८–२०१३ या कालावधीत २०११–२०११ या वर्षी विदयार्थी संख्या सर्वाधिक म्हणजेच सरासरी २९.७८ होती. त्यातही या पाच वर्षात एकूण विदयार्थीमध्ये मुलांचे प्रमाण हे ५० पेक्षा जास्त आढळून आले.

## ५.२.४ शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांची संख्या :-

तक्ता क्रमांक ५.४ मध्ये शहापूर तालूक्यातील माध्यमिक शाळांच्या संख्येचे वर्गीकरण केले आहे.

**तक्ता क्र. ५.४**

| वर्ष | शासकीय शाळा | | स्थानिक स्वराज्य संस्था | | खाजगी अनुदानित | | खाजगी विनाअनुदानित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| २००८-०९ | ८ | १४.२८ | ० | - | २७ | ४८.२ | २१ | ३७.५ | ५६ | १०० |
| २००९-१० | ६ | १० | ० | - | ३९ | ६५ | १५ | २५ | ६० | १०० |
| २०१०-११ | ६ | १० | ० | - | ३९ | ६५ | १५ | २५ | ६० | १०० |
| २०११-१२ | ६ | १० | ० | - | ३९ | ६५ | १५ | २५ | ६० | १०० |
| २०१२-१३ | ६ | १० | ० | - | ३९ | ६५ | १५ | २५ | ६० | १०० |

( स्त्रोतः १. क्षेत्रिय पाहणी,२. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३)

१. सन २००८-०९ मध्ये शहापूरमध्ये माध्यमिक शाळांत एकूण ५६ शाळा होत्या. त्यात शासकीय शाळांची संख्या ८(१४.२८%) होती. तसेच खाजगी अनुदानित शाळा २७(४८.२%) होत्या. तर खाजगी विनाअनुदानित शाळा २१ (३७.५%) होत्या. म्हणजेच खाजगी अनुदानित शाळांची संख्या ही जास्त दिसून येते.

२. सन २००९-१० मध्ये माध्यमिक शाळांच्या संख्येत वाढ झाली. त्यांची संख्या ६० इतकी झाली. त्यात शासकिय शाळांची संख्या ६ (१०%) होती. त्या सन २००८-०९ च्या तुलनेत (४.२८%) ने कमी झाल्या तर खाजगी अनुदानित शाळा ३९ (६५%) झाल्या. २००८-०९ च्या तुलनेत (१६.८%) वाढल्या. तर खाजगी विना अनुदानित शाळा १५ (२५%) होत्या.  २००८-०९ च्या तुलनेत त्यात (१२.५%) ने घट झाली.

३. सन २०१०-११, सन २०११-१२ व सन २०१२-१३ मध्ये एकूण माध्यमिक शाळांची संख्या ६० इतकीच राहिली, तर शासकीय शाळांची संख्या ६ म्हणजे (१०%) इतकी राहिली आहे. तर खाजगी अनुदानित शाळा ३९ म्हणजेच (६५%) इतक्याच राहिल्या आहेत. तर खाजगी विना अनुदानित शाळा या १५ इतक्या म्हणजेच (२५%) इतक्याच राहिल्या आहेत.

४. एकंदरित या शाळांच्या संख्येत २००८-०९ च्या तुलनेत (१८.९%) वाढ झाली, परंतु ही वाढ पुढे कायम राहिली आहे.

## ५.२.५शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांची संख्या :-

शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांची संख्या तक्ता क्रं. ५.५ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.५.५**

| वर्ष | शासकीय शाळा | | खाजगी अनुदानित | | खाजगी विनाअनुदानित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| २००८-०९ | ८० | १४.२८ | २७० | ४८.२१ | २१० | ३७.५ | ५६० | १०० |
| २००९-१० | ७२ | ११.७० | ३५१ | ५७.०७ | १९२ | ३१.२१ | ६१५ | १०० |
| २०१०-११ | ७२ | ११.७० | ३५१ | ५७.०७ | १९२ | ३१.२१ | ६१५ | १०० |
| २०११-१२ | ७२ | ११.७० | ३५१ | ५७.०७ | १९२ | ३१.२१ | ६१५ | १०० |
| २०१२-१३ | ७० | ११.४७ | ३५५ | ५८.१९ | १८५ | ३०.३२ | ६१० | १०० |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८-०९ मध्ये शहापूर तालुक्यातील ६० माध्यमिक शाळांमध्ये एकूण शिक्षक संख्या ५६० इतकी होती ज्यात शासकीय शाळांमध्ये ८० (१४.२८%) शिक्षक कार्यरत होते. तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये २७० (४८.२१%) शिक्षक कार्यरत होते आणि त्याचवेळी खाजगी विना अनुदानित शाळेमध्ये २१० (३७.५१%) शिक्षक कार्यरत होते. तुलनात्मक दृष्टीने खाजगी अनुदानित शाळांमध्ये सर्वात तुलनात्मक दृष्टीने खाजगी अनुदानित शाळांमध्ये सर्वात जास्त शिक्षक कार्यरत होते.

२. तर सन २००९-१०, सन २०१०-११ तर २०११-१२ या वर्षामध्ये शहापूर मधील ६० माध्यमिक शाळांमध्ये ६१५ शिक्षक कार्यरत होते. या तीन वर्षामध्ये शासकीय शाळांमध्ये ७२ (११.७०%) शिक्षक कार्यरत होते तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये ३५१ (५७.०७%) शिक्षक कार्यरत होते. तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये १९२ (३१.२१%) शिक्षक कार्यरत होते. तुलनात्मक दृष्टीने पाहता खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक संख्या जास्त होती.

३. तर सन २०१२-१३ मध्ये एकूण ६० माध्यमिक शाळांमध्ये ६१० शिक्षक कार्यरत होते. २०११-१२ पेक्षा ही संख्या २०.२३% नी कमी होती. त्यात शासकीय शाळेतील शिक्षक संख्या ७० (११.४७%) होती. २०११-१२ पेक्षा ०.२३% नी कमी झाली होती. तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये ३५५ (५८.१९%) शिक्षक कार्यरत होते. २०११-१२ च्या मानाने १.१२% नी वाढ झाली होती. तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये १८५ शिक्षक कार्यरत होते. २०११-१२ च्या तुलनेत शिक्षकांची संख्या ०.८९% वाढली. तुलनात्मक दृष्टीने खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षक संख्या जास्त होती.

४. एकंदरित २००८ ते २०१३ पर्यंतच्या अभ्यासावरुन लक्षात येते की, खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांची संख्या ५० % पेक्षा जास्त आहे.

## ५.२.६ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्या :-

तक्ता क्रमांक ५.६ मध्ये शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे वर्गीकरण दिले आहे.

**तक्ता क्रमांक ५.६**

| वर्ष | शासकीय संस्था | | | स्थानिक स्वराज्य संस्था | | | खाजगी अनुदानित | | | खाजगी विनाअनुदानित | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | मुलं | मुली | एकूण | |
| २००८-०९ | २६६७ | ७५० | ३४१७ | ० | ० | ० | २००० | ७१६ | २७१६ | ४५२२३ | १५०४४ | ६०२६७ | ६६४०० |
| टक्के | ७८०५ | २१.९४ | १०० | ० | ० | ० | ७३.६३ | २६.३६ | १०० | ७५.२३ | २४.९६ | १०० | - |
| २००९-१० | १९१८ | ७५० | २६६८ | ० | ० | ० | १२६३४ | ६३११ | १८९५५ | ६३६५ | ३२१३ | ९५७८ | ३४९७७ |
| टक्के | ७१.८८ | २८.११ | १०० | ० | ० | ० | ६६.६५ | ३३.२९ | १०० | ६६.४५ | ३३.५४ | १०० | - |
| २०१०-११ | २२२४ | १४१० | ३६३४ | ० | ० | ० | १४२६३ | ७१३६ | २१३९९ | ७८२२ | ३३७१ | १११९३ | ३६२२६ |
| टक्के | ६१.१९ | ३८.८० | १०० | ० | ० | ० | ६६.६५ | ३३.३४ | १०० | ६९.८८ | ३०.११ | १०० | - |
| २०११-१२ | २२३३ | १४२७ | ३६६० | ० | ० | ० | १६९४७ | ७००२ | २३९४९ | ८०८२ | ३४७१ | ११४९९ | ३९१०० |
| टक्के | ६१.०१ | ३८.९८ | १०० | ० | ० | ० | ७०.७६ | २९.२३ | १०० | ७२.४९ | २९.७१ | १०० | - |
| २०१२-१३ | २३८२ | १५७८ | ३९६० | ० | ० | ० | १७२६७ | ७३२२ | २४५८९ | ८१६२ | ३४९२ | ११६५४ | ४०२०३ |
| टक्के | ६०.१५ | ३९.८४ | १०० | ० | ० | ० | ७०.२४ | २९.७७ | १०० | ७०.०३ | २४.९६ | १०० | - |

**( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )**

१. सन २००८-०९ मध्ये शहापूर मधील माध्यमिक शाळांची संख्या ५६ होती. या शाळांमध्ये एकूण ६६४०० विद्यार्थी शिकत होते. या मधील शासकीय शाळांमध्ये एकूण ३४१७ विद्यार्थी होते. यात २६६७ (७८.०५%) मुलं व ७५० (२१.९४%) मुली होत्या. तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये २७१६ विद्यार्थी होते. त्यात २००० (७३.६३%) मुलं होती तर ७१६ (२६.३६%) मुली शिकत होत्या तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये ६०,२६७ विद्यार्थी होते. त्यात ४५,२२३ (७५.२३%) मुले होती तर १५०४४ (२४.६३%) मुली होत्या तुलनात्मक दृष्टया खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २२.६५% ने जास्त होती.

२. सन २००९-१० मध्ये शहापूर मधील माध्यमिक शाळांची संख्या ही ६० होती. या शाळांमध्ये एकूण ३४,९७७ विद्यार्थी शिकत होते. त्यात शासकीय शाळेमध्ये एकूण २,६६८ शिकत होते, त्यात १९१८ (७१.८८%) मुले व ७५० (२८.११%) मुली शिकत होत्या. तर खाजगी अनुदानित शाळेमध्ये एकुण १८९५५ विद्यार्थी शिकत होते. त्यात १२६३४ (६६.६५%) मुलं व ६३११ (३३.२९%) मुली शिकत होत्या. तर खाजगी विना अनुदानित शाळेत एकूण ९५७८ विद्यार्थी शिकत होते त्यात ६३६५ (६६.४५%) मुलं व ३२१३ (३३.५६%) मुली शिकत होत्या. तुलनात्मक दृष्टया खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५४.१९% जास्त होती.

३. सन २०१०-११ मध्ये शहापूर तालुक्यात माध्यमिक शाळांची संख्या ६० होती आणि या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थी संख्या एकूण ३६२२६ इतकी होती. त्यात शासकीय शाळेत एकूण ३६३४ एवढे विद्यार्थी होते. त्यात २२२४ (६१.१९%) मुले व १४१० (३८.८०%) मुली शिकत होत्या तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये २१३९९ विद्यार्थी होते. त्यात १४२६३ (६६.६५%) मुले तर ७१३६ (३३.३४%) मुली होत्या. तर खाजगी विना अनुदानित शाळेत १११९३ विद्यार्थी होते. त्या मुलांचे प्रमाण ७८२२(६९.८८%) होते तर ३३७१ (३०.१७%) मुली शिकत होत्या तुलनात्मक दृष्टया खाजगी अनुदानित विद्यार्थ्यांची संख्या ५९.०७% ने जास्त असल्याचे जाणवते.

४. सन २०११-१२ मध्ये शहापूर मधील माध्यमिक शाळांची एकूण संख्या ६० एवढी असून त्यात ३९१०० विद्यार्थी शिकत होते. त्यात शासकीय शाळांमध्ये एकूण ३६६० विद्यार्थी शिकत होते त्यात २२३३ (६१.०१% ) मुले तर १४२७ (३८.९८% ) मुली शिकत होत्या तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये २३९४९ विद्यार्थी शिकत होते त्यात १६९४७ (७०.७६% ) मुले तर ७००२ (२९.२३% ) मुली शिकत होत्या. तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये ११६५४ विद्यार्थी होते. त्यात ८१६२ (७०.०३%) मुले तर ३४९२ (२४.९६%) मुली शिकत होत्या. तुलनात्मक दृष्टीने विचार करता खाजगी अनुदानित शाळेत विद्यार्थी संख्या ६१.२५% ने जास्त होती.

५. सन २०१२-१३ मध्ये शहापूर मधील माध्यमिक शाळांची संख्या ६० असून त्यात ४०२०३ इतके विद्यार्थी शिकत होते. त्यात शासकीय शाळेत एकूण ३९६० विद्यार्थी शिकत होते. त्यात २३८२ (६०.१५%) मुले तर १५७८ (३९.८४%) मुली शिकत होत्या तर खाजगी अनुदानित शाळेमध्ये २४५८१ विद्यार्थी शिकत होते. त्यात १७२६७ (७०.२४%) मुले व ७३२२(२९.३७% ) मुली शिकत होत्या तर खाजगी विनाअनुदानित शाळेत एकूण ११६५४ विद्यार्थी शिकत होते, त्यात ८१६२(७०.०३% ) मुले व ३४९२ (२४.०६% ) मुली शिकत होत्या. तुलनात्मक दृष्ट्या विचार करता खाजगी अनुदानित शाळेत (६१.१४% ) विद्यार्थी संख्या जास्त होती.

६. एकंदरीत पाहता शहापूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी संख्येमध्ये सुरुवातीला २००८-०९ असणाऱ्या विद्यार्थी संख्येत हळूहळू घट होतांना दिसते परंतु काही टप्प्यानंतर त्यामध्ये हळूवार वाढ होतांना दिसून येते. तसेच २००८-१३ या कालावधीत शासकीय, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित शाळेत मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण जास्तीचे आहे. परंतु मुलींच्या संख्येची साक्षरतेची तुलना करता ती वाढताना दिसून येते आणि हे सामाजिक मानवी प्रगतीचे लक्षण आहे.

## ५.३. अनुदान विनियोग :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणारे एकूण अनुदान, त्यांची एकूण रक्कम, त्यांचा होणारा विनियोग याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे

### ५.३.१ शिक्षक अनुदान:-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या शिक्षक अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.५.७**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | ७,८०,००० | ७,६३,००० | १७,००० | ९७.८२% |
| २००९ - १० | ८,६८,००० | ८,५०,००० | १८,००० | ९७.९३% |
| २०१० - ११ | ९,७३,००० | ८,८९,००० | ८४,००० | ९१.३७% |
| २०११ - १२ | ८,२९,००० | ८,२९,००० | ० | १००% |
| २०१२ - १३ | ८,९८,००० | ८,९८,००० | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८-०९ मध्ये सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शहापूर तालुक्यास शिक्षक अनुदान स्वरूपात रु. ७,८०,०००/- रक्कम प्राप्त झाली या रकमेतून रु. ७,६३,०००/- खर्च झाली त्यातून रु. १७,०००/- इतकी रक्कम शिल्लक राहिली. म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानातील ९७.८२% खार्च झाले.

२. तर सन २००९-१० या वर्षातील रु. ८,६८,०००/- इतके शिक्षक अनुदान प्राप्त झाले. त्यातील रु.८,५०,०००/- इतकी रक्कम खर्च झाली व रु. १८,०००/- इतकी रक्कम

शिल्लक राहिली हा खर्च एकूण रकमेच्या ९७.९३ इतका होता.

३. तर सन २०१०-११ मध्ये जवळ जवळ रु.९,७३,०००/- शिक्षक अनुदान स्वरुपात प्राप्त झाले. त्यातून रु. ८,८९,०००/- खर्च होऊन रु ८४,०००/- शिल्लक राहिले म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानातून ९१.३७% रक्कम खर्च झाली हा खर्च २००९-१० च्या तुलनेने ६.५६% नी कमी होता.

४. तर सन २०११-१२ मध्ये ८,२९,०००/- रक्कम शिक्षक अनुदान स्वरुपात प्राप्त झाली आणि ती १००% खर्च झाली. हा खर्च २०१०-११ च्या तुलनेत ८.६३% नी जास्त होता.

५. तर सन २०१२-१३ मध्ये शिक्षक अनुदान म्हणून रु. ८,९८,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली आणि ती संपूर्ण म्हणजेच १००% रक्कम इतकी खर्च झाली.

## ५.३.२. शाळा अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या शाळा अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.८ मध्ये दिली आहे.

### तक्ता क्र.५.८

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | २९,६९,००० | २८,८६,००० | ८३,००० | ९७.२०% |
| २००९ - १० | ३३,५५,००० | ३३,५५,००० | ० | १००% |
| २०१० - ११ | ३३,७९,००० | ३३,७९,००० | ० | १००% |
| २०११ - १२ | ३४,३६,००० | ३३,७९,००० | ५७,००० | ९८.३४% |
| २०१२ - १३ | ३४,६१,००० | ३४,६१,००० | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. २००८-०९ मध्ये सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळा अनुदानामध्ये रु. २९,६९,०००/- इतकी रक्कम शहापूर तालुक्यात पुरविली गेली. या रकमेतील रु. २८,८६,०००/- इतकी रक्कम शाळावर खर्च केली गेली. त्यातील रु. ८३,०००/- रक्कम वापरली गेली. खर्चाचा विचार करता एकूण अनुदानापैकी ९७.२०% रक्कम वापरली गेली.

२. तर वर्ष २००९-१० मध्ये रु.३३,५५,०००/- अनुदान रुपात मिळाले. ही रक्कम मागील वर्ष २००८-०९ च्या तुलनेत रु.३,८६,०००/- ने जास्त होती आणि ही रक्कम जवळ जवळ १००% खर्च केली गेली.

३. वर्ष २०१०-११ मध्ये ही रक्कम रु. ३३,७९,०००/- इतकी मिळाली. ही रक्कम मागील वर्षी २००९-१० च्या तुलनेत २४,०००/- नी जास्त होती आणि ही रक्कम १००% वापरली गेली.

४. वर्ष २०११-१२ मध्ये ही रक्कम रु.३४,३६,०००/-इतकी प्राप्त झाली ही रक्कम मागील वर्ष २०१०-११ च्या तुलनेत रु.५७,०००/- नी जास्तीची होती या रकमेतील रु. ३३,७९,०००/- रक्कम वापरली गेली. म्हणजेच ९८.३४% खर्च झाली.

५. तर वर्ष २०१२-१३ मध्ये रु. ३४,६१,०००/- इतकी रक्कम अनुदान स्वरुपात प्राप्त झाली. ही रक्कम मागील वर्ष २०११-१२ च्या तुलनेत २५,०००/- नी जास्त होती. ही रक्कम १००% वापरली गेली.

## ५.३.३. बांधकाम अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या बांधकाम अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.५.९**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | १,३१,७१,००० | ६१,९०,३९५ | ६९,८०,६०५ | ४७% |
| २००९ - १० | ६९,८०,६०५ (मा.शिल्लक) | - | - | खर्च नाही |
| २०१० - ११ | ६९,८०,६०५ (मा.शिल्लक) | ४४,७२,९०० | २५,०७,७०५ | ६४.०७% |
| २०११ - १२ | ६,००,००० (मा.शिल्लक) | ३१,०७,७०५ | ० | १००% |
| २०१२ - १३ | ५५,०३,३७९ | ५५,०३,७९ | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत सन २००८-०९ मध्ये बांधकाम अनुदान म्हणून रु. १,३१,७१,०००/- इतकी रक्कम मिळाली यातील रु.१,३१,७१,०००/- इतकी रक्कम मिळाली. यातील रु. ६१,९०,३९५/- इतकी रक्कम खर्च झाली. त्यातून रु. ६९,८०,६०५ इतकी रक्कम शिल्लक झाली. म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानातून ४७% रक्कम खर्च झाली.

२. तर २००९-१० मध्ये शासनाने कोणत्याही प्रकारचा अनुदान बांधकामासाठी दिला नाही. परंतु आधिचे वर्ष २००८-०९ मधील शिल्लक रक्कम रु. ६९,८०,६०५/- यांचीच तरतुद केली गेली. परंतु या रकमेतील कोणत्याही प्रकारची रक्कम बांधकामासाठी वापरली नाही गेली.

३. २००९-१० मधील न वापरलेले अनुदान पुढे २०१०-११ मध्ये पुन्हा दिले गेले. त्यांनी ४४,७२,९००/- इतकी रक्कम शाळांनी वापरली गेली. म्हणजेच एकूण रकमेतून रु २५,०७,७०५/- इतकी रक्कम शिल्लक राहिली. म्हणजेच एकूण अनुदानातून ६४.०७% इतका खर्च झाला.

४. २०११-१२ मधील मागील वर्षाचे शिल्लक अनुदान रु.२५,०७,७०५/- व चालू वर्षासाठीचे रु. ६,००,०००/- असे एकूण रु. ३१,०७,७०५/- इतकी रक्कम अनुदान रुपात मिळाली ही सर्वच म्हणजेच १००% रक्कम खर्च झाली. हा खर्च मागील वर्षापेक्षा ३५.९३% नी जास्त होता.

५. तर वर्ष २०१२-१३ मध्ये रु. ५,५०,३७९/- इतकी रक्कम प्राप्त झाली आणि ती संपूर्णपणे म्हणजेच १००% रक्कम खर्च झाली.

## ५.३.४ अपंग एकात्मिक शिक्षण अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या अपंग एकात्मिक शिक्षण अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.५.१०**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | ९,३५, ००० | ९,३५,००० | ० | १००% |
| २००९ - १० | १०,२३,६०० | १०,२३,८०० | ० | १००% |
| २०१० - ११ | ३०,८४,१९५ | ३०,८३,६९५ | ५०० | ९९.९८% |
| २०११ - १२ | ३३,१३,४३९ | ३३,१३,४३९ | ० | १००% |
| २०१२ - १३ | २१,३०,००० | २१,३०,००० | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत सन २००८-०९ या वर्षाकरिता शहापूर तालुक्यातील शाळांना अपंग एकात्मिक शिक्षक अनुदान म्हणून रु. ९,३५,०००/- एवढी रक्कम मिळाली आणि ती पुर्णपणे म्हणजेच १००% वापरली गेली.

२. तर २००९-१० या वर्षांसाठी सरकारने रु. १०,२३,६००/- एवढी रक्कम अनुदानाच्या स्वरुपात अपंग एकात्मिक शिक्षणासाठी पुरवली ही रक्कम वर्ष २००८-०९ पेक्षा रु ८८,६००/- ने जास्त होती या रकमेच्या १००% भाग हा अपंग एकात्मिक शिक्षण कार्यक्रमासाठी वापरला गेला.

३. तर २०१०-११ या वर्षांसाठी ही रु. २०,६०,५९५/- ने जास्तीची म्हणजेच एकूण रु. ३०,८४,१९५/- इतकी दिली गेली. परंतु या रकमेतील रु.३०,८३,६९५/- इतकी रक्कम अपंग एकात्मिक शिक्षणासाठी वापरली गेली. हा खर्च मागील वर्षापेक्षा ०.०२% ने कमी होता.

४. तर २०११-१२ मध्ये रु. ३३,१३,४३९/- इतकी रक्कम शासनाने अनुदानाद्वारे दिली गेली ही रक्कम मागील वर्ष २०१०-११ च्या तुलनेत रु. २,२९,२४४/- ने जास्त होती आणि ही रक्कम १००% खर्च केली गेली.

५. तर २०१२-१३ या वर्षामध्ये अनुदानाच्या रुपात रु. २१,३०,०००/- इतकी रक्कम पुरविली गेली. परंतु २०११-१२ या वर्षापेक्षा ही रक्कम रु. ११,८३,४३९/- नी कमी होती परंतु एकूण अनुदानाचा १००% खर्च केला गेला.

## ५.३.५. व्यवस्थापन अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या व्यवस्थापन अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता क्र.५.११**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | १४,९४,००० | १३,३७,१०० | १,५६,९०० | ८९.४९% |
| २००९ - १० | १२,५०,००० | १,२५,००० | ० | १००% |
| २०१० - ११ | ६,००,००० | ६,००,००० | ० | १००% |
| २०११ - १२ | १२,६७,३७७ | १२,६७,३७७ | ० | १००% |
| २०१२ - १३ | ४,२१,८५४ | ४,१७,९१९ | ३९३५ | ९९.०७% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८-०९ मध्ये व्यवस्थापन अनुदानामध्ये रु. १४,९४,०००/- प्राप्त झाले आणि त्यातून रु. १३,३७,७००/- इतकी रक्कम खर्च होऊन रु. १,५६,०००/- रक्कम शिल्लक राहिल. म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानातून ८९.४९% अनुदानाचा खर्च झाला.

२. तर २००९-१० मध्ये रु. १२,५०,०००/- इतकी रक्कम व्यवस्थापन अनुदानासाठी प्राप्त झाली. त्यातून सर्वच्या सर्व रक्कम वापरली गेली म्हणून प्राप्त अनुदानाचा १००% विनियोग झाला.

३. तर २०१०-११ मध्ये ६,००,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली आणि त्यातून १००% रक्कम ही व्यवस्थापनवर खर्च झाली.

४. तर वर्ष २०११-१२ मध्ये रु.१२,६७,३७७ इतकी रक्कम अनुदानाच्या स्वरुपात प्राप्त झाली अणि त्या रकमेचा १००% विनियोग व्यवस्थापनावर करण्यात आला.

५. वर्ष २०१२-१३ मध्ये ४,२१,८५४/- इतकी रक्कम अनुदान स्वरुपात प्राप्त झाली त्यातून रु.४,१७,९१९/- इतकी रक्कम व्यवस्थापनासाठी वापरली गेली त्यामधून फक्त रु. ३,९३५/इतकी रक्कम शिल्लक राहिली म्हणजेच एकूण प्राप्त अनुदानातुन ९९.०७% रक्कम खर्च झाली हा खर्च २०११-१२ च्या तुलनेत ०.९३% ने कमी होता.

## ५.३.६ संशोधन व मूल्यमापन अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या संशोधन व मूल्यमापन अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.१२ मध्ये दिली आहे .

**तक्ता क्र.५.१२**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | ६२,००० | ५५,४०० | ६,६०० | ८९.३५% |
| २००९ - १० | ३८,१००<br>(मा. शिल्लक) | ४४,३०० | ० | १००% |
| २०१० - ११ | ८,००० | ८,००० | ० | १००% |
| २०११ - १२ | ७७,५२० | ५८,३२० | १९,२०० | ७५.२३% |
| २०१२ - १३ | २३,२९४ | २३,२९४ | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८-०९ मध्ये संशोधन व मूल्यमापन अनुदान स्वरुपात रु.६२,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली या रकमेतून रु.६२,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली. या रकमेतून रु. ५५,४००/- इतके

अनुदान खर्च होऊन रु. ६,६००/- इतकी रक्कम शिल्लक राहिली. एकूण प्राप्त अनुदानांपैकी ८९.३५% अनुदान संशोधन व मुल्यमापनावर खर्च झाले.

२. सन २००९-१० मध्ये प्राप्त अनुदान रु. ३८,१००/- आणि मागील वर्ष २००८-०९ ची बाकी रु.६,६००/- असे एकूण रु. ४४,७००/- प्राप्त झाले आणि ते १००% संशोधन व मुल्यमापन कार्यावर खर्च झाले.

३. तर वर्ष २०१०-११ मध्ये रु. ८०००/- इतकी रक्कम शासनाद्वारे संशोधन अनुदान कार्यासाठी देण्यात आली आणि त्यातील १००% रक्कम ही खर्च झाली.

४. सन २०११-१२ मध्ये रु.७७,५२०/- इतकी रक्कम पुरविण्यात आली मात्र या रकमेतून केवळ रु. ५८,३२०/- इतके खर्च झाले व त्यातून रु. १९२००/- इतकी रक्कम शिल्लक राहिली. म्हणजेच एकूण प्राप्त अनुदान रकमेच्या ७५.२३% रक्कम खर्च झाली.

५. तर वर्ष २०१२-१३ मध्ये रु. २३,२९४/- इतके रुपये अनुदान स्वरुपात प्राप्त झाले आणि प्राप्त अनुदान रक्कम १००% वापरण्यात आली.

## ५.३.७ शाळा दुरुस्ती अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या शाळा दुरुस्ती अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.१३ मध्ये दिली आहे .

**तक्ता क्र.५.१३**

| वर्ष | प्राप्त अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान | खर्च % |
|---|---|---|---|---|
| २००८ - ०९ | ३८,२६,००० | ३७,३०,१०० | ९५,९०० | ९७.४९% |
| २००९ - १० | ३०,७९,०२० | २५,१२,००० | ५,६७,०२० | ८१.५८% |
| २०१० - ११ | ३६,३४,००० | ३६,२७,००० | ७,००० | ९९.८१% |
| २०११ - १२ | ४०,२०,३६८ | ३६,१५,३६८ | ४०,५०० | ८९.९३% |
| २०१२ - १३ | २६,९०,००० | २६,९०,००० | ० | १००% |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

१. सन २००८-०९ मध्ये सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळा दुरुस्ती साठी रु. ३८,२६,०००/- प्राप्त झाले आणि त्यातील रु.३७,३०,१००/- शाळा दुरुस्तीवर खर्च झाले. त्यातून रु. ९५,०००/- रक्कम शिल्लक राहिली. म्हणून एकूण प्राप्त रकमेतून ९७.४९% टक्के रक्कम शाळा दुरुस्तीवर खर्च झाली.

२. तर २००९-१० या वर्षांसाठी रु. ३०,७९,०२०/- इतकी रक्कम प्राप्त झाली त्यातून जवळ जवळ ८१.५९% म्हणजेच रु. २५,१२,०००/- खर्च झाले. २००८ या वर्षाशी तुलना करता या खर्चात १५.९१% नी घट झाली.

३. तर २०१०-११ या वर्षांसाठी सरकारकडून ३६,३४,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली यातून जवळ जवळ ९९.८% रक्कम खर्च झाली. म्हणजेच हे प्रमाण मागील वर्षापेक्षा १८.२३ नी जास्त होतो.

४. तर २०११-१२ मध्ये शासनाकडून शाळा दुरुस्तीसाठी रु.४०,२०,३६८/- इतकी रक्कम मिळाली. ही रक्कम २०१०-११ च्या मानाने रु.४,०६,३६८/- ने जास्त होती.या रकमेतून रु. ३६,१५,३६८/- शाळा दुरुस्तीवर खर्च झाले एकूण प्राप्त रकमेतून जवळ जवळ ८९.९३% रक्कम शाळा दुरुस्तीवर खर्च झाली हे प्रमाण मागील वर्षाच्या खर्चाच्या तुलनेत ९.८८% कमी होते.

५. तर वर्ष २०१२-१३ मध्ये शासनाकडून शाळा दुरुस्तीसाठी रु.२६,९०,०००/- इतकी रक्कम मिळाली. ही रक्कम २०११- १२ च्या तुलनेत रु.१३,३०,३६८/- ने कमी होती. एकूण प्राप्त रकमेतून १००% रक्कम ही शाळा दुरुस्तीवर खर्च झाली. हा खर्च मागील वर्षापेक्षा १०.०७% नी जास्त होता.

## ५.३.८ एकूण अनुदान :-

शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या एकूण अनुदानाची माहिती तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये दिली आहे .

### तक्ता क्र.५.१४

| अनुदान | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षक अनुदान | ७,८०,००० | ८,६८,००० | ९,७३,००० | ८,२९,००० | ८,९८,००० | ४३,४८,००० |
| शाळा अनुदान | २९,६९,००० | ३५,५५,००० | ३३,७९,००० | ३४,३६,००० | ३४,६१,००० | १,६८,००,००० |
| बांधकाम | १,३१,७१,००० | | | २५,०७,७०५ | ५५,०३,३७९ | १,६२,२९,०८४ |
| अपंग एकात्मिक शिक्षण | ९,३५, ००० | १०,२३,६०० | ३०,८४,१९५ | ३३,३१,४३९ | २१,३०,००० | १,०५,०४,२३४ |
| शाळा दुरुस्ती | ३३,२६,००० | ३०,७९,०२० | ३६,३४,००० | ४०,२०,३६८ | २६,९०,००० | १,६७,४९,३८८ |
| व्यवस्थापन | १४,९४,००० | १२,५०,००० | ६,००,००० | १२,६७,३७७ | ४,२१,८५४ | ५०,३३,२३१ |
| संशोधन व मुल्यमापन | ६२,००० | ३८,१०० | ८,००० | ७७,५२० | २३,२९४ | २,०८,९१४ |
| एकूण | २,२७,३७,००० | ९,८१,३,७२० | १,१६,७८,१९५ | १,५४,६९,४०९ | १,०१,७४,५२७ | ६९,८७,२८५१ |

( स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी, २. शिक्षण अधिकारी वार्षिक अहवाल २००८ ते २०१३ )

एकंदरित सर्व अनुदानांचा विचार करता २००८ – २०१३ या कालावधी मध्ये शहापूर तालुक्यात रक्कम रू ६,९८,७२,८५१/- इतके अनुदान शाळांना प्राप्त झाले त्यामध्ये.

१. २००८–२००९ मध्ये सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानामध्ये बांधकाम अनुदानास सर्वात जास्त रक्कम रू १,३१,७१,०००/- (५७.९२%) रक्कम प्राप्त झाली त्यानंतर मात्र २००९–२०११ पर्यंत कोणत्याही प्रकारची रक्कम बांधकाम अनुदान स्वरूपात प्राप्त झाली नाही. म्हणजेच २०११–२०१२ मध्ये प्राप्त अनुदानापैकी (१६%) तर २०१२–२०१३ मध्ये प्राप्त अनुदानापैकी (५४.०८%) इतकी होती.

२. सन २००९–२०१० मध्ये सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त अनुदानाद्वारे एकूण रू ९८,१३,७२०/- मात्र प्राप्त झाले. यावर्षी प्राप्त अनुदानांमध्ये सर्वात जास्त रक्कम शाळा अनुदानास म्हणजेच रू ३५,५५,०००/- (३६.२२%) रक्कम प्राप्त झाली आणि हिच रक्कम २००८–२०१३ या कालावधीतील शाळा अनुदानास प्राप्त झालेली रक्कम ही एकूण अनुदानातील सर्वात जास्त म्हणजेच (२१.१६%) इतकी होती.

३. तर २०१०–२०११ या वर्षामध्ये शाळा दुरूस्ती अनुदानासाठी सर्वात जास्त अनुदान म्हणजेच रू ३६,३४,०००/- (३१.११%) इतकी होती.

४. तर २०११-२०१२ मध्ये प्राप्त अनुदानांमध्ये सर्वात जास्त अनुदान शाळा दुरूस्ती अनुदानास प्राप्त झाले. म्हणजेच जवळजवळ रू ४०,२०,३६८/- (२५.९८%) इतकी रक्कम प्राप्त झाली आणि ही रक्कम २००८–२०१३ या पाच वर्षामध्ये २०११–२०१२ या वर्षासाठी सर्वात जास्त म्हणजेच (२४%) रक्कम अनुदानासाठी प्राप्त झाली.

५. तर सन २०१२–२०१३ मध्ये एकूण अनुदान रू १०,१७,४,५२७/- रूपये प्राप्त झाले. त्यात बांधकाम अनुदानास सर्वात जास्त रक्कम म्हणजेच ५५,०३,३७९/- म्हणजेच (५४.०८%) रक्कम प्राप्त झाली.

६. एकंदरित पाहता २००८ ते २०१३ या कालावधीत सर्व शिक्षा अभियानांअंतर्गत एकूण ६,९८,७२,८५१/- इतकी रक्कम अनुदान प्राप्त रूपात झाली त्यातही २००८ मध्ये प्राप्त झालेली अनुदान रक्कम रू २,२७,३७,०००/- (३२.५%) ही सर्वात जास्त होती.

## ५.३.९ विद्यार्थी संख्येनुसार शाळांचे वर्गीकरण :-

२००८ ते २०१३ या पाच वर्षात शहापूर मधील शाळांचे विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे ते तक्ता क्रं ५.१५ मध्ये दिलेले आहे.


**तक्ता क्रं : ५.१५**

| शाळांचा तपशिल | शासकीय शाळेतील वि. सं. | | स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतील वि. सं. | | खाजगी अनुदानित शाळेतील वि. सं | | खाजगी विना अनुदानित शाळेतील वि . सं | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | वाढ/घट | संख्या | वाढ/घट | टक्के | वाढ/घट | संख्या | वाढ/घट |
| २००८ | ४२१० | - | ४४४७५ | - | ४५३१ | - | ३८७१ | ३० |
| २०१३ | ४६१८ | +९.६९ | २५७४४ | –५७.८६ | ४९९३ | +१०.१९ | ५९४० | +५३.४४ |

(वि.सं.- विद्यार्थी संख्या )स्त्रोत :१. क्षेत्रिय पाहणी, ठाणे २.ठाणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन (२००८ ते २०१३)

<u>**आलेख क्र. ५.१**</u>

# <u>विद्यार्थी संख्येनुसार शाळांचे वर्गीकरण</u>



| | शासकिय शाळेतील वि. सं. वाढ/घट | स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतील वि. सं. वाढ/घट | खाजगी अनुदानित शाळेतील वि. सं वाढ/घट | खाजगी विना अनुदानित शाळेतील वि . सं वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| २००८ | ० | ० | ० | ३० |
| २०१३ | ९.६९ | -५७.८६ | १०.१९ | ५३.४४ |

तक्ता क्र ५.१५ च्या आधारे शहापूर तालुक्यातील शाळांतील विद्यार्थी संख्येत वर्ष २००८ ते वर्ष २०१३ या कालावधीत झालेल्या बदलां संदर्भात निष्कर्ष मांडता येतात.

१. वर्ष २००८ च्या तुलनेत वर्ष २०१३ मध्ये शासकीय शाळांतील विद्यार्थी संख्येत +९.६९% नी वाढ झाली आहे.

२. तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थी संख्या वर्ष २००८ च्या तुलनेत २०१३ मध्ये -५७.८६% नी घट झाली. क्षेत्रिय पाहणीद्वारे असे आढळून येते की, या शाळांमधील विद्यार्थ्यांची खाजगी अनुदानित व विना अनुदानित शाळांमध्ये वाढता कल आहे.

३. तर खाजगी अनुदानित शाळा व खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वर्ष २००८ च्या तुलनेत वर्ष २०१३ मध्ये अनुक्रम + १०.१९% व +५३.४४% नी वाढलेली आहे.

## ५.३.१० इमारतीच्या रचनेनुसार शाळांचे वर्गीकरणः-

सन २००८ ते २०१३ या पाच वर्षात शहापूर तालुक्यामधील शाळांच्या रचनेत झालेल्या बदलांचे वर्गीकरण तक्ता क्रं ५.१६ मध्ये दिलेले आहे.


**तक्ता क्रं : ५.१६**

| शाळांचा तपशिल | २००८ | | | २०१३ | | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बैठी | इमारत | एकुण | इमारत | बैठी | इमारत | बैठी | इमारत |
| शासकीय शाळा | ५ | - | ५ | ३ | २ | ५ | -४० | +१०० |
| स्थानिक स्वराज्य संख्या | ३० | ५ | ३५ | १० | २५ | ३५ | -६६.६६ | +४०० |
| खाजगी अनुदानित | २ | ३ | ५ | | ५ | ५ | -५० | +६६.६६ |
| खाजगी विनाअनुदानित | ३ | २ | ५ | १ | ४ | ५ | -६६.६६ | +६६.६६ |

( स्त्रोत - क्षेत्रीय पाहणी )

<u>**आलेख क्र. ५.२**</u>

<u>**इमारतीच्या रचनेनुसार शाळांचे वर्गीकरण**</u>




**तक्ता क्र. ५.१६ च्या आधारे शहापूर तालुक्यातील शाळांच्या रचनेतील बदल दाखविले आहेत. रचनेतील बदल २०१३ मध्ये शहापूर मधील बैठी शाळांची संख्या घटली असून त्याच ठिकाणी इमारतीची संख्या वाढली आहे. २००८ च्या तुलनेत २०१३ मध्ये शासकीय बैठी शाळांमध्ये -४०% नी घट झाली तर इमारत शाळांमध्ये +१०० नी वाढ झाली. तर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बैठी शाळांमध्ये -६६.६६% नी घट झाली तर इमारत शाळांमध्ये (४००) चार पटीने वाढ झाली आहे.**

**तर खाजगी अनुदानित शाळांमध्येही २००८ च्या तुलनेत २०१३ मध्ये बैठी शाळांमध्ये -५०% नी घट झाली व इमारती शाळांमध्ये +६६.६६% नी वाढ झाली आहे. तर इमारती शाळांमध्ये ११% नी म्हणजेच ११ पटीने वाढ झालेली दिसून येते.**

## ५.३.११ शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकांचे वर्गीकरण

तक्ता क्र. ५.१७ मध्ये शिक्षकांचे त्यांच्या पात्रतेनुसार वर्गीकरण केलेले आहे.

**तक्ता क्र. ५.१७**


| वर्ष | शासकीय शाळेतील शि. सं. | | स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शा. शि. सं. | | खाजगी अनुदानित शा. शि. सं | | खाजगी विना अनुदानित शा. शि. सं | | एकुण संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| एच.एस.सी, डी.टी.एड. | ४ | ११.७६ | २५ | ७३.५२ | २ | ५.८८ | ३ | ८.८२ | ३४ | १०० |
| बी.ए, बी.एड. | १ | ४ | २० | ८० | २ | ८ | २ | ८ | २५ | १०० |
| बी.ए,डी.टी.एड.बी.एड. | १ | ५० | - | - | १ | ५० | - | १२.८२ | २ | १०० |
| एम.ए , बी.एड. | ५ | १०.२५ | २५ | ६४.१० | ५ | १२.८२ | ५ | ५० | ३९ | १०० |
| एकूण | १० | - | ७० | - | १० | - | १० | - | १०० | - |

( शा. शि. सं. शाळांतील शिक्षक संख्या )( संदर्भ - क्षेत्रीय पाहणी )

(टिप : क्षेत्रिय पाहणीत असे लक्षात आले की, विज्ञान व वाणिज्य शाखेतील शिक्षक मिळाले नाहीत.  सर्व शिक्षक कला शाखेतील पदवीधर आहेत. )

## आलेख क्र.५.३

## शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षकांचे वर्गीकरण




शहापूर तालुक्यातील शाळांमधील कार्यरत शिक्षकांचा अभ्यास करता एकंदरित शिक्षकांच्या संख्येचा विचार करता सर्व शाळांमध्ये एकूण (३४%) शिक्षकांचे एच.एस.सी, डी.टी.एड. झालेले आहे. त्यात शासकिय शाळेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेमध्ये ३५ (७३.५२%) खाजगी अनुदानित शाळांमध्ये (५.८८%)तर खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये ३ (८.८२%) शिक्षक कार्यरत आहेत.

तर बी.ए, बी.एड.पदवीका प्राप्त शिक्षकांची संख्या एकंदरित शिक्षक संख्येच्या २५ (२५%) आहे त्यात शासकीय शाळेमध्ये १ (४%) स्थानिक स्वराज्य संस्थेत २० (८०%) तर खाजगी अनुदानित शाळेत २(८%) शिक्षक कार्यरत आहेत. आपल्या शिक्षणाचा व व्यवसायिकतेचा दर्जा उंचविण्यासाठी बी.ए,डी.टी.एड.बी.एड.असणाऱ्या शिक्षकांची संख्या एकंदरित शिक्षक संख्येच्या (२०%) आहे. त्यात शासकिय शाळेत १ (५०%) व खाजगी अनुदानित शाळेत १ (५०%) शिक्षक आहेत.

एम.ए, बी.एड., पदवी असणारे शिक्षक एकंदरित शिक्षक संख्येच्या सर्वात जास्त म्हणजेच ३९ (३९%) आहे. त्यात शासकिय शाळेत ४ (१०.२५%) स्थानिक स्वराज्य संख्येत २५ (६४.१०%) तर खाजगी अनुदानित शाळेत ५ (१२.८२%) व खाजगी विना अनुदानित शाळेत ५ (१२.८२%) शिक्षक कार्यरत आहेत.

## ५.३.१२ शिक्षकांच्या शालेय व रिकाम्या वेळेच्या वापरानुसार वर्गीकरण :-

अभ्यासासाठी निवडलेले शिक्षक आपला शालेय वेळ व रिकामा वेळ कशा पध्दतीने व्यतित करतात. या संदर्भात संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण तक्ता क्र. ५.१८ मध्ये दिले आहे.

### तक्ता क्र. ५.१८


| अ.क्र. | तपशिल | शिक्षक | |
|---|---|---|---|
| | | संख्या | टक्के |
| १ | पुर्ण वेळ नोकरी<br>(सरकारी शाळा) | ८० | ७२.७२ |
| २ | पुर्ण वेळ नोकरी<br>(खाजगी अनु. व विना अनु. शाळा) | २० | १८.१८ |
| ३ | अर्धवेळ नोकरी<br>(खाजगी अनु. व विना अनु. शाळा) | १० | ९.०९ |
| ४ | खाजगी शिकवणी | ९० | ८१.८१ |
| ५ | घरची कामे | ८० | ७२.७२ |
| ६ | अभ्यासासाठी<br>अ) विद्यार्थ्यांसाठी<br>ब) स्वताःसाठी | <br>९०<br>२० | <br>८१.८१<br>१८.१८ |

( स्त्रोत - क्षेत्रीय पाहणी )

(टिप : शासकिय शाळांतील शिक्षक संख्या १०, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील शिक्षक संख्या ७०, खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक संख्या १५, खाजगी विनाअनुदानित शाळांतील शिक्षक संख्या १५ अशी एकंदरित ११० शिक्षकांची क्षेत्रिय पाहणीनुसार मुलाखत घेतली गेली.

# <u>आलेख क्र. ५.४</u>

## <u>शिक्षकांच्या शालेय व रिकाम्या वेळेच्या वापरानुसार वर्गीकरण</u>




क्षेत्रीय पातळीनुसार ११० शिक्षकांपैकी ८० (७२.७२%) शिक्षक हे सरकारी म्हणजेच शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये नोकरी करतात. तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये एकूण शिक्षकांपैकी २० (१८.१८%) शिक्षक पूर्ण वेळ नोकरी करतात. तर खाजगी

शाळामध्ये १० (०९.०९%) शिक्षक हे अर्धवेळ नोकरी करतात. ज्यांना तासिकेवर वेतन दिले जाते.

एकूण ११० शिक्षकांपैकी ९० (८१.८१%) शिक्षक आपल्या कुंटुबाच्या आर्थिक उन्नतीसाठी खाजगी शिकवणी घेतात तर ८० (७२.७२%) शिक्षक हे घरची कामे जसे शेती, मुलांची काळजी घेणे, यामध्ये आपला शालेय वेळे व्यतिरिक्तचा रिकामा वेळ व्यतित करतात. तर ९०(८१.८१%) शिक्षक आपला रिकामा वेळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या तयारीसाठी करतात. तर काही शिक्षक हे आपल्या शैक्षणिक अनुभवानुसार आपला विषय शिकवितात. तर (१८.१८%) शिक्षक हे स्वतःच्या शैक्षणिक व व्यावसायिक उन्नतीसाठी आपला रिकामा वेळेचा वापर स्वतःच्या अभ्यासासाठी करतात.

## ५.३.१३ क्रिंडागण / मैदान उपलब्धतेवरुन शाळांचे वर्गीकरणः-

अभ्यासासाठी निवडलेल्या शाळांची क्रिडांगण उपलब्धतेनुसार केलेले वर्गीकरण तक्ता क्र. ५.१९ मध्ये दिलेला आहे.

**तक्ता क्र. ५.१९**


| शाळांचा तपशिल | शाळेचे स्वतःचे | | भाडेतत्वावर | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| शासकीय शाळा | ४ | ९.५२ | ०१ | १२.०५ |
| स्थानिक स्वराज्य संस्था | ३० | ७१.४२ | ०५ | ६२.०५ |
| खाजगी अनुदानित | ५ | ११.९० | - | - |
| खाजगी विनाअनुदानित | ३ | ७.१४ | ०२ | २५ |
| एकूण | ४२ | १०० | ०८ | १०० |

( स्त्रोत - क्षेत्रीय पाहणी )

(टिपःया संदर्भात अशी माहिती मिळाली की भाडेतत्वावर मैदान घेणाऱ्या शाळांना काही वेळा सामाजिक बांधिलकी म्हणून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. तर काही ठिकाणी मैदानाचे भाडे म्हणून केवळ नाममात्र शुल्क आकारले जाते. )

# आलेख क्र. ५.५

## क्रिंडागण / मैदान उपलब्धतेवरुन शाळांचे वर्गीकरण



| | शासकीय शाळा | स्थानिक स्वराज्य संस्था | खाजगी अनुदानित | खाजगी विनाअनुदानित |
|---|---|---|---|---|
| भाडेतत्वावर टक्के | १२.०५ | ६२.०५ | ० | २५ |
| शाळेचे स्वतःचे टक्के | ९.५२ | ७१.४२ | ११.९ | ७.१४ |

क्षेत्रिय पाहणीद्वारे असे आढळून आले की, प्रतिसादक शाळांमधील ४२ (८४%) शाळांना स्वतःचे किंडागण/मैदान आहे. तर ८ (१६%) शाळांना स्वतःचे क्रिडांगण/मैदान नाही. हया शाळा भाडेतत्वावर क्रिडांगण वापरतात.

स्वतःचे मैदान असणाऱ्या शाळांमध्ये शासकीय शाळा ४ (९.५२%), स्थानिक स्वराज्य संस्था ३० (७१.४२%), खाजगी अनुदानित ५ (११.९०%) व खाजगी विनाअनुदानित ३ (७.१४%) शाळांचा समावेश आहे.

तर भाडेतत्वावर मैदान असणाऱ्या शाळांमध्ये शासकीय ाकिय शाळा १ (१२.०५%), स्थानिक स्वराज्य संस्था ५ (६२.०५%) तर खाजगी विनाअनुदानित २ (२५%) शाळांचा समावेश आहे.

## ५.३.१४ स्वच्छता गृहाच्या उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण :-

अभ्यासासाठी निवडेलेल्या शाळामधील उपलब्ध सोयी–सुविधानुसार स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेनुसार तक्ता क्र .५.२० मध्ये वर्गीकरण केले आहे.


**तक्ता क्र ५.२०**

| शाळांचा तपशिल | पश्चिमात्य पद्धतीचे | | भारतीय पद्धतीचे | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| शासकीय शाळा | १ | ६.६६ | ४ | ११.४२ |
| स्थानिक स्वराज्य संस्था शाळा | १० | ६६.६६ | २५ | ७१.४२ |
| खाजगी अनुदानित शाळा | ३ | २० | २ | ५.७१ |
| खाजगी विनाअनुदानित शाळा | १ | ६.६६ | ४ | ११.४२ |
| एकूण | १५ | १०० | ३५ | १०० |

(स्त्रोत : क्षेत्रिय पाहणी)

<u>**आलेख क्र. ५.६**</u>

## स्वच्छता गृहाच्या उपलब्धतेनुसार शाळांचे वर्गीकरण




**एकंदरीत नमुना शाळांचा अभ्यास करता असे दिसून आले की सर्वाधिक शाळांमध्ये ३५(७०%) भारतीय पद्धतीची स्वच्छतागृहांची व्यवस्था आहे. तर १५ (३०%) शाळांमध्ये पाश्चिमात्य पद्धतीच्या स्वच्छतागृहांची व्यवस्था आहे.**

**पाश्चिमात्य पध्दतीच्या स्वच्छता गृहांची सुविधा शासकीय १ (६.६६%) शाळांमध्ये तर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या १० (६.६६%) शाळांमध्ये तर खाजगी अनुदानित ३ (२०%), शाळांमध्ये आणि खाजगी विनाअनुदानित १ (६.६६%), शाळांमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे.**

**तर भारतीय पध्दतीच्या स्वच्छतागृहांच्या व्यवस्थेनुसार वर्गीकरण करता असे करता येईल की, शासकिय शाळा ४ (११.४२%), स्थानिक स्वराज्य संस्था २५ (७१.४२%), तर खाजगी अनुदानित शाळा २ (५.७१%) व खाजगी विनाअनुदानित शाळा ४ (११.४२%) आहेत.**

## ५.३.१५ उपलब्ध पाणी पुरवठा सुविधेनुसार शाळांचे वर्गीकरण :-

अभ्यासासाठी निवडलेल्या शाळामध्ये उपलब्ध असणाऱ्या सुख सुविधा म्हणजेच पाणी पुरवठयाच्या सुविधांची तपशीलवार माहिती तक्ता क्र ५.२१ मध्ये दिलेली आहे.


**तक्ता क्र ५.२१**

| शाळांचा तपशिल | विहीरी | | हातपंप | | फिल्टर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | संख्या | टक्के | टक्के |
| शासकीय शाळा | १ | १६.६६ | १ | २५ | ३ | ७.५ |
| स्थानिक स्वराज्य संख्या | ३ | ५०.०० | २ | ५० | ३० | ७५ |
| खाजगी अनुदानित | २ | ३३.३३ | - | | ३ | ७.५ |
| खाजगी विनाअनुदानित | - | | १ | २५ | ४ | १० |
| एकूण | ६ | १०० | ४ | १०० | ४० | १०० |

( स्त्रोत - क्षेत्रीय पाहणी )

## आलेख क्र. ५.७

## उपलब्ध पाणी पुरवठा सुविधेनुसार शाळांचे वर्गीकरण




तक्ता क्र ५.२१ वरुन असे दिसून येते शहापूर तालुक्याची शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित शाळामध्ये विहीरी हातपंप, आणि फिल्टर अशा पाणी पुरवठयाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

अभ्यासासाठी एकुण नमुना शाळा ५० घेतल्या. त्यात क्षेत्रिय पाहणीव्दारे असे लक्षात आले की, विहिरीव्दारे पाणीपुरवठा सुविधा असणाऱ्या एकुण सहा शाळा आहेत त्यांचे वर्गीकरण शासकीय शाळा ६ (१६.६६%), स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा ३ (५०%), व खाजगी अनुदान २ (३३.३३%), आहेत तर खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये विहिरीव्दारे पाणीपुरवठा केला जात नाही.

तर हात पंपाद्वारे पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध असणाऱ्या एकूण (४) शाळा आहेत. त्यात शासकीय शाळा १(२५%) स्थानिक स्वराज्य संस्था २(५०%) व खाजगी विनाअनुदानित १ (२५%) इतक्या आहेत तर खाजगी अनुदानित शाळांमध्ये हातपंपाद्वारे पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध नाही.

तर फिल्टर द्वारे पाणीपुरवठा सुविधा असणाऱ्या एकुण ४० शाळा आहेत. त्यात ३९(७.५%) शासकीय शाळा, ३०(७५%) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळा, तर खाजगी अनुदानित शाळा ३(७.५%) शाळा आहेत तर खाजगी विनाअनुदानित मध्ये ४ (१०%) शाळांमध्ये फिल्टरचा उपयोग पाणीपुरवठयासाठी केला जातो.

## ५.३.१६ शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागानुसार वर्गीकरणः-

तक्ता क्र.५.२२ मध्ये शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागनुसार शिक्षकांचे वर्गीकरण दिले आहे.


**तक्ता क्र . ५.२२**

| अनु.क्र. | तपशील | शाळा | | |
|---|---|---|---|---|
| | | सरकारी (शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था) | खाजगी अनुदानित | खाजगी विनाअनुदानित |
| १ | निवडणूका | ८० (१००%) | १० (१००%) | - |
| २ | जणगणना | ८० (१००%) | २ (२०%) | १० (१००%) |
| ३ | इतर कामे | ३० (३०%) | २ (२०%) | ५ (५०%) |

(स्त्रोतः- क्षेत्रीय पाहणी)

## आलेख क्र. ५.८

## शैक्षणिक कार्याव्यतिरिक्त सरकारी कामात सहभागानुसार वर्गीकरण




तक्ता क्र. ५.२२ नुसार क्षेत्रिय पाहणीत असे आढळून आले की, शासकीय शाळा व स्थानिक स्वराज्य संस्था शाळा, खाजगी अनुदानित व खाजगी विनाअनुदानित शाळांमधील सर्व (१००%) शिक्षकांना निवडणूकीच्या कार्यामध्ये सरकारी कार्यामध्ये अनिवार्यपणे सहभाग घ्यावा लागतो. तर सरकारी शाळांमधील ८० (१००%) शिक्षकांना जणगणनेतही सहभाग घ्यावे लागते. तर इतर सरकारी कामे (जसे स्पर्धा परिक्षांचे पर्यवेक्षक) यामध्ये (३०%) पुरुष शिक्षकांचा समावेश दिसून येतो.

तर खाजगी अनुदानित शाळामधील केवळ (२०%) शिक्षक जणगणना कार्यात सहभागी होतात व (२०) शिक्षक हे इतर सरकारी कार्यामध्ये सहभागी होतात. तर खाजगी विना अनुदानित शाळांमधील शिक्षकांचा

निवडणूकीत (१००) समावेश असतो तर जणगणनेमध्ये कोणत्याही प्रकारचा समावेश नसतो तर इतर सरकारी कामांमध्ये इतर शाळांतील शिक्षकापेक्षा जास्तीचा म्हणजे (५०) समावेश असतो.

## ५.३.१७ अनुदानांचे प्राप्त रकमेनुसार वर्गीकरण :-

तक्ता क्र. ५.२३ मध्ये शहापूर तालुक्यातील शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदानांची (२००८ - २०१३) तपशीलवार माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ५.२३**


| अनुदान | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षक अनुदान | ७,८०,०००<br>(१७.९३%) | ८,६८,०००<br>(१९.९६%) | ९,७३,०००<br>(२२.३७%) | ८,२९,०००<br>(१९.०६%) | ८,९८,०००<br>(२०.६३%) | ४३,४८,०००<br>(१००%) |
| शाळा अनुदान | २९,६९,०००<br>(१७.६७%) | ३५,५५,०००<br>(२१.१६%) | ३३,७९,०००<br>(२०.११%) | ३४,३६,०००<br>(२०.४५%) | ३४,६१,०००<br>(२०.६०%) | १,६८,००,०००<br>(१००%) |
| बांधकाम | १,३१,७१,०००<br>(८१.१५%) | - | - | २५,०७,७०५<br>(१५.४७%) | ५५,०३,३७९<br>(३३.९१%) | १,६२,२९,०८४<br>(१००%) |
| अपंग एकात्मिक शिक्षण | ९,३५, ०००<br>(०८.९०%) | १०,२३,६००<br>(०९.७४%) | ३०,८४,१९५<br>(२९.३६%) | ३३,३१,४३९<br>(३१.५४%) | २१,३०,०००<br>(२०.२७%) | १,०५,०४,२३४<br>(१००%) |
| शाळा दुरुस्ती | ३३,२६,०००<br>(१९.८५%) | ३०,७९,०२०<br>(१८.३२%) | ३६,३४,०००<br>(२१.६९%) | ४०,२०,३६८<br>(२४.००%) | २६,९०,०००<br>(१५.८७%) | १,६७,४९,३८८<br>(१००%) |
| व्यवस्थापन | १४,९४,०००<br>(२९.६८%) | १२,५०,०००<br>(२४.८३%) | ६,००,०००<br>(११.९२%) | १२,६७,३७७<br>(२५.१८%) | ४,२१,८५४<br>(०८.३८%) | ५०,३३,२३१<br>(१००%) |
| संशोधन व मुल्यमापन | ६२,०००<br>(२९.६७%) | ३८,१००<br>(१८.२३%) | ८,०००<br>(०३.८२%) | ७७,५२०<br>(३७.१०%) | २३,२९४<br>(११.१५%) | २,०८,९१४<br>(१००%) |

स्त्रोत : १. क्षेत्रिय पाहणी

२. वार्षिक अहवाल, पंचायत समिती शहापूर, शिक्षण विभाग (शहापूर)

## <u>आलेख क्र. ५.९</u>

## <u>अनुदानांचे प्राप्त रकमेनुसार वर्गीकरण</u>



| | शिक्षक अनुदान | शाळा अनुदान | बांधकाम | अपंग एकात्मिक शिक्षण | शाळा दुरुस्ती | व्यवस्थापन | संशोधन व मुल्यमापन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००८-०९ | १७.९३ | १७.६७ | ८१.१५ | ८.९ | १९.८५ | २९.६८ | २९.६७ |
| २००९-१० | १९.९६ | २१.१६ | ० | ९.७४ | १८.३२ | २४.८३ | १८.२३ |
| २०१०-११ | २२.३७ | २०.११ | ० | २९.३६ | २१.६९ | ११.९२ | ३.८२ |
| २०११-१२ | १९.०६ | २०.४५ | १५.४७ | ३१.५४ | २४ | २५.१८ | ३७.१ |
| २०१२-१३ | २०.६३ | २०.६६ | ३३.९१ | २०.२[illegible] | १५.८[illegible] | ८.३८ | ११.१५ |

तक्ता क्र ५.२३ मध्ये २००८-२०१३ या पाच वर्षांमध्ये शाळांना शिक्षक अनुदान स्वरुपात प्राप्त होणारी रक्कम २०१०—११ मध्ये सर्वाधिक (२२.३७%) होती. परंतु प्राप्त माहितीनुसार २०१४—१५ मध्ये हे अनुदान शासनाने देणे बंद केले आहे.

तर शाळा अनुदान स्वरुपात प्राप्त होणारी रक्कम २००९—१० मध्ये सर्वाधिक होती. या रकमेमध्ये काही विशेष वाढ होतांना दिसून येत नाही. तर बांधकाम अनुदानाव्दारे २००८ - ०९ मध्ये सर्वाधिक रक्कम (८१.१५%) दिली आहे.त्यानंतर मात्र २००९-११ या वर्षांसाठी कोणतेही अनुदान बांधकामास देण्यात आले

नाही तर अपंग एकात्मिक शिक्षण अनुदानाव्दारे सर्वाधिक (३१.५४%) रक्कम २०११–१२ मध्ये देण्यात आली आहे.

तर शाळा दुरुस्ती अनुदानाव्दारे सर्वाधिक (२४%) रक्कम २०११–१२ मध्ये देण्यात आली तर व्यवस्थापन अनुदानाव्दारे सर्वाधिक (२९.६८%) रक्कम २००८-०९ मध्ये देण्यात आलेली दिसून येते तर संशोधन व मूल्यमापन अनुदानास २००८-०९ मध्ये सर्वाधिक (२९.६७%) रक्कम २००८-०९ मध्ये देण्यात आली.

## ५.३.१८ अनुदानाबाबत शिक्षकांच्या मताचे वर्गीकरण :-

तक्ता क्र ५.२४ मध्ये क्षेत्रीय पाहणी द्वारे शिक्षकांचे अनुदानाबाबतच्या विचाराचे वर्गीकरण केलेले आहे.


**तक्ता क्र. ५.२४**

| अनुदान | समाधानी | | असमाधानी | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्के | संख्या | संख्या | टक्के | टक्के |
| शिक्षक अनुदान | ३० | ३० | ७० | ७० | १०० | १०० |
| शाळा अनुदान | ६३ | ६३ | ३७ | ३७ | १०० | १०० |
| बांधकाम अनुदान | ६३ | ०० | १०० | १०० | १०० | १०० |
| अपंग एकात्मिक अनुदान | ९० | ९० | १० | १० | १०० | १०० |
| व्यवस्थापन अनुदान | ८७ | ८७ | १३ | १३ | १०० | १०० |
| संशोधक व मुल्य | २८ | २८ | ७२ | ७२ | १०० | १०० |
| शाळा दुरुस्ती | १५ | १५ | ८५ | ८५ | १०० | १०० |

( स्त्रोत : क्षेत्रिय पाहणी )

# <u>आलेख क्र. ५.१०</u>

## <u>अनुदानाबाबत शिक्षकांच्या मताचे वर्गीकरण</u>




| | शिक्षक अनुदान | शाळा अनुदान | बांधकाम अनुदान | अपंग एकात्मिक अनुदान | व्यवस्थापन अनुदान | संशोधक व मुल्य | शाळा दुरुस्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| समाधानी टक्के | ३० | ६३ | ० | ९० | ८७ | २८ | १५ |
| असमाधानी संख्या | ७० | ३७ | १०० | १० | १३ | ७२ | ८५ |

१. शिक्षक अनुदानाबाबत एकंदर शिक्षक संख्येत ३०% शिक्षक हे समाधानी आहेत. तर ७०% शिक्षक हे असमाधानी असल्याचे आढळते.

२. शाळा अनुदानाबाबत एकंदर शिक्षक संख्येत ६३% शिक्षक समाधानी आहेत तर ३७% शिक्षक असमाधानी आहेत.

३. बांधकाम अनुदानाबाबत १००% शिक्षक असमाधानी दिसतात कारण वर्षानुवर्षे बांधकाम अनुदान देण्याऐवजी इतर बाबींमध्ये अनुदान वाढ करावी, असे शिक्षक वर्गांना वाटते.

४. अपंग एकात्मिक शिक्षण अनुदानाबाबत ९०% शिक्षक हे समाधानी आहेत तर १०% शिक्षक हे असमाधानी असल्याचे आढळते.

५. व्यवस्थापन अनुदानाबाबत ८७% शिक्षक समाधानी दिसून येतात तर १३% शिक्षक असमाधानी असल्याचे आढळते.

६. संशोधन व मुल्यमापन संशोधनाबाबत एकंदर शिक्षक संख्येत केवळ २८% शिक्षक समाधानी आहेत तर ७२% शिक्षक समाधानी दिसून येतात.

७. शाळा दुरुस्ती अनुदानाबाबत एकंदर शिक्षक संख्येत १५% शिक्षक समाधानी दिसून येतात तर ८५% शिक्षक असमाधानी असल्याचे दिसून येतात.

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष व शिफारशी

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| ६.१ | प्रस्तावना |
| ६.२. | निष्कर्ष |
| ६.३ | गृहितकांची पडताळणी |
| ६.४ | सैध्दान्तिक पडताळणी |
| ६.५ | शिफारशी |
| ६.६ | समारोप |

# निष्कर्ष व शिफारशी

## ६.१. प्रस्तावना :

सरकारी अनुदानाचा ठाणे जिल्हातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास. या संदर्भात सदर अभ्यास केला आहे. अभ्यासासाठी आवश्यक माहितीचे संकलन करण्याकरीता प्राथमिक माहिती सामुग्री व दुय्यम माहिती सामुग्री या साधनसामुग्रीचा वापर करण्यात आला व विविध शासकीय अहवालातून माहितीचे संकलन, वर्गीकरण, सारणीकरण व पृथ्थकरण करुन व संशोधकाने त्यास आलेल्या अनुभवांवरुन खालील निष्कर्ष मांडले आहेत. शाळांना मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेचा योग्य प्रकारे विनियोग करुन अनुदान देण्यामागील उद्‌दिष्टये साध्य करण्याकरीता काही उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

## १.२.निष्कर्ष -

१. संशोधकास संशोधन करताना असे लक्षात आले की, प्रतिसादक शाळांना प्राप्त होणारे अनुदान शैक्षणिक वर्षात प्राप्त होते. बहुतांशी ते सप्टेंबर ते जानेवारी महिन्यांच्या दरम्यान प्राप्त होते.

२. संशोधकास संशोधन करताना असे लक्षात आले की, शिक्षकांना शिक्षक अनुदानाद्वारे प्राप्त होणारी रक्कम ही त्यांच्या मासिक वेतनामध्ये बदल घडवून आणत नाही.म्हणून शिक्षक या अनुदानाबद्दल समाधानी नाहीत.

३. शाळा अनुदान रकमेचा जास्तीत जास्त विनियोग हा शाळेच्या इमारतीचे बाहयस्वरूप व दुरूस्ती या बाबींवर खर्च होताना दिसतो व त्याचा फायदा प्रत्यक्षपणे विदयार्थ्यांना व शालेय वातावरणातील बदलाद्वारे अप्रत्यक्षपणे शिक्षकांना प्राप्त होतो. म्हणून संशोधकांला वाटते की,

हया प्राप्त अनुदानाचा विनियोग योग्य तऱ्हेने होत आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, अनुदानाच्या रकमेचा योग्य प्रकारे विनियोग होऊन अनुदान देण्यामागील उद्दिष्टये साध्य होतात.

४. बहुसंख्य शाळांमध्ये अनुदानाद्वारे प्राप्त होणारी रक्कम संपूर्णपणे खर्च होताना दिसते. परंतु शाळांच्या आर्थिक गरजा जास्त असल्यामुळे उदा. इमारत दुरूस्ती,स्वच्छता, पिण्याचे पाणी, क्रिडांगण, स्टाफरूम मधील व्यवस्था इ. मिळणारी रक्कम या गरजा भागविण्यासाठी पुरेशी होत नाही.

५. शिक्षक अनुदानाचा अभ्यास करताना अनुदान रकमेबाबत असे दिसुन येते की, वर्ष २००८-२०१३ या ५ वर्षात यामध्ये सातत्याने वाढ झाली तर २०१०-२०११ मध्ये एकुण अनुदान रकमेतील सर्वाधिक ( २२.३६% ) दिले गेले. परंतु प्राप्त माहितीनुसार २०१५-१६ मध्ये हे अनुदान रक्कम देणे बंद करण्यात आले आहे.

६. शाळा दुरूस्ती अनुदान हे दरवाजे—खिडक्या दुरूस्ती, रंगरंगोटी, इमारत व स्वच्छतागृह दुरूस्ती, संरक्षण भिंती आदी बाबींवर जास्त प्रमाणात केला जातो. याचाच अर्थ शाळा दुरूस्ती अनुदानात प्राप्त रकमेचा विनियोग योग्य प्रकारे करतात.

७. संशोधकास क्षेत्रीय पाहणीद्वारे असे आढळून आले की, व्यवस्थापन अनुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेबाबत ८७% शिक्षक समाधानी असल्याचे दिसून येतात. तर १३% शिक्षकांना असे वाटते की या अनुदानामध्ये मिळणाऱ्या रकमेत वाढ झाली पाहिजे.

८. संशोधन व मुल्यमापन अनुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेतून विदयार्थ्यांची सुविधा उदा. शैक्षणिक साहित्य, शैक्षणिक कार्यक्रमाद्वारे विदयार्थ्यांचे मुल्यमापन, त्यांच्या वैयक्तिक प्रगतीसाठी काही सुचना देणे, त्याच्या व्यक्तीमत्वाचे निरिक्षण केले जाते. त्यामुळे प्राप्त रकमेबाबत फक्त २८% शिक्षक समाधानी आहेत तर ७२% शिक्षकांना वाटते की, या रकमेमध्ये १००% वाढ मिळाली पाहिजे, त्यामुळे हे ७२% शिक्षक असमाधानी आहेत.

९. अपंग एकात्मिक शिक्षक अनुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेबाबत २८% शिक्षक समाधानी आहेत तर ७२% शिक्षक असमाधानी आहेत, त्यांच्या मते अपगांच्या सोईसाठी त्यांना रकमेऐवजी सरकारद्वारे उपयुक्त साहित्य देण्यात यावे. जसे ( तीन चाकी साईकल व ती चालविण्यासाठी रॅम्प ( एका बाजुला कडा असणे.)

१०. बांधकाम अनुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या रकमेचा विचार करता २००८ नंतर २ पर्यंत म्हणजेच जवळजवळ ३ वर्ष अनुदान दिले गेले नाही. त्या दरम्याने २००८ मध्ये प्राप्त झालेल्या रकमेतील शिल्लक रकमेचा वापर करण्यात आला. आणि हा खर्च गरजेनुसारच करण्यात आला.

११. २००८ च्या तुलनेत २०१३ मध्ये खाजगी विना अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी संख्या +५३.४४% नी वाढली तर स्थानिक स्वराज्य संख्यांच्या शाळामधील विद्यार्थी संख्या +५७.८६% नी घटली. यात असे लक्षात आले की, पालकांच्या कौंटुबिक, आर्थिक सुधारणेमुळे व खाजगी शाळांमध्ये मिळणाऱ्या सुख सोईमुळे विदयार्थी संख्येमध्ये वाढ झाली आहे. तसेच त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये विदयार्थी संख्या कमी झाली आहे.

१२. शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करता एम.ए.,बी.एड. पदवीका प्राप्त शिक्षकांची संख्या ३९% आहे. तर, एम.ए., डी.टी.एड., बी.एड.पदवीका प्राप्त शिक्षकांची संख्या केवळ २% आहे.

१३. इमारत रचनेच्या वर्गीकरणाद्वारे असे आढळून येते की, बैठी स्वरूपाच्या शाळांच्या संख्येत (४०%) ने घट होऊन इमारती स्वरूपांच्या शाळांमध्ये (६०%) ने वाढ झालेली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनाने दिलेल्या आर्थिक मदतीमुळे ही इमारत रचनेत बदल करता आले तर खाजगी शैक्षणिक संस्थेला शासनाने दिलेल्या अनुदान रकमेमुळे शालेय इमारत रचनेत बदल झाला आहे.

१४. क्षेत्रीय पाहणीद्वारे असे लक्षात आले की, विज्ञान व वाणिज्य शाखेतील शिक्षक मिळाले नाहीत. सरकारी शाळांमध्ये बहुतांशी शिक्षक हे कला शाखेतील पदवीधर आहेत.

१५. शहापूर तालुक्यातील सर्वाधिक म्हणजेच (४०%) पाणीपुरवठा हा फिल्टरद्वारे केला जातो. थर (६०%) शाळांमध्ये पाणीपुरवठयाच्या इतर साधनांद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

१६. सर्वाधिक शाळांमध्ये ( ७०%) शाळांमध्ये भारतीय पद्धतीचे स्वच्छतागृह आहेत तर ( ३०%) शाळांमध्ये आधुनिक पद्धतीचे स्वच्छतागृह आहेत.

१७. जमीन हा घटक नैसर्गिकरित्याच उपलब्ध होतो म्हणून शहरांपेक्षा शहापूर तालुक्यातील स्वतःच्या मालकीची क्रिडांगणे असणाऱ्या शाळांची संख्या ८४% आहेत तर १६% शाळांना स्वतःच्या मालकीची जमीन उपलब्ध नसल्याने भाडेतत्वावर शाळेपासुनच अर्धा किलोमीटर अंतरापर्यंत क्रिडांगण घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१८. शिक्षकांच्या दिलेल्या नियोजनाचा विचार करता एकंदरीत शिक्षक संख्येपैकी १००% शिक्षक पूर्ण वेळ नोकरी करतात.तर ८१.८१% शिक्षक हे आपल्या अधिकच्या आर्थिक उत्पन्नासाठी खाजगी शिकवण्या घेतात.

## ६.३ गृहितकांची पडताळणी :-

“सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास ” करताना त्यासाठी पुढील गृहितकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## गृहितके :-

१. शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदान रकमेचा शैक्षणिक विकासासाठी योग्य प्रकारे उपयोग होतो.

२. शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदानांच्या रकमेचा योग्य प्रकारे उपयोग केल्यास सरकारी अनुदानांमागील उद्देश साध्य होतात.

३. सरकारी अनुदानांमुळे प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये भौतिक व रचनात्मक बदल होतात व त्यातून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावतो.

४. सरकारी अनुदानामुळे शिक्षकांचा कौंटुबिक, आर्थिक स्तरात बदल होण्यास मदत होते.

५. शाळांच्या विकासामुळे विदयार्थ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सरकारी अनुदान मदत करते.

संशोधकाकडून निवडलेल्या अभ्यासाचा संपूर्ण अभ्यास केल्यानंतर संशोधन विषयाच्या गृहितकाची पडताळणी करणे आवश्यक ठरते. त्याची पडताळणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे :-

**<u>गृहितक :- १</u>**

शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदानाच्या रकमेचा शैक्षणिक विकासासाठी योग्य प्रकारे उपयोग होतो.

**<u>पडताळणी :-</u>**

२००८- २०१३ या कालावधीत शाळांना बांधकाम अनुदान, अपंग एकात्मिक शिक्षण , शाळा दुरूस्ती व्यवस्थापन , संशोधन व मुल्यमापन यासाठी कमी अधिक प्रमाणात अनुदान देण्यात आले. त्यामध्ये शिक्षक अनुदानास सन २००८-०९ मध्ये प्राप्त रकमेपैकी ९७.८२ % रक्कम खर्च करण्यात आली. तर २०१२-१३ मध्ये प्राप्त रक्कम १०० % खर्च करण्यात आली, परंतु प्राप्त माहितीनुसार वर्ष २०१५-१६ मध्ये हे अनुदान बंद करण्यात आले तर शाळा अनुदानास सन २००८-०९ मध्ये प्राप्त रकमेपैकी ९७.२० % रक्कम खर्च झाली , तर २०१२-१३ मध्ये हेच प्रमाण १०० % पर्यंत वाढले, तर बांधकाम अनुदानास सन २००८-०९ मध्ये प्राप्त रकमेपैकी केवळ ४७ % रक्कमेचा वापर करण्यात आला. परंतु तदनंतर २०१०-११-१२ या वर्षामध्ये बांधकाम अनुदानास कोणतीही तरतुद केली गेली नाही आणि त्यावेळेस २००८-०९ मधील शिल्लक रकमेचा वापर करण्यात आला तर अपंग एकात्मिक शिक्षण अनुदानात सन २००८-०९ मध्ये प्राप्त रक्कम १०० %

खर्च करण्यात आली.व्यवस्थापन अनुदानास सन २००८-०९ प्राप्त रकमेपैकी ८९.४९ % रक्कम खर्च करण्यात आली तर सन २०११-२०१२ मध्ये प्राप्त रकमेपैकी १०० % रक्कम ही खर्च करण्यात आली तर संशोधन व मुल्यमापन अनुदानामध्ये सन २००८-०९मध्ये प्राप्त रकमेपैकी ८९.३५ % रक्कम वापरण्यात आली तर सन २०१२-१३ मध्ये प्राप्त रकमेपैकी १०० % रक्कम खर्च करण्यात आली, यावरून संशोधकाने गृहित धरलेले गृहितक सिद्ध होते.

**<u>गृहितक :-२</u>**

शाळांना मिळणाऱ्या सरकारी अनुदानांच्या रकमेचा योग्य प्रकारे उपयोग केल्यास सरकारी अनुदानांमागील उद्देश साध्य होतो.

**<u>पडताळणी :-</u>**

शासनाने धोरणात्मक पातळीवर प्राथमिक शिक्षणाचा उपक्रम राबविला आहे. त्यामुळे २००९ मध्ये शासनाने सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळायला हवे यासाठी कायदा केला आणि त्यासाठी समाजातील तळागाळातील लोकांना शिक्षण या सुविधेचा लाभ मिळावा यासाठी शिक्षणासाठी अनुदानाची तरतुद करण्यात आली. आणि या अनुदानांच्या रकमेचा पर्याप्त वापर केल्यास शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यास सहाय्य होते.विदयार्थ्यांचा शैक्षणिक विकास दर वाढण्यास सुरूवात होते. प्राथमिक व माध्यमिक शाळांना मिळणाऱ्या अनुदानांद्वारे विदयार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारून त्यांचे परिणाम उच्च माध्यमिक शिक्षणांचा दर्जा ही सुधारतो म्हणजेच गुणात्मक क्षेत्राचा विकास घडून येतो. म्हणजेच संशोधकाने अभ्यासासाठी निर्धारित केलेले गृहितक सिद्ध होते.

## गृहितक :- ३

सरकारी अनुदानामुळे प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये रचनात्मक बदल होतात व त्यातून शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावतो.

## पडताळणी :-

शासन शिक्षणविषयक सुविधा देताना शाळेच्या विविध कार्यांना अनुदान देत असते. त्याद्वारे शाळांमध्ये विविध रचनात्मक, भौतिक बदल होतात. ६० % शाळा हया इमारतीच्या रचनेत बदल होऊन त्यांचे बैठी शाळांतून एकमजली, दोनमजली शाळांमध्ये बदल झाल्याचे दिसते.तर सन २००८-२००९ च्या तुलनेत सन २०१२-१३ मध्ये नमुना शाळांपैकी ८४% शाळांना स्वतःचे मैदान होते तर १६% शाळांना भाडेतत्वावर मैदान होते. तसेच ३०% शाळांमध्ये पाश्चिमात्य पद्धतीची स्वच्छता गृहे तर ७०% शाळांमध्ये भारतीय पद्धतीची स्वच्छता गृहे उपलब्ध आहेत. तसेच १२ % शाळांमध्ये विहीरीद्वारे, तर ८% हातपंपाद्वारे तर ८०% फिल्टरद्वारे पाणीपुरवठयाच्या सोई उपलब्ध झाल्या आहेत. हया सर्व रचनात्मक व भौतिक सोयीसुविधांमध्ये वाढ झाल्याचे दिसुन येते.म्हणजेच संशोधनासाठी गृहित धरलेले गृहितक सिद्ध होते.

## गृहितक :- ४

सरकारी अनुदानांमुळे शिक्षकांच्या कौंटुबिक, आर्थिक स्तरात बदल होण्यास मदत होते.

## पडताळणी :-

सरकारी अनुदानांमुळे शाळेचा व विदयार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावताना दिसतो आहे आणि या शाळा व विदयार्थी यांना जोडणारा दुवा म्हणजे शिक्षक होय. क्षेत्रीय पाहणीत असे लक्षात आले की, सर्व शिक्षक हे उच्चशिक्षित पदवीधर आहेत आणि त्यातील १००% शिक्षक हे पूर्ण वेळ नोकरी करतात. परंतु

त्यातीलच ८१.८१% शिक्षक हे आपल्या कुंदुबांच्या आर्थिक गरजा पुर्ण करण्यासाठी इतर ठिकाणी अर्धवेळ नोकरी करतात. यावरून संशोधकाने अभ्यासासाठी निर्धारित केलेले गृहितक सिद्ध होत नाही.

**गृहितक :- ५**

शाळांच्या विकासामुळे विदयार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सरकारी अनुदान मदत करते.

**पडताळणी :-**

सरकार शाळांना अनुदान स्वरूपात विविध सुख- सुविधा उपलब्ध करून देते. त्यांचा फायदा विदयार्थ्यांना होतोच. शाळांना प्राप्त होणारे शाळा अनुदान, बांधकाम अनुदान, संशोधन व मुल्यमापन अनुदान वगैरे. यातून शाळेमध्ये स्पर्धात्मक वातावरणाची निर्मिती होऊन विदयार्थ्यांच्या विविध कलागुणांचा विकास साध्य करता येतो. विविध स्पर्धा परिक्षा , शिष्यवृत्ती परिक्षा, वकृत्व, गायन, नृत्य, क्रिडा स्पर्धामध्ये विदयार्थ्यांचा सहभाग वाढून त्यांना योग्य त्या प्रकारचे मार्गदर्शन व आवश्यक साहित्याचा पुरवठा हा शाळांद्वारे केला जातो. आणि त्यांची सामाजिक व आर्थिक प्रगती साधली जाते. म्हणजेच संशोधकाने अभ्यासासाठी निर्धारीत केलेले गृहितक सिद्ध होते.

## ६.४.सैध्दान्तिक पडताळणी:-

प्रस्तुत संशोधन सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक माध्यमिक शाळा वरील आर्थिक परिणामांचा अभ्यासाच्या संदर्भात आहे. संशोधनासाठी सैध्दान्तिक चौकट म्हणून मानवी विकास निर्देशांक (HDI–Human Development Index) या घटकाचा विचार केला आहे.

आर्थिक विकास मोजताना ते राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न या निर्देशांकाद्वारे मोजले जाई. मात्र आर्थिक विकास मोजण्यासाठी मानवी विकास निर्देशांक,जीवनाचा भौतिक गुणवत्ता निर्देशांक यातील घटकाचांही विचार केला जातो. सदर संशोधनात मानवी विकास निर्देशांका मधील ज्ञान (शिक्षण) म्हणजेच

साक्षरतेचा दर या घटकांचा विचार केला आहे आणि हा साक्षरतेचा दर म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयातील शिक्षणाचे प्रमाण या सहाय्याने मोजले जाऊ शकते. मानवी विकास निर्देशांकामध्ये आर्युमान, साक्षरता दर व उत्पनाचा अभ्यास केला जातो. तसेच १५ वर्षांपर्यतच्या मुलांची शैक्षणिक प्रगती, प्रशिक्षित शिक्षक, एका शिक्षकामागे असलेली विद्यार्थी संख्या व एकुण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा विचार केला जातो.

मानवी विकास निर्देशांकामधील शिक्षण हा घटक महत्वपूर्ण आहे कारण शिक्षणाने केवळ एका व्यक्तीचा विकास न होता एंकदरितच संपूर्ण समाजाचा विकास घडून होतो आणि भारतात हे शिक्षण सरकारी व खाजगी शाळांद्वारे दिले जाते. शिक्षण क्षेत्र हे पूर्णपणे खाजगी क्षेत्राकडे नसून त्यात सरकारचा सहभाग आहे कारण जर खाजगी क्षेत्राच्या हाती शिक्षण क्षेत्र दिले तर समाजातील सर्वसामान्य लोकांना शिक्षण या सुविधेचा लाभ घेणे परवडणार नाही आणि समाजातील बराच मोठा भाग हा शिक्षणापासून वंचित राहिल असे होऊ नये यासाठी सरकारने शिक्षण क्षेत्र पूर्णपणे खाजगी क्षेत्राच्या ताब्यात न देता त्यातील महत्वपूर्ण क्षेत्र म्हणजेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षणावर सरकारने लक्ष देऊन शिक्षण क्षेत्राची अधिकतम प्रगती होण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद केली आहे.

सदर संशोधनाचा विचार सैध्दान्तिक चौकटीतून करता असे लक्षात येते की, शासन शाळांना विविध स्वरुपात अनुदान देते. या अनुदानाचा शहापूर तालुक्यासंदर्भात विचार करता ही अनुदान रक्कम वाढतांनाच दिसते जसे शिक्षक अनुदान स्वरुपात मिळणारे अनुदान २००८-०९ मध्ये एकुण अनुदान रकमेच्या १७.९३% होते ते २०१२-१३ मध्ये २०.६३% इतके मिळाले. तर शाळा अनुदानाचा विचार करता २००८-०९ मध्ये ही रक्कम एकुण अनुदान रकमेच्या १७.६३% होती ती २०१२-१३ मध्ये २०.६०% झाली. तसेच एकात्मिक शिक्षण अनुदान रकमेचा विचार करता २००८-०९ मध्ये एकुण अनुदान रकमेपैकी ८.९०% इतके होते. तर २०१२-१३ मध्ये हेच प्रमाण २०.२७% झाले. एकंदरितच सर्व अनुदान रकमेमध्ये वाढच होतांना दिसते तर विद्यार्थी संख्येचा विचार करता विद्यार्थी संख्येमध्येही वाढ होतांना दिसते. विशेषता मुलींच्या संख्येमध्ये

अधिक प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. तर शिक्षक प्रशिक्षणाचा विचार करता अधिकतम शिक्षक हे उच्च शिक्षित आहेत.

एकंदरितच प्राप्त अनुदान रकमेतून शहापूर तालुक्यातील नमुना शाळांमध्ये रचनात्मक बदल घडून आले आहे. तर विद्यार्थी संख्येमध्ये वाढ होऊन त्यांच्या शैक्षणिक विकासास वाव मिळत आहे. तर शिक्षकांचीही शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन कौशल्य यांमध्ये वैशिष्टपूर्ण बदल घडून येतात.

## ६.५. शिफारशी:-

१. शैक्षणिक अनुदान आणि इतर सरकारी मदत ही दरवर्षी देण्यात यावी. जसे मासिक वेतन, आरोग्य भत्ता, विदयार्थ्यांना क्रिडांक्षेत्रात व इतर क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळविण्यासाठी ही आर्थिक मदत देण्यात यावी. शिक्षकांसंबधी देण्यात येणारी आर्थिक मदतीचा समावेश त्यांच्या मासिक वेतनात केला जावा.

२. शिक्षकांचे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन व भत्ते नियमितपणे मिळविण्यासाठी सरकारने इतर सरकारी कर्मचाऱ्यांसारखी मासिक वेतन मिळण्याची व्यवस्था करावी.

३. शिक्षकांना ठराविक कालावधीनंतर पदोन्नती मिळावी जसे Time Scale व Vacancy Bound Promosion जसे ३- ५ वर्षामध्ये वरच्या पदाची पदोन्नती न मिळता वरच्या जागेचे वेतन त्यांना मिळावे.

४. शिक्षकांना शिक्षक अनुदानाऐवजी शैक्षणिक साहित्य पुरविण्यात यावे.रोख निधीऐवजी शैक्षणिक साहित्य पुरविण्यात यावे, जसे. विज्ञान साहित्य , क्रिडासाहित्य, फळे इ.

५. इमारतीकरिता स्वतंत्र निधी उपलब्ध करून दयावा आणि हा निधी संस्थांकडे देण्यात यावा. हया रकमेचा वापर या संस्था विदयार्थ्यांचा आणि शिक्षकांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टिकोनातून करू शकतील म्हणून संबंधीत रक्कम संस्थेकडे देण्यात यावी.

६. शिक्षकांच्या मासिक वेतनाव्यतिरिक्त प्रशासकीय सुख सोईसाठी वेतनेत्तर अनुदानात वाढ करावी जसे (स्टाफ रूम मधील बैठक व्यवस्था , पंखे , पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था , मधल्या सुट्टीत चहा – कॉफी सारखे पेय, नाश्ता व्यवस्था, शिक्षकांसाठी वेगवेगळी स्वच्छतागृहे इत्यादी.

७. लाईट बिल सर्व शाळांना माफ करावे. कारण विजपुरवठा हा शाळेत प्रकाश व हवा मुबलक प्रमाणात असावी यासाठी वापरली जाते. वैज्ञानिक साहित्य तसेच फिल्टर, फ्रिज यासाठी वापरली जाते. तसेच गरजेनुसार अपंग विदयार्थ्यांसाठी व वरिष्ठ शिक्षकांच्या शारिरीक गरजेनुसार उद्‌वाहनासाठी वापरण्यात येते. म्हणून हे विजेचे मासिक बिल माफ करण्यात यावे.

८. प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांनी मैदाने विकसित करावीत त्यासंबधित जागेची व आर्थिक मदतीची शिफारस सरकारी समितीकडे दयावी.(जागा, कुंपण, दरवाजा, क्रिडांइमारत व क्रिडांसाहित्य, पिण्याचे पाणी व स्वछतागृहे.)

९. ग्रामीण विकासाच्या दृष्टिने शैक्षणिक, सांस्कृतिक, सामजिक जीवनास पुरक असे उपक्रम हाती घेण्यास शाळांना प्रोत्साहन दयावे. जसे वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, पथनाटय, नृत्य-गायन, शैक्षणिक बोधप्रद , व्याख्याने.

१०. शाळेच्या माहिती फलकावर शाळेस प्राप्त झालेले अनुदान व त्यातुन खर्च केलेले अनुदान माहिती देणे आवश्यक आहे.

११. प्राप्त अनुदान रकमेचा योग्य प्रकारे खर्च करून शाळेचा आर्थिक विकास साध्य करणाऱ्या शाळेस प्रमाणपत्र व आर्थिक रकमेचे बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात यावा.

१२. शाळांना प्राप्त होणाऱ्या सरकारी अनुदान रकमेचा शैक्षणिक अनुदान, व्यवस्थापन, मुल्यमापन व संशोधन ,बांधकाम अनुदान, शाळा अनुदान, शाळा दुरूस्ती अनुदान या प्रत्येकांचा स्वतंत्र्य हिशोब ठेवण्यात यावा.

१३. जितके अनुदान प्राप्त होते ते सर्व वापरले जावे अशी अपेक्षा करू नये. सरकारने दिलेल्या अनुदानाच्या रकमेचा पूर्ण वापर केला जावा अशी अपेक्षा न धरता मुख्याध्यापक व समितीचे

कार्यकारी मंडळ यांच्या निर्णयाप्रमाणे ती अनुदानाची रक्कम योग्य त्या कारणासाठी योग्य त्या वेळी खर्च करण्याची त्यांना परवानगी असावी.

१४. सरकारी रक्कम रोख स्वरूपात न देता ती धनादेशाद्वारे दिली जावित. ज्याद्वारे अनुदान प्राप्त रकमेचा हिशोब ठेवण्यासाठी मदत होईल आणि त्यामुळे प्रशासकीय कामामध्ये सहजपणा येईल.

१५. शाळांमध्ये संगणकाद्वारे डिजीटल शाळांमध्ये रूपांतर करण्यात यावे .ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

१६. सरकारी अनुदानातून प्राप्त रकमेचा योग्य वापर झाला की नाही यांचे मुल्यांकन करण्यासाठी सरकारी शैक्षणिक समिती नेमण्यात यावी.

१७. शाळेची ग्रंथसंपदा वाढविण्यासाठी उपक्रम हाती घ्यावे. यासाठी शिक्षक, विदयार्थी व शैक्षणिक संस्थाच्या कार्यकारी मंडळाचे मत विचारात घेऊन शाळेतील ग्रंथसंपदा वाढविण्याचे उपक्रम हाती घेण्यात यावे. त्यासाठी प्रकाशकाकडून स्वस्त दरात पुस्तक विकत घेणे, तसेच पुस्तकांचा देणग्या स्वरूपात स्विकार करण्यात यावा.

१८. शैक्षणिक अनुदान हे ठराविक कालावधीसाठी देण्यात यावे. त्यांची उद्दिष्टे पुर्ण झाल्यानंतर ते बंद करण्यात यावेत आणि ती अनुदान रक्कम इतर अधिकृत गरजांसाठी देण्यात यावी.

## ६.६.समारोप :-

सरकारी अनुदानांचा ठाणे जिल्हातील शहापूर तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांवरील आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे हा ह्या प्रस्तुत लघुशोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी ठाणे जिल्हातील शहापूर तालुक्यातील शाळांची निवड केली आहे तसेच या नमुन्याची निवड स्तरित यादृच्छिक पद्धतीतील कोटा पद्धतीने करण्यात आली आहे. शहापूर तालुक्यात एकुण ५०५ शाळा आहेत त्यातील ६ शासकीय, ४ खाजगी अनुदानित, ५ खाजगी विनाअनुदानित व ३५ स्थानिक स्वराज्य

संस्थाच्या शाळांची अभ्यासासाठी नमुना म्हणून निवड करण्यात आली.नमुन्याकडून संकलित केलेली माहिती वर शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करुन निष्कर्ष प्राप्त केले आहेत.

सदर प्रबंधामध्ये प्रकरण एक मध्ये ग्रामीण विकास व त्यासंबधित शिक्षणाची पार्श्वभूमी यांचा अभ्यास करण्यात आला असून विकासाकरिता भारतीय व पाश्चात्य देशांमध्ये झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला आहे तर प्रकरण दोन मध्ये शिक्षण व अनुदानासंदर्भातील साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. सदर प्रकरणात शिक्षण व अनुदान या संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यात आल आहे. प्रकरण तीन मध्ये संशोधन पद्धतीची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. तर प्रकरण चार मध्ये संशोधन साठी निवडलेल्या नमुन्याची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. ज्यात ठाणे जिल्हा व शहापूर तालुक्याची भौगोलिक सामाजिक, आर्थिक, औदयोगिक आणि शैक्षणिक प्रगतीची सखोल माहिती देण्यात आली आहे. तर प्रकरण पाच मध्ये शहापूर तालुक्यातील शाळांची संख्या, विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या यांच्या वाढीचा कल तर नमुना शाळांना प्राप्त होणाऱ्या अनुदान प्रकाराचा, अनुदान रकमेचा आणि त्या अनुदान रकमेचा विनियोगाचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला आहे. तसेच प्रकरण सहा मध्ये संशोधनाच्या गृहितकांची सत्यता पडताळून पाहिली आहे. हया संशोधनाचे निष्कर्ष हे शहापूर तालुक्याची शैक्षणिक त्यातुनच आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी मागदर्शक ठरतील. यातून मुख्यत्वे शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मार्गदर्शन मिळू शकेल अशा शिफारशी केल्या आहेत. ह्या मधून सर्वसाधारणपणे असा एक महत्वपूर्ण निष्कर्ष निघू शकतो की शहापूर विभागाचे विकसित तालुक्यामध्ये रुपांतर होण्यासाठी सरकारी शैक्षणिक अनुदानांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यामुळेच शहापूर तालुक्यात शैक्षणिक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बदल घडून आले आहेत आणि भविष्यातही येतील.

# संदर्भ-सूची

## ग्रंथ :-


१. प्रा. डॉ. बी. डी. इंगळे,(२०११ ),आर्थिक विचारांचा इतिहास,अरुणा प्रकाशन,लातूर.

२. श्री.ज.फा.पाटील व पी.जे.ताम्हणकर, (१९८० ), विकास व नियोजनाचे अर्थशास्त्र २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. डॉ.ज्योत्स्ना देशपांडे, (२०११ ), विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

४. श्री. वैदय.ना.स, सामाजिक विचारवंत, साहित्य प्रसार केंद्र नागपूर.

५. श्री. घोटाळे रा.ना, (१९९७ ), समाजशास्त्रीय संशोधन–तत्वे व पद्धती, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर-

६. डॉ. निर्भिया सप्रे व प्रा. प्रीती पाटील, शिक्षणातील विचारप्रवाह, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. प्रा. आफळे व बापट, शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान,श्री विद्या प्रकाशन पुणे ३०.

८. डॉ. सुरेश करंदीकर आणि मिना मंगरुळकर, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

९. डॉ. सुरेश करंदीकर, भारतीय समाजातील शिक्षण,फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. डॉ. माळी, भारतीय शिक्षणाचे आधुनिकीकरण, मेहता पब्लिकेशन, पुणे.

११. डॉ. हिरा अहेर, उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, विदया प्रकाशन, नागपूर.

१२. डॉ. अरविंद दुनाखे, प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, नित्यनूतन प्रकाशन.

१३. डॉ. सौ. प्रतिभा पेंडके, शिक्षणाची तात्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका, विदया प्रकाशन,नागपूर.

१४. श्री.जगनराव सोनवणे, माध्यमिक शाळा संहिता, ज्ञानदिप पब्लिशर्स धुळे.

१५. श्री. जगतराव सोनवण,माध्यमिक सेवाशर्ती, सोनदीप पब्लिशर्स, धुळे.

१६. डॉ. लक्ष्मण महाले, जमाखर्च व कार्यालयीन व्यवस्थापन,विदया प्रितम प्रकाशन, पुणे.

१७. डॉ. देसाई व डॉ.भालेराव, (२०११), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन पुणे.

१८. प्रदिप आगलावे, (२०००), संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्याभारती प्रकाशन, नागपूर.

१९. राम देशमुख,(२०११) मुलभुत सांख्यिकी, विद्याभारती प्रकाशन, नागपूर.

२०. डॉ.दिलीप खैरनार, (२०११), प्रगत सामाजिक संशोधन पद्धत व सांख्यिकी,डायमंड प्रकाशन,पुणे.

२१. डॉ. बी. डी.कुलकर्णी,(२००७), अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती ,डायमंड प्रकाशन, पुणे.

२२. शिक्षा का अधिकार,(२०१३), प्रा.जे.के वर्मा प्रकाशन, राज पॅकेट बुक्स, दिल्ली.

२३. सामाजिक परिवर्तनःचिकित्सा आणि भवितव्य संपादन (२००९), शरद जावडेकर, वसुधा जोशी, लता जाधव, रविंद्र म्हसदे प्रकाशन सुगावा प्रकाशन.

२४. विरकर शब्दकोश ,इंग्रजी-मराठी.

२५. अर्थशास्त्र शब्दकोश,इंग्रजी-मराठी.

२६. Behari Bipin, (1983), Unemployment Technology & Rural poverty, Vikas pub.hou… New Dehli.

२७. Baker, Arvind, (1974) Indian Industrial Enviorment Buiseness India Publication.

२८. Curtis J. S, (1965), Introduction to philosophy of education, University press, London.

२९. Patel R. N, (2001), Education Evalution, Himalaya publication, Mumbai.

३०. Dandekar W.N,(2002), Evaluation in schools, Megha Prakashan.

३१. Kohil & Gautam, (1998), Human Resouress Development & planning progress in India, vikas publishing House, New Delhi.

३२. Maitra P, (1986), Population Technologies & Deveploment, Grower publishing co.Ltd, England.

३३. Mahajan, (1993), Employment through Rural Development, Deep & Deep Publication, New Delhi.

## अहवाल :-


१. भारत शासनः- भारतीय जनगणना अहवाल .

१. सन १९९१, सन २००१, सन २०११.

२. महाराष्ट्र - सन १९९१, सन २००१, सन २०११.

३. ठाणे – सन १९९१, सन २००१, सन २०११.

२. महाराष्ट्र शासन :- अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, मुंबई.

३. महाराष्ट्र शासन :- ठाणे जिल्हा अर्थ व सांख्यिकीय संचालनालय जिल्हा-ठाणे सामाजिक व आर्थिक समालोचन सन २००९, सन २०१०, सन २०११, सन २०१२, सन २०१३.

४. ठाणे जिल्हा परिषद, वार्षिक प्रशासन अहवाल सन २०१२ – १३.

५. Balassa, Bela, Sudsidies and counter Reality measures, economics, consideration.

१. Govt. of Maharashtra, censure of Maharashtra The census office, Bombay.

२. Reports of the secondary education commission1952 - 53 Govt. of India.

३. Report of the education & National development education commission.(Kothari commission. 1964 - 66), Govt. of India.


## २. नियतकालीके –


१. योजना मासिक – भारत सरकार – प्रकाशन मुंबई ४०००२३

२. शिक्षणातील मर्मदृष्टी – त्रैमासिक - संपादक – डॉ.किशोर चव्हाण

३. जीवन शिक्षण – मासिक – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ( विद्यापरिषद) पुणे.

४. शिक्षण संक्रमण – मासिक - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

५. भारतीय शिक्षण – माध्यमिक शिक्षण मंडळ.

६. ग्रामीण विकास एक दिशा -त्रैमासिक- संपादक गोपाळ दुखंडे मुंबई

७. सर्व समावेशक शिक्षण - सर्व शिक्षण अभियान, महाराष्ट्र राज्य,शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण,परिषद पुणे ३०.

८. EDU – TRACKS - Monthly

**संकेतस्थळ :**

1. www.google.com
2. www.censasindia.com
3. www.national.panchayat.portal.com
4. www.inmyschool.in
5. www.education.nic.in
6. www.quality research international.in

## फोटो क्र. १




**शहापूर (आसनगांव) रेल्वे स्टेशन**

## फोटो क्र. २



**शहापूर परिसरातील बस स्थानक**

## फोटो क्र.३



**शहापूर परिसरातील बाजारपेठ**

## फोटो क्र.४




**शहापूर परिसरातील शाळा**